UNIVERSAL LIBRARY
OU_192702
UNIVERSAL LIBRARY

JP—391—29-4-72—10,000

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

ll No M83·1 T53A Accession No M1207

ithor लक्ष्यालकर, गोपीनाथ.

tle अनुराधा.

ıs book should be returned on or before the date last marked below

# अनुराधा

श्री. गोपीनाथ तळवलकर

१९४६

किंमत दोन रुपये

सोल एजंट
**अ. अं. कुलकर्णी,**
कॉटिनेंटल प्रकाशन
१९६/१९ सदाशिव, पुणें २.

चित्रकार : श्री. डी. डी. दलाल, मुंबई.
या आवृत्तीखेरीज इतर सर्व हक्क लेखकाकडे

प्रकाशक
**श्री. गो. विद्वांस,**
C/o कॉटिनेटल बुक सर्व्हिस,
पुणे २.

मुद्रक
**स. रा. सरदेसाई,**
'समर्थ भारत छापखाना'
४१ बुधवार पेठ, पुणें २.

# कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९६/१९ सदाशिव, पुणें २.

## ★ आमचीं प्रकाशनें ★

**श्री. वि. स. खांडेकर**

नवा प्रातःकाल (दु. आ.) २॥
पूजन ,, २॥
पहिल्या-वहिल्या २।
गोफ आणि गोफण २॥

**श्री. वि. वि. बोकील**
('वसंताच्या लीला')

बेबीचा भाऊ (दु. आ.) ३
साडेतीन शहाणे ३
चिमखडे २॥
वसंत ३
भाऊ-भाऊ २

**श्री. द. र. कवठेकर**

नाद-निनाद १॥
चांदण्यांतील सांवल्या ३
शाकून् ३
मंदा २

**श्री. ना. धों. ताम्हनकर**

आमचे हे ३
मामा १।
विद्यामंदिरांत ०।॥०

**श्री. अनंत काणेकर**

घरकुल १।
काळी मेहुणी १॥।

**श्री. ना. ह. आपटे**

मी वाट पाहीन! २।
एकटी ५

**श्री. र. गो. सरदेसाई**

स्वाति १॥

**श्री. 'धनंजय'**

कलावंतांच्या सहवासांत ३

**सौ. शांताबाई नाशिककर**

नीलेचा दिलरुबा २

**श्री. चिरडे**

भंगलेली मूर्ति २

**श्री. दत्त उ. वैद्य**

मोगरीचा गजरा १॥

**श्री. प्रभाकर पाध्ये**

प्रकाशांतील व्यक्ति १॥

**श्री. ग. त्र्यं. माडखोलकर**

जीवन-साहित्य २॥

**श्री. काका कालेलकर**

जीवन आणि समाज १॥।

**श्री. साने गुरुजी**

अमोल गोष्टी २

**श्री. शामराव ओक**

धोत्र्याचे कळे २।

**श्री. चिं. वि. जोशी**

संचार २॥

**श्री. जे. एल्. रानडे**

गोड ललकाऱ्या १॥

**श्री. जी. एस्. पाटणकर**

मधुर चिजें १।

**श्री. गोपीनाथ तळवलकर**

अनुराधा २

# कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९६/१९ सदाशिव, पुणें २.

## ★ आमचीं इतर पुस्तकें ★

**आचार्य अत्रे**

अत्रे उवाच

**श्री. य. गो. जोशी**

साहित्यिकांची सफर

**श्री. भा. रा. भागवत**

वैतागवनांतील वाफारे

**श्री. कालेलकर-चोरघडे**

साहित्याचें मूल धन

**श्री. दिवेकरशास्त्री**

हिंदुधर्मशास्त्र

**संपादित**

फडक्यांच्या शब्दांत फडके

## ★ आमचीं आगामी प्रकाशनें ★

**श्री. द. र. कवठेकर**

हा आमचा संसार

विनंति विशेष

गुन्हा

श्री

**श्री. वि. वि. बोकील**

'वसंताच्या लीला'

अरविंद शेख महंमद

**श्री. ना. धों. ताम्हणकर**

कोळश्याची भट्टी

'तो'

**श्री. भा. कृ. केळकर**

सुभाष

**श्री. मा. गो. काटदरे**

नेपोलियन

**श्री. य. गो. जोशी**

हात ग काऊ !

**श्री. ना. ह. आपटे**

कोणी एक प्राध्यापक

**श्री. अरविंद गोखले**

शाल

**सौ. शांता शेळके**

वर्षा

**श्री. वि. स. खांडेकर**

'??' (कादंबरी)

**श्री. ग. त्र्यं. माडखोलकर**

'??' (कादंबरी)

**श्री. गोपीनाथ तळवलकर**

आनंदभुवन

शांतिनिकेतन

**श्री. चिं. वि. जोशी**

ओसाडवाडीचे देव

प्रिय सौ. इंदुताई ( ललिता चौबळ )

यांना सप्रेम समर्पण

—गोपीनाथ

# प्रास्ताविक

या कथा-मालेची कल्पना पुष्कळ दिवस मनांत होती. १९४४ च्या दिवाळीचे सुमारास माझे मित्र रा. वि. श्री. मोडक यानीं आपल्या 'झंकार'च्या खास अंकासाठीं एक गोष्ट देण्याविषयीं मला आग्रह केला. तेव्हां या कल्पनेस चालना मिळून ' अनुराधा ' ही पहिली भावकथा मीं लिहिली. संपादकापर्यंत पोंचण्यास तिला उशीर लागल्यामुळें खास अंकात ती प्रसिद्ध होऊं शकली नाहीं. पुढे एक-दोन आठवड्यानीं ती साप्ताहिक ' झंकारा'त आली. ही कथा बऱ्याच मित्रांना फार आवडली. इतकेंच नव्हे, तर अपरिचित व्यक्तींनींहि आपली प्रशंसा निरोपाने किंवा पत्रद्वारें मजपर्यंत पोचविली. त्यामुळें उत्साह येऊन मीं पुढील कथा लिहिण्याचा संकल्प केला. याच सुमारास 'सत्यकथे'चे सुविद्य सपादक श्री. भागवत याचा ऋणानुबंध जुळला. श्री. वि. पु. भागवत व त्याचें कनिष्ठ बंधु श्रीकृष्णजी यानीं मोठ्या आस्थेवाईकपणें ह्या कथा-मालेस ' सत्यकथे'त प्रसिद्धि दिली. पुस्तक तयार होत असतां लिहिलेल्या कांहीं कथा " वाङ्मय-शोभा ", " यशवंत ", "समीक्षक" इ. नामवंत मासिकांत प्रसिद्ध झाल्या आहेत. या सर्व सपादकमित्राचा मी फार ऋणी आहे. कारण या सर्वांनीं या कथांना प्रसिद्धि दिल्यामुळे महाराष्ट्ररसिकांपुढे त्या येत गेल्या आणि कितीतरी परिचित, अपरिचित मित्रमैत्रिणींकडून प्रशंसा, सूचना व उत्तेजन मिळत राहिलें. नोव्हेंबर १९४४ ते फेब्रुवारी १९४६ हा या कथांचा रचना-काल आहे, आणि याच काळात त्या प्रसिद्धहि होत राहिल्या. आज मित्र अनंतराव कुलकर्णी याच्या उत्साहामुळें या सर्व कथा पुस्तकरूपानें प्रसिद्ध होत आहेत.

लेखनांत तंत्राचा ( Technique ) मान योग्य त्या मर्यादेपर्यंत राखावा याच मताचा मी आहे. तंत्राचें दास्य मला मान्य नाहीं आणि तंत्राची पायमल्ली करण्याची बंडखोरी मला हास्यास्पद वाटते. औचित्य आणि आकर्षकता ह्या दोन गुणांवरच अखेर कलाकृतीची श्रेष्ठता ठरत असते. मी माझ्या या कथांना भावकथा म्हणतों. पण कुठे चिंतनपर ( reflective ) गुजगोष्टींचा ढंग तर कुठे शब्दचित्राचा थाट त्यात आला असेल. नाहीं असें नाहीं.

म्हणून ‘ भावकथा ’ या शब्दावर कुणा साहित्य-पुंगवानें आकांडतांडव केलें तर मी ‘ मूकनायका ’ची भूमिकाच स्वीकारीन. बहुधा असे वाद निघले कीं उत्तर-पक्ष करणारे हौशी वावदूक निघतातच, आणि मग परस्पर फड रंगून आपणास तटस्थ राहणें सुलभ होते.

काहीं नवीन आशय ( content ) व्यक्त करण्याची खटपट जेव्हां लेखक करतो तेव्हां नवीन वाङ्मयप्रकार निर्माण होतो, किंवा जुन्याच वाङ्मय-प्रकाराला काहींसें नवे वळण लागते. प्रस्तुत भावकथात काहींसे असेच झालें आहे. आपल्या प्रणयभावनेची विकसनासाठीं विविध प्रकारानी चाललेली धडपड त्या व्यक्तीनें अनेक भावकथा लिहून व्यक्त केली आहे. या भाव-कथातील ‘ भाई ’ प्रणयात विजयी झालेला ‘ चंडिदास ’ नाहीं अथवा प्रेमभग्न होऊन आत्मनाश करणारा ‘ देवदास’हि नाहीं. ‘ पहिलें प्रेम ’ स्वप्नाळू असतें म्हणतात ! पण प्रेमाच्या असह्य यातना भोगूनहि ‘ भाई ’ स्वप्नाळूच आहे. आपल्या प्रेमाच्या यातनांचें व अपेक्षाचें वर्णन देतांना ‘ भाई’ने प्राजलपणा सोडलेला नाहीं, आणि त्याची उच्च पातळीहि सुटलेली नाहीं. इतक्या निःसंकोचपणे आपल्या अनेक काव्यमय यातनांचे वर्णन सागणे हे एक नावीन्यच आहे, आणि म्हणूनच या पुस्तकातील भावकथा या वाङ्मय-प्रकाराची ही धाटणीहि थोडी नवीनच आहे.

पण केवळ नवीन आहे म्हणून यांस हृदयंगम म्हणा असा वेडा आग्रह मी धरणार नाहीं. ‘ भाई ’चे मनोगत पुढच्या प्रकरणात भावकथातील नायकानें आपली भूमिका स्पष्ट केलेलीच आहे. ती लक्षांत घेऊन मग पुढील कथा वाचाव्या ही विनंति आहे. ह्यांतील कथाबीजें ज्यांच्यामुळें निर्माण झालीं आणि त्यांचा शब्दरूपी वृक्ष होईपर्यंत ज्याचे ज्यांचे साह्य झाले त्या सर्वांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करून हे पुस्तक मी साभिवंदन महाराष्ट्र-रसिकाच्या हातांत देत आहें.

आनंदकार्यालय, पुणें
३१–३–४६

गोपीनाथ तळवलकर

# ‘ भाई ’चें मनोगत

★

माझ्या जीवनांत आलेल्या कांहीं रमणीय व्यक्तींचीं शब्दचित्रें पुढील अकरा प्रकरणांत आहेत. त्यांत माझ्याहि जीवनाच्या छटा बऱ्याच मिसळल्या आहेत. लहानसे कथासूत्र आणि घटना व प्रसंग माफक असल्याने यांना भावकथा म्हणण्यास हरकत नाहीं.

या कथात मीं माझ्या स्वतःबद्दल कांहीं कमी सांगितलें आहे असें नाहीं. मानवी षड्‌विकारांचा माझ्यावर हल्ला झाला आहे हेहि मीं अनेक ठिकाणीं निःसंदिग्ध रीतीने सांगितले आहे. ध्येय व आदर्श यांकडे माझें मन सदैव झेपावत असलें तरी मनुष्यसुलभ विकारात मी सापडतो ह्याचा प्रत्यय या कथांत अनेक ठिकाणीं वाचकाना येईल. पण असे असलें तरी हीं कांहीं एकाद्या कामपीडिताच्या रंगेल मुलुखगिरीचीं वर्णनें मात्र नाहींत. हें अकरा विभागांत विस्तारलेले प्रणयसंगीत आहे. याचे सूर उदास असतील पण संयम व अभिरुचि याचा स्वरताल कुठेहि चुकलेला नाहीं. एका स्वप्नाळू काव्यमय जीवाची सौंदर्यशोधासाठीं चाललेली धडपड आणि प्रणयाचा पूर्ण आविष्कार व्हावा यासाठीं त्याला लागलेली तळमळ या अकरा प्रकरणात व्यक्त झालेली आढळेल.

तारुण्याच्या अगदीं उंबरठ्यावर भेटलेल्या ‘ अनुराधे ’पासून अगदीं अलीकडे पत्रव्यवहारानें परिचित झालेल्या ‘ शरावती ’पर्यंत दहा प्रकरणे झालीं. आणि तेथेच माझी ही कथा-मालिका संपवावी असे वाटलें. पण नदीच्या प्रकट उगमस्थानामागे कित्येकदा तिचा खराखुरा उगम असतो. ‘ अनुराधा ’ भेटली त्याच्याहि अगोदर माझी मनःसृष्टि सौंदर्यलोभानें हिरवळली होती. या क्रांतीला कारण झालेली नायिका ‘ बानू ’ हिची हकिकत दिली. शेवटचे आणि निवेदन संपविलें. हें सर्व निवेदनच आत्मनिष्ठेतून ( subjectivity ) जन्म पावले आहे. यांत मी माझ्या सर्व हर्ष-शोकाला, पूर्ण उद्गार ( expression ) दिला आहे. माझें स्वतःचें व्यक्तिचित्र कुणाला रेखाटावेंसे वाटलें तरी या कथांतून त्याला हवी तेवढी सामुग्री मिळेल.

माणसाच्या भावजीवनात वादळे उठविणाऱ्या रमणीय व्यक्ती एकाहून अधिक भेटणे ही काहीं नवलाईची गोष्ट नाहीं. आज तर सहशिक्षण, सार्वजनिक जीवन, प्रवास इ. ची व्याप्ति चौफेर वाढत असता पूर्वीइतकीहि दुर्मिळता या गोष्टींत राहिलेली नाहीं. यामुळेच माझ्या जीवनातल्या या दहा-अकरा हृदयगम घटना रेखाटताना मी काहीं अलौकिक सागत आहें असें समजत नाहीं. आणि या घटनातील भावना-यातना पुष्कळाना आत्मीय वाटतील याची मला खात्री वाटते.

या सर्व घटनातून ओवलेले सूत्र अखेर विफलतेलाच बाधलेले दिसून येईल. केंव्हा मी परिस्थितीच्या झंझावातात सापडलों होतों म्हणून माघार घेतली. केंव्हा प्रेयाचे अतरंग अजमाविण्यांत चूक झाली तर केंव्हा उशीर झाला। केंव्हा भविष्यकालच्या विचाराने भय वाटले म्हणून हातीं आलेला प्रणय गमावला। कित्येकदां गैरसमजुतीच्या आहारीं जाऊन उगाच भावनाना उदात्ततेचे वेगळे रूप देण्याचा प्रयत्न केला। काहीं वेळीं मनाची तयारी नसतानाच प्रेमगंगेचा पूर आला त्यामुळें बाजूला व्हावे लागले. या आणि अशा विचित्र प्रकारामुळे दीड दशकाचा कालखड जाऊनहि मी एकाकीच आहे.

**“ओठाशीं भिडतें रहस्य मनिचें–सांगू कुणाला परी ?**
**अश्रू हे नयनींहि–माळ करुनी घालूं कुणाच्या गळां ? ”**

हीच माझी स्थिति आजही आहे।

मग माझ्या विफलतेची ही कहाणी मी का सागत आहें ? तेंच मला स्पष्ट करायचें आहे. जगाची सहानुभूति मिळविण्याकरिता हें मात्र खासच आरंभिलें नाहीं. कारण ह्या अकरा कथा वाचल्यानंतर सहृदय रसिकाला खात्रीनें कळून येईल कीं मला जे अलभ्य आहे त्याची भरपाई जगाच्या सहानुभूतीनें होणार नाहीं. जगानें आपले सम्राट्पद दिलें तरी माझी उदासीनता न हटणारी आहे. मॉटो क्रिस्टोप्रमाणे ‘दुःख नावाच्या ग्रहावरून आलेला मी प्राणी आहें.’ (I have come from a planet called grief) असे मला वाटतें. तसेच मी संपूर्णपणे व्यक्तिवादी आहें. आपले विफलतेचे अनुभव सागून अशाच प्रसंगांत सापडलेल्या लोकाना मार्गदर्शन करावें हा हेतु या अकरा कथा सागतांना माझ्या मनात मुळींच नाहीं. असा हेतु

ठेवण्यांत काहीं अर्थहि नसतो. पांखरे आकाशांत हिंडताना पाउलवाटा पडतात का? नाहीं. प्रत्येक पाखराला आपल्या अंतःप्रेरणेनेंच आपला इष्ट-स्थानाचा मार्ग स्वतंत्र रीत्या हुडकून काढावा लागतो.

"The path of devotion is trackless."

आक्रोश करण्यांत किंवा क्लेशाचें प्रदर्शन करण्यांत एक विकृत सुख मिळतें म्हणतात! तशा तऱ्हेचा क्लेशवादीहि मी नाहीं. इतकें असूनहि हे सर्व सांगण्याचा हुरूप मला का आला असें कोणीं विचारिलें, तर माझ्या गेल्या तपातील या विशिष्ट यातनांच्या सौंदर्यानें मला या निवेदनास उद्युक्त केलें हेंच उत्तर मी त्याला देईन. साऱ्याच यातना विकृत किंवा असुंदर असतात असें नाहीं. निदान मीं या दहा-अकरा प्रकरणीं भोगलेल्या यातनांत विलक्षण रमणीयत्व आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. ते संपूर्ण प्रकट झालें नसेल किंवा मला पूर्णांशानें उपभोगता आले नसेल तर मीच अजून उणा आहे हे मान्य करणें योग्य होईल.

माझ्या या यातना सुंदर आहेत हें मी का म्हणतो याचें एक सबळ प्रमाण द्यावेंसे वाटतें. माझ्या जीवनांत या भावकथांचे विषय झालेल्या रम्य व्यक्ती आल्या आणि गेल्या! त्यांचा अनुनय करण्यात व्यवहारदृष्ट्या मी यशस्वी झालों नसलों तरी माझी श्रद्धा यत्किंचित् उणावली नाहीं.

**"अगाध दुर्मिळ जनीं–दिसे मज कांहि तुझ्या लोचनी"**

या आश्चर्यात अजूनहि मी बुडलेला असतो. तसेंच यशाच्या बाबतींत जमेची बाजू शून्य आहे हें खरें; पण मनांत मी स्वतःला हीन लेखण्याच्या वेडाने कधींच ग्रस्त झालों नाहीं. म्हणूनच या यातना मला सुंदर वाटतात. आजच्या युगातील–नव्हे नित्याचाच श्रेष्ठ मानवधर्म जी अहिंसा तिच्यांतलें सत्य कदाचित् मला या यातनाशिवायहि कळले असतें, पण तिच्यातले सौंदर्य मात्र या यातनांनींच मला प्रतीत झाले हे अगदीं स्वच्छ आहे.

एकेका कालखंडाची एकेक टूम असते. समाजनिष्ठा आणि वास्तवता हे आजचे परवलीचे शब्द आहेत. माझ्या कथनांत ह्या शब्दांचा फारसा आदर बाळगलेला दिसणार नाहीं. साऱ्या कहाण्या व्यक्ति-जीवनाभोंवतीं गुंफलेल्या आहेत. आणि वास्तवतेचे तर मला वावडेच आहे. एका प्रदर्शनांत मी कांहीं मासे पाहिले होते. पाण्यांत बुडबुडे निर्माण करून त्यांच्या पोकळींत हे मासे

अंडीं घालतात अशी माहिती तिथे मिळाली आणि ते दृश्यहि पारदर्शक कांचेच्या पात्रांत पाह्यला मिळाले. या माशांसारखीच माझी अवस्था मला वाटते. आपल्या जीवनांत अवास्तवतेचे बुडबुडे निर्माण करून त्यांत आपलीं सुंदर स्वप्नें ठेवण्याचा मला अनिवार छंद आहे. अर्थात् वास्तवतेची एक लाट आली कीं हे बुडबुडे फुटतात आणि तीं स्वप्नेंहि भग्न होतात ही गोष्ट वेगळी! अशा तऱ्हेचें व्यक्तिवादी व स्वप्नाळू जीवन आजच्या युगधर्माशीं विसंगत नाहीं का? ..असेलहि कदाचित्! पण आजच्या फॅशनशीं मला जुळवून घेतां यावे अथवा मी 'पुरोगामी' ठरावें म्हणून कला-जीवनात मी अ-प्रामाणिक का होऊं? ते मला शक्य नाहीं. माझ्या अशा प्रवृत्तीने मिळणारीं अपयशे व अप्रसिद्धि स्वीकारण्यास मी तयार आहें.

पण माझे निवेदन 'पुरोगामी' ठरले नाहीं अथवा मला बहुसंख्य रसिकांचा मेळावा गोळा करता आला नाहीं म्हणून माझ्या निवेदनातल्या सौंदर्याची टवटवी लोपली असे मला कदापि वाटणार नाहीं. बालकाचें निष्पाप हास्य कधीं तरी शिळे होतें का? कधींच नाहीं! प्रेमाचा अश्रूचे सामर्थ्य आता क्षीण झाले असे म्हणण्याचा काळ केव्हा येतो का? केव्हाच नाहीं! उषःकाल किंवा पूर्णिमा रजनी हीं सौंदर्य आता 'इतिहासजमा' झालीं असें कधींतरी म्हणण्याचा प्रसग येईल काय? नाहींच नाहीं, आणि म्हणून या कथातील यातनाभावनातलें सौंदर्य समरस होऊन पाहणारा कुणीतरी समानधर्मा वर्तमानकाळांतहि भेटेल असा माझा विश्वास आहे.

जपानमधील हिरोशिमा या दुर्दैवी शहरात अणुबॉबचा प्रळय झाल्यानंतर आज असा चमत्कार दिसतो कीं कित्येक मूळ वस्तू नष्ट झाल्या असून त्यांच्या सावल्या आणि प्रतिबिंबे मात्र तशींच आहेत!! जलाशयावर पुलाचा मागमूस नाहीं पण आत प्रतिबिंब मात्र आहे! पठारावर झाडांच्या मोठाल्या सावल्या दिसतात आणि झाडे मात्र मुळींच नाहीत!! तेथील माणसांना या भुताटकीने अस्वस्थ केलें आहे. छाया किंवा प्रतिबिंबें हीं मूळ वस्तूंच्या आश्रयानेंच असायचीं असा माणसांना ठाम अनुभव असल्यानें ह्या सृष्टिचमत्काराने तीं माणसे भांबावलीं आहेत. या अपूर्व व भेसुर सृष्टिचमत्काराचा दृष्टांत माझ्या मनःस्थितीला पूर्ण लागू पडेल. माझ्या जीवनांत किंचित् काल राहून गेलेलीं कित्येक रमणीय प्रेयें व ध्येये आज अदृश्य झालीं आहेत. पण त्यांच्या सावल्या

व प्रतिबिंबें मात्र मागें रेंगाळत आहेत! जीवनकलहांतून जेव्हा थोडी फुरसत सांपडते तेव्हा या दृश्याकडे लक्ष जाते आणि मग त्या ताम्बेंच्या ओळी आठवतात—

> " तूं मंगल, सुख तूं, ग! तुजविण
> भुताटकीची माया भीषण
> धावे खाया मज ' आ ' वासुन."

या साऱ्या उदासीनपणाच्या पार्श्वभूमीवर ह्या सर्व भावकथा वाचल्या तर त्याच्यातलें सौंदर्य अधिक कळून येईल.

एवढेच माझे मनोगत! मी अगोदरच सांगितलें आहे कीं जगाकडून सहानुभूतीचा तुकडा मिळविण्यासाठीं हे निवेदन नाहीं. मी क्लेशवादी नाहीं तसा मार्गदर्शकहि नाहीं. माझ्या अपयशाचा गौरव करण्यासाठीं मी खटाटोप केलेला नाहीं. माझ्या उणीवा मला पूर्ण माहीत आहेत. या कथात मला कुठें यश मिळाल्याची हकीकत असती तरच ती विसंगत दिसली असती! आपण भोगलेल्या यातनातले काव्य चितारण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न आहे. मूळ सत्यावर कल्पनेची आरास बरीच केली आहे. पण तीमुळे सत्याचें रूप झाकलें गेलेलें नाहीं. उलट तें अधिक सुंदर झाले आहे. कथाविषय झालेल्या व्यक्तींचे अंतर्बाह्य सौंदर्य हाच माझ्या या निवेदनाचा मूळ आधार होय. अर्थात् या निवेदनात जे मनोहरित्व असेल त्याचे सर्व श्रेय त्यानाच.

ज्या एका पर्वतप्राय लाटेनें मीं आजवर न भोगलेल्या असह्य वेदना भोगल्या तिचे वर्णन या निवेदनात आलेलेच नाहीं. ' झेलम 'चें ते अद्भुत पर्व अद्यापि सांगावयाचेंच आहे. पण भावकथेच्या मर्यादित क्षेत्रात तें संपण्यासारखें नव्हते. म्हणून " **मालकंस** " या माझ्या कादंबरींत ती सर्व कथा विस्ताराने सांगेन एवढे आश्वासन देऊन माझे निवेदन संपवितो.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | प्रास्ताविक ... | ... |
| | ' भाई 'चे मनोगत ... | ... |
| १. | अनुराधा ... | १७ |
| २. | शोभा... ... | २७ |
| ३. | काचन ... | ३७ |
| ४. | नंदिनी ... | ४९ |
| ५. | चित्रा... ... | ५७ |
| ६. | पूर्णिमा ... | ६८ |
| ७. | रमणी... ... | ७९ |
| ८. | शमीम... ... | ८५ |
| ९. | कामिनी ... | ९१ |
| १०. | शरावती ... | १०२ |
| ११. | बानू ... ... | १११ |

# अनुराधा

—गोपिनाथ तळवलकर

# अनुराधा : : : १

रात्रीं फिरून परत येताना ‘ गुड लक ’ मध्ये शिरलों. तेव्हा कोण उल्हास वाटत होता मला ! आता येथे मुक्काम ठोकून बसणारे कोणी ‘ भाई ’-बंद भेटतील आणि तोंडावर अक्षता टाकतांच वादविवादाला सुरुवात करतील या अपेक्षेत मी होतों. क्वचित् एकादा हिंदुत्वनिष्ठहि असेल. गाधी-जिना वाटाघाटीबद्दलच्या चर्चेत बहुधा कुणाचेच आपले एकमत न होता वाद रंगेल अशी खात्री होती माझी. पुनः म्हटलें रेडिओवर बातम्या ऐकूं येण्याचीहि वेळ झाली आहे. तेव्हां दोस्त आणि रशिया याच्या प्रगतीचे नवे रसभरित वर्णनहि ऐकायला मिळेल.

कोपऱ्यांत एक आरामशीर बिनगर्दीची जागा पाहून मी बसलों आणि कॉफी मागविली.

माझ्या कोणत्याच अपेक्षा आज पूर्ण होणार नव्हत्या. कॉफीचा पहिला घुटका घेतला असेल नसेल तोंच ग्रामोफोनवर अगदीं विचित्र व करुण असे पार्श्वसंगीत ऐकूं आले आणि मागोमाग गीत उमटूं लागले,

**मैं जान गया पेहेचान गया, हाँ,**
**इस घोर अंधेरी रातमें प्यारी,**
**तुमने मुझे पुकारा.**

माझा उत्साह मावळला ! वादविवादाची ऊर्मि नाहींशी झाली ! “ काशिनाथ ” मधील या गाण्यानें नेहमींइतक्या यशस्वितेनें माझ्या मनाला सुखापासून दूर केलें. आतां कुणी साधा विद्यार्थी जरी माझ्याशीं वाद करायला आला असता तरी त्याला मुळींच सवड न देता मीं म्हटले असतें,

" बाबा रे ! तूं म्हणतोस तें शंभर टक्के बरोबर आहे. तूं माझा गुरु आहेस, पण या नम्र शिष्याला आतां सोड." देश आणि परदेश यातल्या महत्त्वाच्या घटनांवर रेंगळणारें मन एकदम बिचकले. बाह्य जग सोडून पळूं लागले आणि सुखापेक्षा आकर्षक पण दुःखापेक्षा तापदायक अशा उदासीनतेत स्वतःला गुरफटून घेऊं लागलें !

मीं कॉफी कशीबशी संपविली आणि अंधाऱ्या रात्रीं पुनः टेकडीच्या बाजूलाच हिंडूं लागलों.

माझी कायमची सहचरी बनलेली उदासीनता मला सोबत करीत होती. जीवनांतल्या महत्त्वाच्या स्मृति उकरून काढून त्याचे मूल्यमापन मी करीत होतों. अशा मनःस्थितीत मी नेहमीं हेंच करतो. तसेच तेव्हा करूं लागलो. आणि नेहमींप्रमाणे त्या ठरीव निर्णयाकडे जात होतो. प्रेमात बेहोष होऊन व्यवहाराकडे दुर्लक्ष केलें; व्यवहार अंगीं नसल्यानें प्रेम दुरावले ! आणि शेवटीं उरली काय ती ही काव्यमय पण दाहक उदासीनता !

इतक्यांत समोर आलेल्या बंगल्याकडे लक्ष गेले. " **गो-वर्धन** " विजेच्या निळसर प्रकाशात बंगल्याचें नाव झळकत होतें. उदासीनता अधिकच तीव्र झाली. आपल्या माहेरी असल्यासारखे मोकळेपणानें तिचें लास्य सुरू झाले.

हो ! याच बंगल्यात माझ्या या आजीव मैत्रिणीचा–या मोहक उदासीनतेचा जन्म झाला होता !

आज बारा वर्षे झालीं त्या गोष्टीला.

श्रावणातली रात्र. पाऊस धो धो पडत होता. भिजून चिंब झालेला मीं. आत कसें शिरावें याचा विचार करीत होतों. इतक्यात ' या ' असे कोमल स्वराने म्हणत अनुराधा पुढें आली. माझे डोळे दिपून गेले. इतके अनुपम लावण्य पाहण्यासाठीं दिव्य दृष्टि घेऊन यायचें मला जमले नव्हतें. मी चकित, भयभीत होऊन तसाच निथळत उभा राहिलो. पण लवकरच अनुराधेनें आपल्या आर्जवी आणि खानदानी भाषणाने माझें मन भयमुक्त केले. अर्धा तासच मीं तेथे होतों. पण एकादेंच वाक्य बोललों असेन. अनुराधा मात्र परोपरीनें मीं मोकळेपणाने वागावे असा प्रयत्न करीत होती. " तुमच्या कविता वेळोवेळीं वाचतें. फार आवडतात मला. तुमची ओळख करून घ्यावयाची होती म्हणून मीं मुद्दाम बोलावणे पाठविले." कृतज्ञता किंवा आनंद प्रकट

करण्याची सुद्धा मला छाती होईना. इतक्यात एक जाड मोहरदार बांधणीची वही काढून ती माझ्यापुढें करीत अनुराधा म्हणाली, " मी जें वाचतें त्यातलं चागलं उतरून ठेवण्याचा नाद आहे मला. ही पहा तुमची ' एकाकी अभिसारिका '. 'यशवंता'त ही कविता वाचली तेंव्हाच मी अगदीं हुरळून गेले..." माझ्या कवितेच्या शेजारींच एक इंग्रजी अवतरण होते. मी वाचू लागलो—" Hands cling to hands and eyes linger on eyes, thus begins the record of love"–रवींद्रनाथाचे काव्य होते ते ! माझ्या लिखाणाचे याहून कोणतेंच अधिक कौतुक कुणी करू शकले नसतें आणि करायची जरूरीहि आता मला उरली नव्हती !

मी घरीं परतलों तेंव्हा आनंदाने वेड लागावयाची पाळी आली. माझीं पावलें अगदीं बेताल पडू लागलीं. वाटेने भेटलेल्या माझ्या मित्राना मी गदगदा हलविले काय, त्याच्या साऱ्या बोलण्याला किचाळून हंसलों काय, आणि अगदीं साध्या गोष्टींत तन्मयता काय दाखविली ! मला अगदीं एक अपूर्व साक्षात्कार झाला होता. मनात देवाला वारंवार म्हणत होतों, ' या क्षणाची तूं मला अगोदर कल्पना दिली असतीस तर मध्ये मध्ये तुझ्याविषयीं जी अश्रद्धा बाळगण्याची तिर्डाक येई ती तरी आली नसती. ' हें ऐकून देव हंसला कीं गंभीर झाला कुणास ठाऊक !

त्या वेळीं मी एक भेदरलेला व्यथित मुलगा होतो. बाल्य संपण्याच्या सुमारासच उत्कर्षाचा राजमार्ग नाइलाजाने सोडून द्यावा लागला होता. समोरची आडवाट कुठे नेणार आणि किती दिवस रखडविणार याचा अंदाज नव्हता. यश आणि पैसा यानीं झगझगीत दिसणाऱ्या समाजाच्या वतनदारवर्गाकडे जीव ओढत होता. तेथेंच दाटीवाटीने बसायला मिळावे ही तर महत्त्वाकांक्षा होती. पण व्यवहारातली कुठलीच शिफारस अंगीं नव्हता. सुखी वर्गाच्या इमल्याभोवतीं आशाळभूतपणें दुःखीकष्टी होऊन हिंडणारा मी एक लोभी जीव होतो. अनुराधेची मैत्री होताच माझ्या मनाचें रूप खूप पालटले. तिच्या लावण्याला तोड नव्हती. ती सुंदर काव्ये करी आणि ती स्वतःच एक रमणीय कविता होती. तिच्या वंशवृक्षाचीं मुळें एका प्रसिद्ध राजकुलापर्यंत गेलीं होतीं. अशा रसिक धनिक सुतेनें आपल्या मैत्रीचा मान दिल्यामुळे जगाच्या संपन्नतेशीं व सौंदर्याशीं आपलेहि काहीं नात आहे असे मला वाटू लागले.

पण त्याबरोबरच माझी स्वतःची श्रेणी मला विसरता येत नव्हती. आणि त्यामुळें माझें अंतःकरण अनुराधेपुढे मोकळे करण्याचें साहस मला करवले नाहीं. प्रेमाच्या धुंदीने मी अधातरी चालत होतो, अनेक स्वप्नमालिकांतून जात होतो. श्रीमंती आणि सौंदर्य यांनीं जगाचा प्रत्येक कण न्हाऊन निघाला आहे आणि माझ्याइतक्या कौतुकाश्चर्याने प्रत्येक जण अनुराधेपुढे नम्र होत आहे अशा कांहीं स्वप्नाळू वातावरणात मी असे. पण उदासीनता ही प्रेमाची सावलीच असते. स्वप्नाळूपणांतून किंचित् जागृति येई, तेव्हा आपले प्रेय असाध्य आहे या विचाराचा जबरदस्त आघात होऊन ही सावली फार भयकर रूप धारण करी ! !

अधिक भेटी झाल्या तितका मोकळेपणा वाढला. दर वेळीं अनुराधेच्या सौंदर्याचा एक एक नवा पैलू दिसत होता.

शाळेच्या संमेलनात नाटक होते. अनुराधा त्यांत नायिकेचे काम करणार होती. मला अर्थातच निमंत्रण होतें. त्या दिवशीं अगदीं अपूर्व उल्हासाने मी त्या प्रयोगाला गेलों.

नाटक कोणते तें आता आठवत नाहीं. पण तें ऐतिहासिक होतें. अनुराधेने राजकुमारीची भूमिका घेतली होती. खलनायक एका अबलेचे हाल करीत असता, ' दूर हो. हात आवर, नाहीतर प्राणास मुकशील !' असे म्हणत अनुराधेनें जेव्हां प्रवेश केला तेव्हा श्रोतृवृंदात विद्युल्लता चमकल्यासारखा धक्का बसला ! आपल्याइतकाच घायाळ शेजारचा माणूस झाला आहे कीं नाहीं हें पाहण्यासाठीं प्रत्येकजण रंगभूमीवरील अनुराधेकडे एकदां आणि शेजारच्या व्यक्तीकडे एकदा आळीपाळीनें पाहूं लागला. माझे तर देहभान हरपलें ! या लावण्यमयीच्या अंतरंगातला मित्र मी आहे ह्या उच्चतेच्या भावनेनें मी चहूंकडे पाहत होतों. तिच्या त्या रम्य मूर्तीनें वेडावलेला श्रोतृसमाज जणूं माझ्यावरच खूष झाला आहे असें मला वाटत होते.

पहिल्या अंकानतर एक चिठ्ठी आली. ' दुसऱ्या अंकानंतर भेटायला या —अनुराधा.' दुसरा अंक संपताच मी आंत गेलों. आंतल्या राजमहालाच्या देखाव्यातील एका खाबाला हात देऊन अनुराधा कोणाशीं बोलत होती. तीं झगझगीत वस्त्रे, ते अलंकार तिला शोभत होते ! कपाळावरील बिंदीने तर तिच्या राजतेजाची शोभा सौंदर्याच्या परमोच्च पातळीला नेली होती.

तिची लहानसर पण डौलदार आकृति, सदैव सलज्ज व किंचित् भावमग्न दिसणारे ते मुखकमल–मला वाटलें आदर्श सौंदर्याचे वर्णन अजून कुणाहि महाकवीने केलेलेच नाहीं. आपल्या कामाबद्दल अनुराधा विचारील तेव्हां तिला सांगायचे ठरविलें होतें मीं कीं, "इतर भूमिकांत नाट्य आहे. पण तुमच्या भूमिकेत वास्तवताच आहे. मंडी, कपुरथळा येथील एकादी राजकन्याच रंगभूमीवर आली आहे असें वाटतें."

पण प्रत्यक्ष तिच्याजवळ गेल्यावर आणि तिनें हास्यमुखानें केलेलें स्वागत स्वीकारल्यावर मी मूक झालों. तिच्या डोळ्यांतल्या प्रेमळतेचा अर्थ व सौंदर्य याचेंच चिंतन करूं लागलों.

अनुराधेशेजारी एक लाबडोक्या, कुरतुडलेल्या मिशांचा, आणि खप्पड गालाचा शिक्षक उभा होता. त्याच्या बुभुक्षित चेहऱ्यावर सदाकदा लोकांना दिपविण्याची एक विचित्र अस्थिरता दिसत होती. आपलें तग्टाचें अंतरंग उघडें करून दाखविणारी फाटकी टोपी सावरीत तो अनुराधेला म्हणाला, "पहिल्या अंकातली नक्कल तूं नीट पाठ केली नव्हतीस वाटतं?" इतक्यांत जवळ उभ्या असलेल्या एका फोडेल तोंडाच्या फॅशनेबल तरुणानें मानेला हिसडा देऊन आपल्या कपाळावरचें जावळ मागें टाकलें आणि अनुराधेला म्हटलें, "दुसऱ्या अंकातली तुमची एन्ट्री तितका सफाईची वाटला नाहीं मला." या दोघा 'मार्मिकां'ना हत्तींच्या पायाखालीं द्यावें असें मला वाटू लागलें! माझ्या अगदीं ओंठावर आलें होतें म्हणायचें कीं, 'क्षुद्रांनो! या लावण्यमयीच्या अभिनयांत विरघळून जावयाचें सोडून तुम्ही तिचे दोष काय काढतां?' या दोघा वल्लींच्या रसिकतेचें प्रदर्शन म्हणजे खरा आधुनिकपणा होता. तन्मयता म्हणजे दुर्बळपणा आणि दोषदर्शन वा उपहास म्हणजे बुद्धिवाद, हें आधुनिकतेचें सूत्र मला सर्वस्वीं अमान्य होतें. या सूत्राचें आचरण न केल्यामुळेंच कदाचित् मी प्रेम व व्यवहार यांत अपेशी ठरलों असेन! असो. आपल्या दोन 'बुद्धिवादी' मित्रांच्या टीकेनें अनुराधा गोरीमोरी झाली होती. तिचा अहंकार चाळविला गेला. माझ्याकडे आपली करुण दृष्टि तिनें लावली. मी तिच्या रूपाच्या दर्शनांत व त्या दोघा 'बुद्धिवाद्यां'च्या मूर्खपणाचा विचार करण्यांत गुंग झालों होतों. अनुराधेची योग्य प्रशंसा करावयाची तीहि मी केली नाहीं. नुसत्या डोळ्यांनीं तिचा निरोप घेतला;

अनुराधेला काय वाटले असेल? त्या दोघा मित्राना क्षणक्षणींत उत्तर मी द्यावें अशी तर तिची अपेक्षा नव्हती? तिच्या कामानें झालेला माझा आनंद शब्दरूपानें व्यक्त व्हावा असें खास तिला वाटले असेल! पण—

अनुराधेच्या प्रणयपर कवितात आर्तता आणि कारुण्य हे विशेष भाव असत. ह्या कविता कुणाला उद्देशून आहेत असे विचारण्याची तीव्र जिज्ञासा मला होती. माझ्या नव्या कविता मी तिला दाखवीं. त्यात तिचे पूजन व स्तोत्र असे. पण तिनेहि केवळ वाङ्मयगुणाच्या चर्चेपलीकडे माझ्या कविता-विषयीं अधिक आस्था दाखविली नाहीं. तिने याबाबत संयम केला कीं तिला खरोखरीच माझ्या प्रेमविषयाचे कुतूहल नव्हते कोणास ठाऊक!

आमच्या मित्रपरिवारात एक श्रीमत मित्र होता. मोठा प्रेमळ अन् हुशार. पण आपल्या साधारण स्थितींतल्या मित्राचा मोठ्या घराण्याशीं ऋणानुबंध जडावा याचे त्याला मोठे वैषम्य वाटे. अशाने आपले महत्त्व कमी होईल याची त्याला धास्ती असे. अनुराधेशीं माझी मैत्री जडली तेव्हा तो बेचैन झाला. एक दिवस मला सागूं लागला, "माझा एक खुशालचेंडू स्नेही आहे. आपण अनुराधेचे प्रियकर आहों, असे तो सागतो." या विधानाच्या बळकटी-साठीं माझ्या मित्राला पुरावा असा कोणताच पुढे करता आला नाहीं. मीं तात्पुरता अस्वस्थ झालों खरा, पण तो माझ्या मित्राचा दोस्त हा काहीं अनुराधेच्या प्रेमगीताचा विषय मला वाटेना. रवीन्द्रनाथ ठाकुराच्या कोण-त्याशा एका कादबरींतली नायिका एक मनोमय आदर्श पुरुष कल्पून जन्मभर त्याची पूजा करते असें मीं वाचले होते. अनुराधेचे पूजन त्या तऱ्हेचें असावे असा माझा ग्रह मीं करून घेतला.

एके दिवशीं मी अनुराधेकडे गेलों असता ती विशेष खुषींत दिसत होती. मी आरामखुर्चीवर बसलों होतों. मला कौटुंबिक छायाचित्राचा संग्रह ती दाखवीत होती. समोर खुरमाडी घालून ती बसली होती. तिची एक चुण-चुणींत मैत्रीण जवळ होती. इतक्यात खालीं सायकलची घंटा वाजली. अनुराधा चमकली; सलज्ज व आनंदित होऊन ती दाराकडे धांवली. एक तरतरीत नाकेला व गोरा तरुण अगदीं पळतच वर आला. त्याच्याशीं बोलत ती आंतल्या दालनाकडे गेली. मी हें सर्व जरा गोंधळून पाहत होतों.

माझी मनःस्थिति ओळखून त्या चुणचुणीत मैत्रिणीनें म्हटलें, " हे कोण तुम्हाला माहीत आहे ना ?"

" नाहीं."

" वा, याच्याशींच तर अनुराधा लग्न करणार आहे !"

—पुढे तिथें मी थाबलोंच नाहीं ! त्या मैत्रिणीजवळच अनुराधेला निरोप ठेवून मीं घरची वाट सुधारली ! पण घरीं पोचायला किती वेळ लागला मला ! त्यानंतर अनेक रात्री अलोचन जाग्रणें घडलीं ! ! भोंवतालची स्वप्नसृष्टि हळूहळूं विरत होती ! दैवाने आपला भावभंगच नव्हे तर मानखंडनाहि केली असे वाटून अनंत यातना झाल्या ! ज्या उच्च श्रेणीच्या शाखेचा आधार मला मिळाला होता तेथून मला कोणी तरी खोल खोल ढकलून देत होते ! बडचे सूर ऐकूं येऊन माझ्या छातीचा घडघड वाढे ! एका रथात तो त्या दिवशींचा तरुण व अनुराधा बसली आहेत, दूर दूर जात आहेत, आणि तरीहि रथाची चाकें सारखीं माझ्या अंगावरून जात आहेत अशीं काहीं विचित्र, भेसूर, विसंगत स्वप्नें पडून त्यानीं यातना शतगुणित होत !

अनुराधेचें लग्न बादशाही थाटात झालें !

साऱ्या वेदना दाबून मी विवाहमंगलात भाग घेतला !

एवढ्या राजशाही गर्दीत अनुराधा मला विसरला नव्हती हे त्यातल्या त्यात समाधानाचे वाटलें.

अनुराधेच्या विवाहानंतर मी आणि अनुराधा यांची गाठ क्वचितच पडूं लागली. ती आपल्या नव्या जीवनात मग्न झाली. मी उदासीनतेचा जाच सहन करीत आपल्या जीवनाची व्यवस्था लावूं लागलों. अनुराधेमुळे ज्या गोष्टीची मी न कळत उपेक्षा केली होती त्याकडे नाइलाजानें परतलों. प्रथम मेल्यापेक्षा मेले झाले मला ! पण इलाज काय ? आत्मघात करण्याइतकें साहस जर माझ्या अंगीं असतें तर अनुराधेपुढे अंतःकरण उघडे नसते का केलें मीं ?

एके दिवशी एक गृहस्थ माझ्याकडे काहीं कामाकरितां आला. तो अनुराधेच्या ओळखीचा होता. सहज आठवल्यासारखे करून तो म्हणला, " हो ! परवां त्या अनुराधाताईकडे गेलो होतो. तुमचा विषय निघाला होता. त्या म्हणाल्या, ' त्याची माझी थोडी ओळख आहे.' "

' थोडी ओळख ' एवढेंच आपल्या मैत्रीचें स्वरूप अनुराधेच्या जीवनांत शिल्लक राहिले तर— !

एकदां मी ' बादशाहीं'त एकटाच चहाचे घुटके घेत बसलो होतों. समोर बसलेला एक तरुण माझ्याकडे टक लावून पाहत होता. त्याच्या कपाळावर खड्डा होता, गाल बसलेले होते, आणि टाळूवरचे केस पार झडून गेले होते. या सर्व रूपाला काळ्या गर्द रंगाची जोड मिळाल्यानें त्याचा भकासपणा विशेष खुलून दिसत होता. काहीं वेळाने धूर सोडीत तो माझ्याकडे आला आणि तोंडांतले सिगरेटचे थोटूक बुटानें विझवत मला खाजगी स्वरात म्हणाला, " का हो, त्या अनुराधाताईंच मॅरिड लाइफ काहीं हॅपी नाहीं म्हणतात, खरं का ? तुम्हांला माहित असेल नक्की म्हणून विचारतो."

मी बुचकळ्यात पडलो. " छे, अलीकडे त्यांची माझी गाठच पडत नाहीं महिनोगणती. " असे सांगून त्या विकृत मनाच्या जिज्ञासूला मीं वाटेला लावले ! पण मला मात्र माझ्या भावकल्लोळांतून बाहेर पडता येईना ! अनुराधा दुःखी का झाली ? आणि त्या दुःखाचे कारण मला माहीत असेल अशी समजूत अनोळखी माणसांतसुद्धा कशी फैलावली ? अनुराधेचा तर प्रीतिविवाह झाला ना ! का प्रीतिविवाहाचे पर्यवसान दुःखातच व्हायचे ही समाजाची ठाम कल्पना आहे ?...या प्रश्नमालिकेला काहीं उत्तरें सुचेनात. पण अनुराधेचे जीवन दुःखी आहे आणि त्याचे कारण मला माहीत आहे या लोकभ्रमाने तेव्हा तरी थोडा आनंदच झाला मला ! माझ्या या वृत्तीची आतां मला मोठी मौज वाटते !

अनुराधेचें काव्यलेखन चालू होतें. त्यांतले भाव तेच होते. अलीकडे तिच्या कविता हस्तलिखितांत वाचण्याचे भाग्य मला मिळत नसे. तरी आमच्यात कडवटपणा असा कोणताच नव्हता. दुरून मी तिच्या हालचालींचा कानोसा घेई. क्वचित् मुलाखतीसहि जाई. मला परम संतोषाची एकच गोष्ट वाटे कीं, लग्नापूर्वीची अनुराधेची काव्यमयता यत्किंचित् उणावलेली नाहीं; प्रसिद्धीचा हव्यास तिला नाहीं; आपल्या खाजगी जीवनाचा इतमाम आणि गूढता तिनें अबाधित ठेवली आहे.

एकदांच अनुराधेनें मला पत्र पाठविलें. ती बंगलोरला हवा पालटायला गेली होती. तेथून एक कविता तिने मला सहज पाहायला धाडली होती.

" साद ये चहुंकडे रम्य रानीं वनीं
कोठुनी उमटतो मूळ मंजुध्वनी. "

अशांसारख्या कांहीं ओळी होत्या त्या कवितेत. शेवटीं एवढेच लिहिलें होते—" पुष्कळदां मनात वाटते तेवढे शब्दात उतरवितां येत नाहीं, पण प्रयत्न केल्याशिवाय राहवत नाहीं. "

या काव्यावरून आणि गद्यावरून मीं काय समजावें मला कळेना ! ती याहून काहीं अधिक सागणे शक्य नव्हते. मला अधिक विचारण्याचा धीर नव्हता. आपला कांहीं उणाअधिक शब्द गेला तर ती आपणांला झिडकारील हे खरे भय होतें. समाजातल्या उच्च श्रेणीचा संबंध दुरावणे मला एक क्षणभरहि सहन झाले नसते.

बरोबर बारा वर्षे झालीं आमच्या मैत्रीला. अनुराधेची प्रीति नष्ट होईल या भीतीनेच अनुराधेपुढे मीं प्रेम व्यक्त केले नाहीं. या विचित्र विरोधाभासाने किती वेदना दिल्या आहेत मला ! नाहो म्हटलें तरी अनुराधेच्या प्रेमगीताचे स्फूर्तिस्थान शोधून काढण्याचा पुनःपुन्हा मोह झाला. आपणांबद्दल तिला वाटणाऱ्या भावनेचें स्वरूप आपणाला पाहिजे तसेंच आहे काय, ह्याचा निर्णय घेण्याची पुनःपुन्हा इच्छा झाली. भयाकुल होऊन मीं नंदनवन गमाविले तर नाहीं हा विचार मला कायम उदास करतो. माझी जन्माची मैत्रीण झालेली हीच ती उदासीनता !

पण तरीहि मी अनुराधेशीं कृतज्ञ आहे. तिच्या सहवासातला माझ्या जीवनाचा तेवढा भाग तिने कायमचा काव्यमय करून ठेवला. महाभारतातल्या मुंगुसाची प्रसिद्ध कथा अशा वेळीं मला आठवते. एका गरीब ब्राह्मणानें आपल्या पुढील ताट भुकेल्या अतिथीपुढे सरकविले; त्याच्या खरकट्यांत लोळून मुगुसाचे अर्ध अंग सोन्याचे झाले. पुढ धर्मराजाच्या यज्ञात हजारों अतिथींच्या समाराधनेच्या उष्टयात लोळूनहि त्या मुंगुसाचे राहिलेले अर्ध अंग सोन्याचे होईना ! अनुराधेच्या स्नेहानंतरहि प्रणयाच्या प्रचंड भोवऱ्यात मीं एकदोनदां सापडलों; अगदीं खोल खोल गेलों. पण अनुराधेने जीविताच्या एका लहान कालखंडाला जी रम्य काव्यमयता दिली तशी इतरत्र आलीच नाहीं. तो कालखंड आठवला कीं ती अवास्तवतेची मोहिनी अजून जशीच्या तशी प्रत्ययाला येते.

पण मला धीर झाला नाहीं म्हणून अनुराधेनें मन मोकळें केलें असते तर आपल्या जीवनाला स्वर्गीय बहार नसती का आली ?

पण तिला माझ्याविषयीं तशी मधुर भावना नसेल हेहि शक्य नाहीं का ?

या दोन समांतर रेषांवरून माझा मनोरथ मार्गेपुढे धावत असतो ! माझ्या व्यथित अंतःकरणाला पाहून उदासीनता हंसत असते.

' गो-वर्धन ' बंगला पाहून या साऱ्या चक्रात सापडलो होतो नाहीं का मी ? तिथून झटदिशी वळलों आणि तडक घरीं आलो. त्या दिवशीं रात्री सहज गमतीने स्वतःकरिता एक लहान समाधि-लेख रोजनिशींत खरडून ठेवला मीं—

" एका लावण्यमयीला ज्याला ओळखता आले नाहीं तो येथे महानिद्रा घेत आहे."

## शोभा : : : २

खानदेशातील त्या गावी मी नोकरीनिमित्त जेव्हा गेलो तेव्हा थंडीचा ऐन भर होता. रेल्वेच्या मुख्य फाट्यावरच हे गांव होते. कपाशीच्या व्यापाराचे ते केंद्र समजले जाई. मी अगदी हगामातच गेलों होतों. तिथे मोठा महोत्सव चालू आहे असा भास होई. त्या वर्षी पीक सोळा आणे आलें होतें. सर्वांचे चेहरे प्रफुल्ल दिसत. पोस्टाच्या दारीं—विशेषतः तारेच्या खिडकीशीं—दलालाचा व व्यापाऱ्याची ही झुंबड उडायची! जिन व प्रेस यातील यंत्राची घरघर सारखी ऐकूं येई. बैलगाड्याची रहदारी, बैलाच्या गळ्यातील घंटाचे व मोटर लॉरीच्या कर्ण्याचे आवाज, तट्टयाच्या उपाहार-गृहातील कपबशाचे खडखडाट या सर्वानी वातावरण अगदीं गजबजून जाई. दिवसभर श्रमून चार पैसे मिळविणारे, सायंकाळीं बाजार करून उरलेले पैसे ऐसपैस पागोट्याच्या पदरात खुबीने अडकवीत 'चळ रे सर्ज्या' म्हणून आपल्या बैलाच्या पाठीवर प्रेमानें थाप देणारे ते श्रमजीवी लोक म्हणजे आनंदाचीं चालतींबोलतीं प्रतीकें होतीं. सुखवस्तु व्यापारी, त्याचे गुमास्ते आणि दलाल याना तर संपत्तीची मोजदाद करता करतां जीवनाच्या नित्य कर्तव्यांना सुद्धां अवसर मिळत नसे. युद्धाच्या ज्वाळा भडकण्याचा काळ बराच लांब होता. आलेल्या 'हंगामी' सुबत्तेत हात धुऊन घेण्यात त्या शहरवजा गावामध्ये जो तो गढून गेला होता.

मी मात्र या उल्हासात भाग घेऊं शकत नव्हतों. माझ्या आवडत्या पुण्य-पुरींत राहून उच्च शिक्षण घेण्याचे संकल्प वितळले होते! माझीं सुंदर स्वप्नें नष्ट झालीं होतीं. अजाण आणि अननुभवी स्थितींत दैवानें मला वाऱ्यावर

सोडून दिलें होतें. जुने ऋणानुबंध दूर पडलेले, नवे मिळण्याची शाश्वती नाहीं; प्रतिष्ठा किंवा प्रेम संपादन करण्याची शक्ति अंगीं आहे की नाहीं याचाच संशय; व्यवहारांत जे सामने द्यायचे होते त्यासाठीं लागणारें बल व कौशल्य मुळींच कमावलेले नाहीं; यौवनानें आपल्या सरंजामाचा पहिला हप्ता काय तो जीवनाच्या ओसरींत आणून टाकलेला.. अशा स्थितींत उद्योगाने व संपदेनें फुललेल्या त्या गावात मी अगदीं एकाकी, परका, दुःखमग्न अशा वृत्तीनें राहू लागलो.

मी एकादा सामान्य माणूस असतो तर त्याहि परिस्थितींत सुख मानून राहिलों असतो. माझ्याबरोबर तिथे आलेले कित्येक कारकून, शिक्षक, तारमास्तर माझ्याच वयाचे होते. पण ते सर्व अगदीं अल्पावधींत त्या जीवनांत रंगून गेले. खानदेशी तूपदुधाचा आणि 'बाट्या'चा ( गव्हाचे पक्वान्न ) समाचार घेत, आला दिवस मजेत घालवू लागले. पण माझी काव्यमय वृत्ति मला त्या व्यवहारी समाधानापासून दूर खेचीत होती ! आयुष्यात प्रथमच भयकर निराशेचा धक्का बसून एकाद्याचा जीवनौघ बदलला म्हणजे प्रत्येक बाबतींत विफलताच येणार असे त्याच्या मनाला नेहमीं वाटत असते. माझे तसेच झाले होते. जिचें पहिलेच मूल एकाएकीं गेले असेल अशाच एकाद्या दुर्दैवी मातेला त्या वेळच्या माझ्या मनःस्थितीची कल्पना करता येईल !

पण एक दिवस माझी अनेक जन्माची पुण्याई फळाला आली, आणि भूमीवरील नंदनवनाचे दरवाजे उघडून तिने मला आत घेतले. शोभाचे दर्शन घडले !

माझ्याजवळचे सत्य अगदीं हिऱ्यासारखे तेजस्वी आहे. त्यावर कल्पनेची झिलाई चढविण्याची अवश्यकताच नाहीं. आणि म्हणून शोभाला मीं प्रथम केव्हा पाहिलें याचें वर्णन कल्पनेचे रंग भरून काहीं देत नाहीं. मी राहत होतों त्याच वाड्याच्या अर्ध्या भागात एक दिवस शोभाचें बिऱ्हाड आलें. आम्ही त्या दिवशीं कुठेंतरी सफरीला गेलों होतो. परत यायला खूप रात्र झाली. दिवसभरच्या श्रमानें खूप दमलो होतों. लगेच झोंपीं गेलों. दुसरे दिवशीं सकाळीं कोवळीं उन्हे खोलींत शिरलीं तेव्हां डोळे उघडले मीं. अंगावरचे पांघरूण तसेंच लपेटून खोलीच्या पुढील गच्चीवर आलों. वाड्याच्या दुसऱ्या भागावरील गच्चीकडे सहज नजर टाकली मीं. तों जळीं, स्थळीं,

अंतराळीं कधीं न पाहिलेला एक प्रकाश एकदम दिसला! पांढऱ्या पातळावर पांढराच लोकरीचा स्वेटर चढवून दूरच्या निळ्या टेकड्याकडे पाहत शोभा उभी होती!

अर्जुनाने विश्वरूप पाहिले तेव्हा आकाशांत हजार सूर्य एकाच वेळीं उगवल्यासारखा भास होत होता असे आपण वाचतों. शोभाला मीं पाहिलें त्या वेळीं हजार चंद्रांचा उदय एकदम झाल्यासारखा मला वाटला असें मी सहज म्हणूं शकेन. शोभा अगदीं कापुरासारखी गोरी होती. हातापायाच्या कडेकडेला किंचित् गुलाबी झांक दिसे. केश विपुल होते. आणि सकाळीं ते विसकटल्यामुळे आणिकच मोठे दिसत. डोळे विशाल व निर्मळ होते. किती खोल खोल गेलांत तरी कपटाचा कण हातीं लागणार नाहीं असे आश्वासन पहिल्या कटाक्षातच मिळे. नाक थोडे अपुरें आणि टोकाशीं थोडें जाड असल्यानें चेहऱ्यावरील भाबडेपणा जास्तच खुललेला दिसे. सदैव सांडणाऱ्या स्मिताला कसेबसे आवरून धरलें आहे असें जिवणीच्या मोहक ठेवणीवरून वाटे. शोभा हा एक सृष्टिचमत्कार होता!

मी तल्लीन होऊन शोभाकडे पाहूं लागलो. माझी व तिची दृष्टादृष्ट होताच तिने अगदीं निष्कपटपणें स्मित केले. आनंदाने माझा जीव अधिकच गुदमरूं लागला. पुढें शोभाचा आणि माझा दाट परिचय झाल्यानंतर मी कित्येकदां तिला विचारीं कीं, "अगदी पहिल्याच भेटींत ओळख असल्यासारखं तूं कां हंसलीस?" पण शोभाला माझ्या या प्रश्नाचें उत्तर देतां आले नाहीं. आणि मलाहि तें गूढ कधींच उकलले नाहीं!

त्यानंतर माझी वृत्ति पार बदलून गेली. शोभाचे जीवन न्याहाळण्यात माझ्या अपयशांचे फणकारे मी पार विसरलों. शाळेंतली माझी वागणूक पार बदलली. हा विलक्षण फरक कसा झाला हे माझे मलाच कळेना.

शोभा आणि मी पहिल्यानेच दोन शब्द बोललों त्याच्या दुसऱ्या दिवशींची गोष्ट.

मी शाळेंत गेलों तों दारातच आमचा हेडमास्तर उभा होता. इंग्रजीचा गंध नसलेला हा एक खुनशी व कारस्थानी माणूस होता. हिरड्याबेहेड्याची वैद्यकी आणि कुडमुडें जोतिषपण हे त्याचे जोडधंदे होते. हाडकुळा चेहरा

आणि तिरवे डोळे यांमुळें चेहऱ्यावरील भेसुरपणा अधिक तीव्र होई. लहाना-पासून मोठ्यापर्यंत सर्व लोक आपल्या नाशाचीं गुप्त कारस्थानें करण्यांत दंग आहेत अशा संशयाने तो नेहमीं जगाकडे पाही. आज मला त्याने हटकलें आणि म्हटलें, "हें पहा, इंग्रजी मास्तर, डेप्युटीसाहेबाची तुम्हीं स्टेशनवर परस्पर गाठ घेतली असं कळलं. ही रीत नाहीं एवढंच सांगतों." असे म्हणून तो थांबला. त्याच्या डोळ्याच्या कोनाचा आता मला अंदाज आला होता. बाजूच्या अजंठ्याच्या डोंगराकडे तो पाहूं लागला तेव्हा माझ्याकडेच तो रोखून पाहत आहे हे मीं हेरलें. मीं थोड्या छद्मी स्वरांत म्हटलें, "मास्तर-साहेब, गाठ घेतली आणि गाठ पडली हे दोन प्रयोग वेगळे आहेत हे आपल्यासारख्या थर्ड इयर ट्रेन्ड माणसाला मीं सांगायला पाहिजे असं नाहीं." इतके बोलून मी सही करायला गेलों. "पोरगं पहिल्यानं नरम होतं, पण आता कान फुटलेले दिसतात." हे हेडमास्तरचे उद्गार मला ऐकूं आले. तो दिवसभर तणतण करीत होता. नेहमीं अगदीं मवाळपणे वागणाऱ्या इंग्रजी मास्तरनें हेडमास्तरना चापलें याचा सर्वांनाच अचंबा वाटत होता!

शोभाचा आणि माझा स्नेह वाढत होता.

शोभाचे आईवडील प्रेमळ होते. लौकरच मी त्यांच्या घरातल्यापैकीं एक झालो. जहाज बुडाल्यानंतर एका फळीला लागून सुंदर बंदराला लागावें तसें मला वाटलें. शाळेचे काम कसेंतरी आटपायचें आणि मग सारा वेळ शोभाच्या सहवासांत घालवावयाचा हा माझा रमणीय दिनक्रम होऊन बसला. तिच्या-बरोबर बाजारांत जायचें; तिला फुले आणून द्यायचीं; कागदाचें कातरकाम करून किंवा चित्रें रेखाटून तिची खोली शृंगारायची, या किंवा अशाच गोड व्यापात माझा दिवस जाई. जगविख्यात अजंठ्याचीं लेणीं त्या गावाहून अगदीं जवळ होतीं. तिथे अनेकदां आमच्या शाळेंतील मंडळींनीं सफरी काढल्या. पण शोभा एक दोन दिवस दृष्टीआड होईल एवढ्याचसाठीं मीं त्या लोकोत्तर शिल्पाचे दर्शन घ्यायची संधि दर वेळीं घालविली.

कधीं कधीं शोभाकडून मी इंग्रजी पुस्तकें वाचून घेई. तसें पाहिले तर मनापासून तिला शिकण्याचा कंटाळा असे. पुस्तकाचा मांड मांडून बसावयाचें आणि इतरच कांहीं उद्योग करीत वेळ घालवायचा अशी तिची रीत असे. "भाई, समुद्र केवढा मोठा असतो हो? आपली गिरणा नदी पावसाळ्यात

भरते तेवढा का ? " " विमानाना पतगासारखी दोरी धरून कोणी उडवितं का हो ? " " जुळीं मुलं आईच्या पोटात भाडत कशी नाहींत हो ? " हे व असे विचित्र प्रश्न शोभा विचारी. यौवनात तिनें पहिले पाऊन टाकलें होते. पण तिचे मन लहान अर्भकासारखें होतें. कित्येकदा ती एक प्रश्न विचारी आणि त्याचे उत्तर मी देऊं लागलों कीं त्या प्रश्नांतली तिची उत्सुकता संपून दुसराच विषय ती बोलूं लागे. हास्याचें मधुर संगीत तर सारखेंच चाललेलें असे. एकादे वेळ बोलता बोलता 'थाबा, तुम्हांला गंध लावते' असे म्हणत, लाल शाईत टाक बुडवून ती माझ्या कपाळावर गंधाची आकृतीच काढूं लागे. आपल्या तरुण व भावनाप्रधान 'भाई'च्या हृदयाचीं स्पंदने यायोगें आपण किती वाढवीत आहोत याची त्या निर्व्याज बालिकेला पुसट तरी कल्पना होती का ?

कामदेवाचें शरसंधान चालू होते. पण मी दरवेळ मनावर विजय मिळवीत असे. माझ्या जीवनाच्या सहाऱ्यात जिने माझ्यांतली काव्यमय वृत्ति कायम ठेवली आणि जगाचे मंगल स्वरूप दाखविलें त्या बालदेवतेविषयीं विचार करताना पार्थिव पातळीवर उतरायचें नाहीं हा माझा निर्धार होता. हा निर्धार टिकला याचें श्रेय फारच थोडें माझ्याकडे आहे. शोभाचें निर्व्याज सौंदर्यच इतकें प्रभावशाली होते कीं, त्याच्या सान्निध्यांत माझा निर्धार टिकण्यास फारसे श्रम पडत नसत.

एकदा संध्याकाळची वेळ होती. शोभा माझ्यापुढे पुस्तक घेऊन बसली होती. तिचा एक हात पुढें दिव्याच्या प्रकाशात चकाकत होता. त्याचा गुलाबी शुभ्र रंग व लुसलुशीतपणा इतका आकर्षक वाटला मला की मोहवश होऊन मीं तो हात हातात घेतला. वास्तविक शोभा आणि मी याचा स्नेह इतका दाट झाला होता कीं, एवढा स्पर्श म्हणजे मामुली गोष्ट होती. पण माझी छाती धडधडूं लागली. तरी शोभाला काहीं विपरीत वाटूं नये म्हणून तिचा हात मीं काहीं वेळ तसाच हातांत ठेवला. मात्र शिकवणी लौकरच आटोपून मी तडाख्यानें गांवाबाहेर फिरायला गेलों. दुसरे दिवशीं संध्याकाळपर्यंत मी शोभापुढे गेलोंच नाहीं. पुनः त्याच वेळीं शोभा तशाच पद्धतीनें बसून वाचीत होती. काहीं वेळ झाल्यावर तिनें एकदम विचारलें, " भाई, आज हात नाहीं हातांत घेतला ? " तिच्या त्या विचारण्यात इतका सरळपणा होता कीं,

आदले दिवशीं क्षणिक का होईना, मी मोहवश झालों याची मला लाज वाटूं लागली.

माझी अगदीं पहिली-वहिली कविता छापून आली ती शोभाला उद्देशूनच होती. अर्थात् हें मी तिला सांगितलें नव्हतें आणि कवितेतला अर्थ समजून घेण्याच्या भानगडींत ती कधींहि पडली नसती. पण एका सुंदर मासिकात आपल्या भाईचें नाव छापून आले याचा कोण अभिमान वाटला तिला सारा दिवस तो अंक घेऊन त्यातले माझें नांव ज्याला त्याला मोठ्या उल्हासाने ती दाखवीत होती. संध्याकाळीं अंक परत देताना मला ती म्हणाली " भाई, कविता कशा हो सुचतात तुम्हांला ? "

" एकादा चांगला विषय मनांत असला म्हणजे मनातल्या मनांत ओळी घोळूं लागतात...... "

मी आपल्याकडून कवितेच्या उत्पत्तीविषयीं सुबोधपणे सागत होतो, तें तिला उमगलें कीं नाहीं कोण जाणे ! पण मध्येंच गडबडीने तिने विचारले " चांगला विषय म्हणजे काय हो ?"

" अग, सुरेख फूल, ओढा, मूल... "

" एकादी मुलगी सुद्धां ? "

" हो हो तर ! तुझ्यासारखी सुन्दर मुलगी हा तर काव्याला उत्तम विषय. "

" मग माझ्यावर लिहा ना कविता. खरंच लिहा... केव्हा लिहाल ? "

या भाबड्या जिवाला काय सागावे मला कळेना !

सकाळीं विहिरांवरून स्नान करून आलों कीं " आश्रमभजनावलीं " तलीं दोन-चार गीतें म्हणायचीं असा माझा परिपाठ असे. असाच एकदां काहींशा गंभीर स्वरात मी म्हणत होतो—

" दुःस्वप्ने आतङ्के
रक्षा करिले अङ्के
स्नेहमयि तुमि माता...जय जय जय हे..."

इतक्यात शोभा आत आली. " भाई, कुणाची कविता म्हणतां आहा तुम्ही ? "

भिंतीवरील रवीन्द्रांच्या फोटोकडे बोट दाखवीत मीं म्हटले, " याचीं. "

" फार मोठे कवि आहेत हे ? "

" अतिशय. सगळ्या जगात हे ठाऊक आहेत. याना एका कवितेच्या पुस्तकाबद्दल एक लाख रुपयाच बक्षिस मिळालं आहे, शोभा ! "

" भाई, तुम्ही करता छान छान कविता. तुम्हालाहि तसं बक्षिस मिळेल. केवढा ढीग होईल एक लाख रुपयाचा ! या पलगाएवढा सहज होईल ! भाई, काय कराल हो एवढ्या पैशाचं ?...... "

माझे डोळे भरून आले ! तिच्या कपाळावरील भुरभुरणारे केस नीट बसवीत मीं म्हटलें, " शोभा, किती वेडी आहेस ग तूं ? " इतक्यात आईची हाक कानी आल्यामुळे शोभा पळत पळत घरीं गेली.

शोभा ही एक दिव्य कविता होती. तिचा अर्थ जो जो लावूं लागावे तो तो नवीनवीच गूढता प्रत्ययाला येई. एका चादण्या रात्रींचा तो प्रसंग मी जन्मात विसरणार नाहीं. आपली प्रतिभा आणि भाषा अगदी पंगू आहे याची विलक्षण जाणीव मला त्या प्रसगानें प्रथमच झाली.

पूर्णिमेचे स्वच्छ चादणे पडले होतें. अगदीं सामसूम झालेली. एखाद्या जागल्याचा गस्तीचा शब्द ऐकूं येईल तेवढाच. मला आज का कोणास ठाऊक झोप मुळीच येत नव्हती. मी माझ्या गच्चीवर येरझारा घालूं लागलो. सहज म्हणजे अगदी सहज शेजारच्या गच्चीकडे मीं दृष्टिक्षेप केला.

शोभा जागी होती. अथरुणावर बसून वर आकाशाकडे पाहत होती. गळ्यातली सुवर्णमाला केसावरून कपाळावर बिंदीसारखी बसविण्याचा तिचा चाळा चालू होता. त्या सुवर्णमालेच्या महिरपीखालीं विपुल केसानीं अ॰ ग-दिलेले तिचे मुग्ध मुखमडल चद्रप्रकाशात झळकत होते. मधून मधून आपले गोरे गोरे हात चंद्रप्रकाशात धरून शोभा न्याहाळात राही. हाताच्या बोटा-तून साडणाऱ्या चंद्रकिरणांची तिला गंमत वाटत होती कीं काय कोण जाणे ! मध्येंच ती तोंडाने काहीतरी पुटपुटत होती. बहुधा मीं आदले दिवशी शिकविलेली इंग्रजी कविता ती असावी. अर्थासाठीं नव्हे तर इंग्रजी उच्चाराची गंमत म्हणून ती कविता शोभाला आठवणे शक्य होते. त्या दृश्याने अगदीं वेडावूनच मी तिला ऐकूं जाईल एवढ्या उंच स्वरात म्हणूं लागलों.

"निजलीं शेते, निजलें रान
निजले प्राणी थोर लहान
तरीहि जागी फुलराणी ही
आज कशी ताळ्यावर नाहीं !
डोळ्याला लागेना डोळा
काय जाहलें फुलराणीला"

या ओळी ऐकून ती कमालीची ओशाळली. आपल्या एकातातील मोकळेपणाकडे कोणाची दृष्टि असेल अशी तिची कल्पना नव्हती. पण एवढ्या एकातात मी तिच्याकडे पाहत आहे, एवढेच नव्हे, तर तिच्या वर्णनाला जुळेशा काव्यपंक्ति उच्चारीत आहे हें पाहून ती अतिशय लाजली. एकदम डोक्यावरून पाघरूण घेऊन ती झोपली. नंतर तीनचार दिवस माझ्यासमोर ती आली नाहीं.

अशा मधुर घटनानीं वर्ष केव्हा गेले तें कळलेहि नाहीं. कपाशीचा हंगाम संपला. कडक उन्हाळा येऊन तो हळूंहळूं कमी होत गेला. मुसळधार पावसानेहि आपला प्रभाव दाखविला. पुनः गुलाबी थंडी पडूं लागली.

भूतभविष्याबद्दल विचार न करता शोभाच्या सहवासात मी धुंद होऊन वावरत होतों.

पण अचानक प्राप्त झालेल्या त्या नदनवनातून मला एके दिवशीं दैवाने बाहेर ढकलून दिले !

एके दिवशीं सध्याकाळीं मी घरीं आलों. वाड्यासमोरच्या हिरवळीवर शोभा नेहमींप्रमाणे आपल्या मैत्रिणींसह खेळत बसली होती. मला पाहतांच ती धांवत पुढे आली आणि म्हणाली, "भाई—भाई, आतां आम्ही जाणार दुसऱ्या गांवीं. तिथं म्हणतात खूप मोठं तळं आहे. त्यात नाव चालते. करवंदं आहेत—"

मी स्तंभित झालो ! शोभाला नुसते "हुंः हुंः" म्हणत मी खोलींत शिरलो आणि पलंगावर अंग टाकलें ! शोभा परत खेळायला निघून गेली ! रात्री दिवा न लावताच मी तसाच पडून राहिलो होतों. शोभाचे वडील रात्री परत आले तेव्हां त्याना म्हणतांना मीं ऐकलें, "अरे, आज भाईच्याकडे सामसूम दिसतंय्. कुठं गांवाला गेले कीं काय ?" मग मी भानावर आलों !

शोभा आतां मला सोडून जाणार म्हटल्यानंतर माझे अपेशी जीवन

नव्या तीव्रतेने मला वैराण वाटूं लागले. पुनः मला क्षुद्र गोष्टींशीं जमवून घेतलें पाहिजे, दररोज पुढें येणाऱ्या सामान्य व्यवहारात रमायला शिकलें पाहिजे याची जाणीव होऊं लागली. दिव्यतेचीं वस्त्रे उतरून ठेवल्यानंतर आलेला कंगालपणा हाच आतां जन्माचा सोबती आहे हे कठोर सत्य पचविल्याशिवाय गत्यंतर उरले नाहीं!

शोभाला माझ्या विरहाचें भयंकर दुःख होईल, ती अहोरात्र अश्रू गाळीत बसेल अशी माझी कल्पना होती. पण तसें काहीं न दिसल्यामुळे माझ्या वेदना फार असह्य झाल्या. शोभा आपणाला अंतरणार यापेक्षा आपल्यापासून दूर जाण्याचें दुःख तिला काहींच नाहीं यामुळे माझे मन अधिक भडकले होते! लहानपणापासून तिला कुठें जायला मिळाले नव्हते. मोठा प्रवास हा असा तिचा पहिलाच होता. त्यामुळे नवे ठिकाण कसें असेल, प्रवासात काय गंमत येईल याच कल्पनाचित्रात ती तल्लीन होती. तिच्या भाबडेपणाचा तेव्हा मला मनस्वी राग आला. भाबडेपणाचे हृदयशून्यतेशीं तर नाते नसेल असेहि वाटलें. पण एका मधुर स्नेहात आलेला तुटकपणा दिसताच लगेच अखिल स्त्रीजातीविषयीं अथवा प्रेमाविषयीं काही कडवट सिद्धात ठाम करण्याइतका मी प्रखर 'बुद्धिवादी' नव्हतो.

शोभाचा जाण्याचा तो उदास दिवस उजाडला! सकाळपासून आकाशात मळप आल्यासारखे झाले होतें. शोभा मधूनच एकादे वेळ येऊन जाई. पण काय बोलायचे ते न कळल्यामुळे स्वस्थ उभी राही. गंभीर मुद्रा करून राहिलेली तिला मीं कधीं पाहिली नव्हती. त्यामुळे मला कसेसेच वाटे. पण तिची गंभीरता क्षणिकच असे. दुपारीं स्टेशनवर मी तिला पोचवायला गेलो. घंटा झाली. शोभाच्या वडिलानी मला जवळ घेऊन सागितले, "भाई, जपून रहा, लहान आहात तुम्ही; तुमच्या वर्षानुवर्षाच्या चागुलपणावर तुमच्या क्षणाच्या चुकीचा फायदा घेऊन निखारे ठेवायला जग मागेपुढे पाहणार नाहीं. तुमचं देव चागलं करणार आहे..." मला हुंदका आवरेना. शोभा हे लावून पाहत होती. पण तिला माझ्या विव्हलतेचा अन्वयार्थ काहींच कळला नाहीं!

गाडी आल्यानंतर मोठ्या लगबगीनें शोभा गाडींत चढली. गाडी सुटली तोंच शोभाचें आक्रंदन सुरू झालें. तिचा 'भाई...भाई' हा आवाज ऐकूं येत होता आणि अश्रूंचे ओघळ दिसत होते! परत येतांना मला कितातरी

बरें वाटत होतें. शोभाचा आपल्याविषयींचा स्नेहबंध इतक्या उत्कृष्ट रीतीनें प्रकट झाला यामुळें तिचा वियोग होतांनाहि मला एक प्रकारचें समाधान वाटत होते.

शोभा त्या गावाहून गेल्यानंतर माझ्याहि जीवनाला विचित्र कलाटणी मिळून मी परत पुण्यास आलों. माझे एका काळचे मनोरथ कोणते होते हा विचार बाजूला ठेवला तर आजचें माझें जीवन जगाच्या दृष्टीनें तरी फारसें दुःखकारक नाहीं. शोभा मला पुनः कधींच भेटली नाहीं. कोणत्या सागराला अखेर ती नदी जाऊन मिळाली कोणास ठाऊक! पण माझ्या जीवनात तिचा कृपाप्रसाद फार मोठा आहे. खानदेशातील नद्याच्या वाळवंटात कित्येकदां बागाईत करतात. त्या नद्याच्या ओलाव्यावर बागा फुलतात. माझ्या आयुष्यांतील भकास कालखंडात माझी काव्यवृत्ति शोभाने अशीच ताजीतवानी ठेवली. आज जगातील मंगलाचे व सौंदर्याचें दर्शन मला प्रसन्न करते हें शोभाच्या कृपेचेच फल होय. जेव्हा एकादा दिव्य भास जीविताला स्पर्शून जातो तेव्हा शोभाची स्मृति नव्या तेजाने जागृत होते. परवांच बायबल वाचत असता, योहानने ख्रिस्ताला जार्दन नदींत धर्मदीक्षा दिली तो भाग आला. " इतक्यात आकाशाचे निळे दरवाजे उघडले आणि एक पांढरे शुभ्र कबूतर येशूच्या डोक्यावर येऊन बसले." ह्या रमणीय प्रसंगाचें चित्र पुढें दिसूं लागते न लागते तोंच अगदीं प्रथम पाहिलेली शोभाची शुभ्रवसना मूर्ति मनासमोर आली. त्या मूर्तीच्या दर्शनानें तल्लीन होऊन ओलावलेल्या डोळ्यानींच मीं बायबल मिटले!

## कांचन : : : ३

मीं लहानपणीं कुठल्याशा पुस्तकात एकदा वाचले कीं जास्तींत जास्त उल्कापात नोव्हेंबर महिन्यात होतात. आणि त्याच वर्षी नोव्हेंबरमध्यें मी आस्थेने आकाशदर्शनाचा कार्यक्रम काहीं रात्रीं चालू ठेवला. खरोखरच पाच सहा तरी तेजस्वी तारे तुटलेले मीं पाहिले! पुस्तकांत वाचलेल्या सत्याचा असा उदास दृक्प्रत्यय आल्यामुळें नोव्हेंबर महिना आला कीं अकारण व्यग्रता मनाला येऊं लागते. रात्रीं आकाशात गुरुशुक्रासारख्या खंबीर व तेजस्वी ताऱ्यांकडे पाहिलें तरी भीति वाटते. याची कक्षा सुटून हे तर खालीं नाहींत ना कोसळणार असा धसका वाटतो.

या भावनेला माझ्या जीवनात घडलेल्या काहीं जिवलगाच्या चिरविरहा-मुळे फारच तीव्रता आली आहे. गेल्या बारा वर्षातील नोव्हेंबर महिन्याचा पट डोळ्यासमोर आला म्हणजे कित्येक समाधि दिसू लागतात. आबा याच महिन्यांत निवर्तले. आमची लहानगी विजयालक्ष्मी याच महिन्यात गेली, माधवरावाची पुण्यतिथि याच महिन्यात साजरी होते आणि काचनचा स्वर्गवास एका दूर खेड्यात याच महिन्यात झाला!! वास्तविक माझा वाढदिवस या महिन्यात येतो. पण या साऱ्या जिवलगाच्या पुण्यस्मृतीने मनात इतकें धुकें साठते कीं आपल्या जन्मदिनाचा उत्सव करण्याची उभारीच मला नसते. विशेषतः जिच्या अंतकाळीं मी हजर राहूं शकलो नाहीं त्या कांचनचें स्मरण होऊन मी कुठल्याहि मंगलकार्यात भाग घेण्याच्या स्थितींत राहत नाहीं.

काचनची माझी ओळख झाली तेव्हा मुंबई-कल्याण मार्गावर एका उप-

नगरांत मी राहत होतों. तारुण्याच्या आरंभीं कांहीं काळ जी भ्रमन्ती वांट्याला आली होती तीमधील एक वर्ष या उपनगरांत मीं काढलें. येथून मी कॉलेजला जाई. रोजच्या कार्यक्रमात लोकलचा कंटाळवाणा प्रवास आणि हृदयात उद्याची भेसुर विवंचना हे दोन त्या काळचे ठळक विशेष होते. कॉलेजच्या सृष्टीतलें रम्यपण मोहिन करी. पण हा आनंद फारच थोडा वेळ टिके. आपण येथे उपरे आहोंत आणि या स्वर्गातून केव्हा आपणाला ढकलून दिलें जाईल याचा नेम नाहीं ह्या जाणीवेने काव्यमय आनंदाचा चक्काचूर व्हायला फार वेळ लागत नसे !

भूक नसताना बळेबळे दोन घास खाऊन स्टेशनवर यायचे. नऊ वाजून कांहीं मिनिटांनीं आमची लोकल येई. गर्दी आणि जागा यांची विषमता तेव्हां नसे. बाहेरच्या फळीवर लोंबकळत जाण्याची पाळी तेव्हां कोणावरच येत नसे ! मुंबई शहरात तेव्हां दारूबंदी नव्हती. त्यामुळें मुंबईची सरहद्द सावधगिरीनें ओलांडून मग उपनगरात ' जिवाची मुंबई ' करताना बेसावध झालेले व मित्रांच्या किंवा पोलिसाच्या मदतीनें अर्धवट शुद्धींत परत चाललेले ' तळिराम '–छाप उतारू त्या वेळीं नसत. ठरींव टोळकीं ठरलेल्या जागा ऐसपैस अडवून बसत. मधून मधून पान चघळत पत्ते खेळतांना हे लोक इतके तल्लीन आणि घरगुती होत कीं ऑफिस आणि घर याना जोडणाऱ्या या लोकलच्या धावत्या पुलावरच काय तो खरा जीवनानंद याना मिळतो असें मला वाटे. कांहीं ' जादा गंभीर लोक ' राजकारणावर तोच तो काथ्याकूट दररोजच्या बातम्याच्या आधारे करीत. शीव-माटुंग्यापर्यंत यांच्या कपाळाच्या नि कानशिलाच्या शिरा अगदीं तटाटून गेलेल्या मला रोज दिसत. विद्यार्थी असत त्यांच्या चेहऱ्यावर मार्गप्रतीक्षेची हुरहूर दिसे ! अर्थात् मी यांपैकीं कुणातच पडत नसल्यानें या उतारूंच्या गर्दींत अगदीं एकाकी पडें.

कदाचित् यामुळेंच असेल कल्याणहून नियमानें येणाऱ्या एका उमद्या तरुणाला माझ्याबद्दल कुतूहल वाटूं लागलें. एकदां ' चला, दादर आलं.' असे अर्धवट आपल्याशीं म्हणत माझ्याकडे पाहून तो प्रसन्नपणें हसला. दुसरे दिवशीं माझ्याकरितां त्यानें कल्याणलाच जागा धरून ठेविल्याचें निदर्शनास आलें. कारण आमच्या स्टेशनात गाडी शिरतांच शोधक नजरेनें तो बाहेर पाहूं लागला आणि प्लॅटफॉर्मवर मी दिसतांच ' या हो ' म्हणून त्यानें मला

बोलावले. हळूंहळूं मैत्रीचे एक एक टप्पे ओलाडीत आम्ही निःशंकपणे आपल्या मनांतील आशानिराशाची देवाणघेवाण करूं लागलो.

या माझ्या देखण्या मित्राचे नांव हेमंत होतें. उताराला लागलेल्या सरंजामशाहीचा तो एक घटक होता, असे मी त्याच्या बोलण्यावरून ओळखले. मी त्याच्या स्वास्थ्याचा हेवा करी आणि माझ्या स्वावलंबी जीवनाबद्दल त्याला आदर वाटे. कल्याणला आपणाकडे येण्याचा आग्रह तो मला दररोज करी आणि त्या आग्रहाला मान देण्याचे मी दररोज आश्वासन देई. मात्र पुष्कळ दिवस ते कृतीत उतरवूं शकलो नाहीं.

अखेर तो योग एकदा आला. कल्याणला कसला तरी उत्सव होता. तो पाह्यला रात्रीं मी गेलो. उत्सवाच्या जागीं एक प्रचड मंडप टाकलेला होता. मी तेथे पोचलो तेव्हा कुणी गायनाचार्य स्वराशी झोंबाझोबी खेळत होते. जपानी लोकात 'हाराकिरी' करतांना देवापुढे बसून एका अणकुचीदार हत्याराने माणूस स्वतःचीं आंतडीं बाहेर काढतो म्हणतात! गायन हें असेच एकादे तीक्ष्ण हत्यार आत्मघातासाठीं योजायचे असते अशी या सगीताचार्याची समजूत झाली! "हट जा, हट जा, हट जा." असे कर्कश शब्दात जीव काढून तो म्हणत होता. चीजेतला हा सदेश बुवाकडून पार पाडून घ्यायला पाहिजे असे वाटूं लागले!

बुवाच्या अशा गाण्यानेंहि न कटाळता कितीएक लोक कुतूहलाने का उभे आहेत हे मी पाहूं लागलो आणि त्या लोकाच्या दृष्टीच्या रोखाने नजर फिरविली तेव्हा स्वयंसेविकाची मुख्य नायिका माझ्या दृष्टीस पडली. लोकांची तल्लीनता सार्थ होती. आसपास उभे असलेल्या रसिक लोकाच्या कुजबुजींतून जें नाव उमटत होते तेच खास हिचे नाव असले पाहिजे. 'काचन.' त्या मनोहर व्यक्तीइतकेंच नाव अपूर्व वाटलें मला. एक हात कमरेवर ठेवून काचन उभी होती. काळेभोर केस आणि हिमानी वर्ण या तिच्या तेजस्वी सौंदर्यविशेषांच्या अगोदर तिच्या बांध्याचा डौल नजरबंदी करून टाकी. सडपातळपणाची ऐट गोडसपणाने बिघडविली नव्हती. निळ्या आणि लाल रंगाचे प्राधान्य असलेला तिचा पोषाख उंची होता, पण भडक नव्हता. लग्नाकार्यांत ज्या लावण्यमयींच्या अस्तित्वाने वृद्धाना निश्चिंती वाटते, तरुणानां

उत्साह येतो, आणि मुलाना आपला आनंद शतगुणित झाल्यासारखा वाटतो अशा व्यक्तींपैकीं कांचन होती.

एकादा उत्कृष्ट उतारा वाचला कीं, आनंदानें क्षणभर आपण पुस्तक मिटतो. जणूं तो उतारा डोळ्याआड करून आपणांला त्यांतल्या सौंदर्याचा आनंद स्मरणाने मिळवायचा असतो. माझें असेच झाले. काचनपासून दूर जावे आणि तिच्या मनोमय झालेल्या मूर्तीचेच निरीक्षण करावे असे वाटलें आणि मी मंडपाबाहेर आलों.

इतक्यात मला हेमंत भेटला.

" वाः अखेर आलात कल्याणला. आज तुम्हाला घरीं आलंच पाहिजे."

हेमंताची ही आपुलकीची भाषा मला आज फारच आल्हादकारक वाटली. का कोणाला ठाऊक, त्याच्या चेहऱ्याकडे पाहिल्यावर काचनच मला आग्रह करीत आहे असा गोड भास झाला! पण लागलीच माझे मलाच हंसूं आलें! काचनने एकदम केवढी पकड घेतली एवढाच काय तो अंदाज आला.

" चला चादणं झक्क पडलं आहे. आपण अगोदर जरा खाडीवर जाऊं. तुमच्यासारख्या कवीला स्फूर्ति येईल, पहा!" असे हेमंत म्हणाला.

आम्ही खाडीच्या रोखाने चालूं लागलो. इतक्यात कमलीशी आठवण होऊन हेमंत म्हणाला, " थाबा, ताईला सागून येतो. म्हणजे गाणं संपल्यावर तिकडेच येईल ती." तो जवळजवळ धावतच मंडपाकडे गेला आणि लागलीच परतला.

खाडीवर वाळवंटात एक होडी पडली होती. तींत बसून आम्ही गप्पा मारूं लागलो. होडीच्या तळाशीं पाणी होतें. त्यात माझें व हेमंतचे लक्ष जाई. आम्ही बोलतां बोलता आपापलीं प्रतिबिंबे त्यात पाहत होतों. इतक्यात दूर हेमंतचें लक्ष गेलें. "अरे वा, आलीच ताई!"

आश्चर्याने माझ्या मनाला वेड लागायची पाळी आली!

" काचन ही हेमंतची बहीण तर—" मीं मनात म्हटले!

काचन झपाझप पावले टाकीत जवळ आली. हेमंतनें विचारले, " ताई, सपलं का गाणं?"

" का रे दादा! तूं मला आपल्या नेहमींच्या जागीं जातों म्हणून सांगायला आलास, तेव्हाच भैरवी नव्हती का सुरू झाली!"

" असं अस्सं...श्रोत्यांचा अपमृत्यु टळला तर...बरं, ते जाऊं दे. हे माझे मित्र भाई— ही माझी बहीण कांचन."

" बरं झालं, आलात. आमचा दादा दररोज तुमच्याबद्दल इतकं चांगलं चांगलं सांगायचा कीं तुमची केव्हा भेट होईल असं झालं होतं."

" हेमंतचं वर्णन अतिशयोक्तीचं आहे असं तुम्हाला लौकरच कळून येईल." मीं जरा हंसून म्हटलें.

" असं वर्णन करायला तो कांहीं तुमच्यासारखा कवि थोडाच आहे. खरंच. एकादी कविता बोला कीं. मला स्वतःला गाणं बोलता येत नाहीं पण गाणं ऐकायला फार आवडतं."

" कांचनताई, मी गाणारा कवि नाहीं, गुणगुणणारा आहें. पण ती गुणगुणसुद्धां तुम्हाला फार कर्कश वाटेल."

" भाई, ती भीति सोडा." हेमंत मिष्किलपणें म्हणाला. " जाकोबाबादचा उन्हाळा ज्यानं काढला त्याला वऱ्हाडखानदेशात कितीसा त्रास होणार! कांचन आताच कोणत्या गाण्याला तोंड देऊन आली आहे तें ठाऊक आहे ना? मग त्यापुढें तुमचं गाणं असून असून कितीसं रुक्ष असणार?"

आम्ही सर्वच हंसलों. बहिणभावांचा फार आग्रह पडला म्हणून मीं माझी कुठली तरी कविता म्हटली. ती कविता आता मला आठवत नाहीं. पण कांचनच्या उज्ज्वल वर्णावर परावर्तित होणारा तो चंद्रप्रकाश, खाडीचें तें मनोहर दृश्य, क्वचित् दुरून ऐकूं येणारी आगगाडीची शीळ, खूप लांब दिवाळींतल्या किल्ल्याप्रमाणें दिसणारा तो बाबामलंगचा डोंगर–सारें सारें कांहीं अगदीं कालच रात्रीं पाहिल्याप्रमाणें आठवतें. मी कविता म्हणत असता होडींतील तळच्या पाण्यात कांचन डोकावून पाहत होती. एकादी जलदेवताच खालीं आहे असा भास होत होता. या रमणीय देखाव्याचें चित्र माझ्या मनोमंदिरांत इतकें ताजें आहे कीं, त्याचे रंगहि अजून पुरेसे वाळले नाहींत! कधीं कधीं तें चित्र मी आंतल्या दृष्टीनें न्याहाळूं लागलों की माझें जीवित त्या मोडक्या होडीप्रमाणें वाळवंटांत निकामी होऊन पडलें आहे आणि त्यांतल्या भावनेच्या जळांत रूपसुंदर कांचनचें कांहींसें करुण

मुखमंडल प्रतिबिंबित झालें आहे असे एक प्रतीक सुचते. काचनची स्मृति तीव्र होते. आणि निराशेचे फणकारे जोराने सुरू होतात!

त्या रात्रीं उशीर फार झाल्यामुळें मी काचनच्या घरीं न जातां शेवटची लोकल गाठली. आणि दुसऱ्याच रविवारीं सकाळीं प्रसन्न अंतःकरणाने कल्याणला येऊन कांचनच्या वाड्यात पाऊल टाकले.

आंत ओसरीवर जमाखर्च लिहीत एक कारकून बसला होता. ध्यान मोठे मासलेवाईक होते. डोक्यावरील फेट्याची चुंबळ जरा मागे सरकविली असल्याने टकलाचा पुढील भाग व फेट्याने त्यावर चढविलेला तांबडा रंग खुलून दिसत होता. वीतभर जीवर्णावरील करड्या मिशा पिसकारलेल्या असून सुरकुतलेल्या गालाविरुद्ध त्यानीं बंड केल्यासारखे वाटे. निकेल फ्रेमच्या चष्म्याच्या तुटक्या काड्या सावरण्याकरिता बांधलेले पांढरे दोरे खालीं उतरून मिशांशीं सूत जुळवीत होते. कोटाचा रंग ओळखू येत नव्हता. माझी चाहूल लागतांच हनुवटी खाली दाबून चष्म्याच्या वरील भागातून दृष्टि माझ्यावर रोखत हा प्राणी वसकन् विचारता झाला, " कोण पाहिजे ? "

" हेमत किंवा कांचनताई आहेत काय ? "

यावर क्षणभर थांबून डाव्या हातातला रूळ एका कोपऱ्याकडे करून तो खेकसला, " ह. बसा तिथं. "

माझ्या मनात त्याला विचारावेसे वाटत होते कीं, ' बाबारे, तुझं काय घोडं मारलं मीं! ' पण असतात एकएक विक्षिप्त नमुने असें म्हणत मी एका जुनाट पेटीवर बसलों. तो माणूस कामात पुनः गढून गेला. मी आल्याचें तो आत कळवील असे चिन्ह दिसेना आणि आतून कुणी बाहेर येईना. पण या जागेवरून काहीं झालें तरी हलायचें नाहीं अशा निश्चयानें मी बसून राहिलो.

सुदैवाने मला फार वेळ वाट पाहावी लागली नाहीं. कांचनच बाहेर आली. मला पाहतांच चकित होऊन कारकुनाकडे पाहत तीं जरा रागानेंच म्हणाली, " भगवतराव, हे आले ते मला कळवलं नाहींत आंत ? कमाल आहे तुमची! "

तो भगवंतराव नामक प्राणी ताडकन् उठला आणि शक्य तितक्या लाचारीने हात जोडून तिला म्हणाला, " ताईसाहेब, हे आपले खास

पाहुणे आहेत हें नव्हतं मला ठाऊक, नाहीं तर मीच त्यांना आंत घेऊन आलों असतों. ”

कांचन किंचित् आरक्त झालेली दिसली पण लगेच म्हणाली, “ अहो, पण कुणीहि आलं तरी आत येऊन सांगणं काम आहे तुमचं. ”

“ हो, ताईसाहेब, चुकलो ! ” असे म्हणत भगवंतराव आणखी वांकला. त्याच्या हातातील रूळ खालीं पडला तो त्याच्या अंगठ्यावर ! तो दाबून वेदना लपविण्याचा प्रयत्न करीत असतांच मी आणि कांचन आंत गेलों. आता माझ्याकडे शक्य तितका हसरा आणि ‘ भाग्यवान आहांत बुवा ! ’ अशा उद्गाराचा चेहरा करीत तो पाहत होता !

तो दिवस त्या सरंजामी ऐश्वर्याच्या वातावरणांत मोठ्या मजेने मी घालविला.

आणखी दहापाच वेळा तरी काचनचा पाहुणचार मी घेतला असेन.

पण पहिल्या वर्षाच्या समाप्तीबरोबर माझ्या उच्च शिक्षणाचीहि प्रगति थाबली आणि कल्याण सोडून मी नोकरीसाठीं दूर गेलों !

पुनः पुण्यास येण्याची संधि मिळून जीवनाला काहीं स्थायिकपणा येईल अशीं चिन्हे दिसूं लागलीं. आपण वाढविलेल्या काव्यमय कल्पनाची आवरासावर करून व्यवहारवादी होण्याची माझी धडपड चालू होती.

यात ७-८ वर्षे तरी गेलीं. एवढ्या अवधींत हेमंत किंवा काचन याची गांठ चुकूनसुद्धां पडली नाहीं. त्याची आठवण नेहमीं येई. पण त्याच्या भेटीसाठीं प्रयत्न करण्याइतकी उसतच नव्हती मला. आणि त्याच्या आणि माझ्या ओळखीचा कुणी मित्रहि भेटला नाहीं या काळात.

जपानी आक्रमणाच्या भीतीमुळे उगाच घाबरून लोक पुणें सोडून जात होते. प्लेगसारख्या भयंकर साथीच्या कडाख्यात दिसली नव्हती इतकी भयाण अवकळा पुण्याला आली होती. त्या काळात एकदा अंधारात हिराबागेकडून मी एकटाच फिरून परत येत असता माझ्यापुढे रमत गमत चाललेले आमचे मोत्याजी कुणातरी धिप्पाड केसाळ कुत्र्याशीं भांडताहेत असे आढळलें. मी जरा पुढें गेलों तों “ कर्नल ! कर्नल ! आत ये ” असें कुणी स्त्री एका बंगल्याच्या दारांतून त्या केसाळ कुत्र्याला उद्देशून ओरडताना

दिसली. इतक्यात समोरून येणाऱ्या एका मोटरचा प्रकाश त्या स्त्रीच्या अंगावर पडला. त्या स्त्रीला ओळखून केवढ्यानें मी ओरडलों—

" काचनताई ! "

" अय्या, भाई ! "

इतके वर्षांनीं कांचन भेटली या विचाराने झालेल्या आनंदाला तिला न्याहाळून पाहताच खग्रास ग्रहण लागलें ! ! किती कृश, किती निस्तेज, किती कष्टी दिसली मला ती ! ! काहीं वर्षांपूर्वी फुटक्या होडीमधील पाण्यात पडलेल्या तिच्या रम्य प्रतिबिंबाशीं आजच्या तिच्या क्षयी चेहऱ्याची तुलना करतांना शहारे आले अंगावर ! मात्र केस, डोळे आणि अंगकांति याचे सौंदर्य अगदीं जसेच्या तसें होते !

त्या वेळीं उशीर झाला होता म्हणून मीं तिचा निरोप घेतला. पण दुसरे दिवशीं मात्र खूप वेळ घेऊन तिच्याकडे गेलों. दोन तास आम्ही बोलत होतों. शेवटीं शेवटीं तिला ग्लानि आली ! अश्रुपातानें तिचे डोळे सुजले ! आणि माझें अंतःकरण मुंग्या आल्यासारखे शोकानें जड झाले !

मधल्या सात-आठ वर्षांच्या काळात कांचनच्या कुटुंबाची वाताहत झाली होती. त्या भगवंतराव नामक खलपुरुषाने साऱ्या इस्टेटीची हळूंहळूं वासलात लावली. ताज्या घोड्यावरच्या गोमाशाप्रमाणे ऐश्वर्याच्या लोभानें जवळ आलेले सगेसोयरे दूर झाले. हेमंत किंवा त्याचे भाऊ यांना या जन्मीं कधीं-काळीं आपणाला दारिद्र्य येणार आहे याची कल्पना नव्हती. त्यामुळें चरितार्थासाठीं अवश्य असलेल्या कुठल्याच विद्याकलात त्यांनीं प्रगति करून घेतली नव्हती. सोय सांपडेल तिकडे ते निघून गेले. बहिणींना रूप व घराणें याच्या वशिल्यानें त्यातल्या त्यात बरीं स्थळें मिळालीं. वैभवाचा अस्त एकदम झाल्यानें आईला क्षय लागला. ती अंथरुणाला खिळली ! काचनने तिची दोन वर्षे अहोरात्र शुश्रूषा केली. कांचनच्या शरीरात त्या दुःसाध्य रोगाने बिऱ्हाड केलें ! अखेर आई वांचली नाहींच ! जिथें फुलें वेचलीं तिथे गोवऱ्या वेचायला नकोत म्हणून कल्याण सोडून काचन वडिलांसह पुण्यास आली. हेमंतहि होताच ! दोन खणातील काचनचें तें घर या साऱ्या हृदयद्रावक इतिहासाची सत्यता पटवीत होतें.

काचनकडे आता मी नेहमीं जाऊं लागलों. माझी ऐपत कांहीं मातबर

नव्हती. पण त्यातल्या त्यांत मी थोडीफार मदत तिला करीं. हेमंत नेहमीं फिरतीवर असे. देणेकरी दररोज संतापून दाराशीं येत पण कांचनच्या डोळ्यांतील कारुण्याने थंड होऊन परत जात. मागलें वैभव आणि आतांचे दैन्य याच्या विरोधानें कांचनचे हृदय दररोज पोखरले जाई. पण तरीहि कांचनची हौस सुटली नाहीं, कुणाच्या आदरातिथ्यांत तिनें कमी केले नाहीं, आणि वेषभूषेतला तिचा खानदानी डौल उतरला नाहीं.

एकदा दुपारीं मी एकटाच वाचत बसलो होतों. कांचन माझ्याकडे येत असल्याचें मीं खिडकींतून पाहिले. पावसामुळे जरा गारठा पडला होता. निळ्या ब्लेझरचा कोट, पिवळे गोल पातळ, पाठीवर शेपटा सोडलेला— खरोखर एकाद्या शाळकरी मुलीइतकी कांचन लहान आणि गोजिरवाणी दिसली मला.

आत येताच आरामखुर्चीवर तिने अंग टाकले आणि खिशातून एक पाकीट काढून मला वाचायला दिले.

कांचनच्या भावजीवनाची मंजूषा या पत्राने मजपुढें उघडली केली होती.

" ...भाई, आमचं वैभव तुम्हीं पाहिलंच होतं. ते सर्व परत मिळेल अशी व्यवस्था करणारी एक प्रेमळ व्यक्ति होती. ती म्हणजे डॉक्टर दादासाहेब. ते खरोखर लाख माणूस होते. ( कुठे असतील तिथं देव त्याना सुखी ठेवो ! ) माझ्यासाठीं अहोरात्र झुरणारे आणि माझी पूजा करूं इच्छिणारे तरुण तेव्हा कांहीं कमी नव्हते. पण दादासाहेबांच्या इतकं गुणाचं वैभव कुणात नव्हतं. भाई ! मीं त्याना नकार दिला, तो आपण प्रथम भेटलो त्या होडींत, तशाच एका चांदण्या रात्रीं ! ! रात्रभर आम्ही गळ्यात गळा घालून रडलो. पण त्याच्या तोंडून एकही कठोर शब्द बाहेर पडला नाहीं ..

" कुठल्या अहंकारानं माझी मति भ्रष्ट केली होती कोण जाणे ! आमचं दैन्य पाहवत नव्हतं म्हणून आमची गहाण पडलेली इस्टेट दादासाहेब सोडविणार होते. पण त्यानीं असं दर्शविताच आमच्या मंडळींचा पुरातन स्वाभिमान जागृत झाला. ' ताई ! तुझ्यासारख्या बहुमोल रत्नाचा मोबदला घेऊन पुनः वर दादासाहेब आपल्यावर त्यानीं उपकारच केले असं म्हणणार ! ' असं हेमंत रागानं म्हणूं लागला. मलाहि ते खरं वाटलं. खऱ्या प्रेमात उपकाराचं रूपांतर मधुर कर्तव्यात होतं हें समजण्याची अक्कल मला तेव्हा

नव्हती! ज्याना आमचं पूर्वीचं वैभव परत मिळावं असं वाटत नव्हतं त्यांनीं दादासाहेब व त्यांचं घराणं यांच्याबद्दल नाना तऱ्हेचे भयंकर प्रवाद माझ्या आईवडिलापर्यंत पोचविले. माझं डोकं बिथरून गेलं! आणि पुढे वाढून आलेलं सुखाचं ताट मीं हातानं दूर लोटलं!

"भाई! माझं हे पंगू जीवन संपणार केव्हा? मला जाणणारी एक आई होती ती क्षयाचा वारसा मला देऊन देवाघरीं गेली! वडिलाना माझ्या वेदनांखेरीज जगातलं सर्व काहीं समजेल अशी स्थिति आहे. इतर भावंडाच्या बाबतींतल्या माझ्या अपेक्षा आता शुष्क होऊन गेल्या आहेत. एक माझा हेमंत. पण सोलापूरला गेला कीं तिकडेच रमतो तो. त्याची एक दूरची श्रीमंत बहीण आहे तिथं. तिच्यापुढें या अनाथ पंगू काचनची त्याला कां अन् कशी आठवण व्हावी? भाई! कोणाकरिता जगूं मी? तुमच्याकरितां जगावंसं वाटतं. पण माझं एवढं भाग्य नाहीं..."

मीं एवढें वाचून तिच्याकडे पाहिलें तों किती वेळ तरी दाबून ठेवलेला तिचा हुंदका बाहेर पडला. मी पुढे झालो. तिच्या पाठीवरून नुसता हात फिरविला! तिचे सर्वांग थरारले. तिच्या रडण्याचा तोल सुटला. ही आता केव्हां तरी थांबेल कीं नाहीं हेच उमगेना! किती समजुतीच्या गोष्टी सागितल्या. हेमतसारखा भाऊ तुला मिळायचा नाहीं असे परोपरींनें पटविले. अखेर तिनें हळूहळू डोळे मिटले. श्रात होऊन ती झोपी गेली. एकाद्या दमलेल्या सुरेख अर्भकासारखा तिचा चेहरा दिसत होता.

पुढें काचनच्या दुखण्याचा मागे पाय पडेलसे दिसेना. तिची अंगकाति अधिकाधिक तेजस्वी होत चालली होती. तिला आपण सुधारत आहोंत असें वाटे. पण मला ती प्रलयावस्थेंत उतरत आहे हे कटु सत्य केव्हांच कळून चुकले होते! ती बोलूं लागली कीं खूप खूप बोले. इतरांचें ऐकण्याचा धीरच नसे तिला. खाण्याचे पदार्थ करण्याचा असाच सोस दाखवी. उद्या आपणाला संसार करायचा आहे असा समज करून कधीं भाडींच साठवीत सुटे! लोकांना ती खुळचट वाटे. पण मला तिच्या हृदयांतल्या दाबलेल्या वेदनांची कल्पना होती. त्या वेदना कधीं विकृत रूप घेऊन बाहेर पडतांना दिसत. त्याग आणि आत्मक्लेश हा काचनचा स्वभावधर्म होता. पण तिची स्वाभाविक

आसक्तीहि सुटली नव्हती. या द्वंद्वात तिच्या अंतर्बाह्य जीवनाची असह्य ओढाताण होत होती.

अखेर शेवटचा अंक सुरू झाला. दूर एका खेड्यात एक चागले इस्पितळ होते. तेथे काचनला नेण्यात आले. ती जाताना आपली शेवटचीच भेट आहे हे मानायला तयार नव्हती. "मला अजून 'जवाब' पाह्यचा आहे. मी येईन तोंपर्यंत काहीं जायचं नाहीं ते पिक्चर ..भाई! या दिवाळीला तुम्हाला खाजाचे कानवले नक्की करून घालणार बरं का? मागली दिवाळी तशीच गेली." असें तिचें बोलणें शेवटपर्यंत चालू होतें.

काचनने पुणे सोडले, त्यानंतर पंधरा दिवसानीं हेमंत परत आला. मला पाहताच माझ्या गळ्याला मिठी मारून तो रडूं लागला, "भाई, काचन आपणाला सोडून गेली!!" मनाची मीं तयारीच केली होती हें ऐकायला. तरी पण माझाहि अश्रुप्रवाह हेमंतच्या अश्रूंत मिसळला!

"भाई! तिचं माझ्या हातून काहीं झालं नाहीं...मी पैशाची व्यवस्था करण्यासाठीं दूर दूर भटकत असें. त्यामुळं तिची आबाळ तर झालीच...पण हेमतच आपल्यावर प्रेम नाहीं हा तिचा ठाम ग्रह झाला! भाई, दुर्दैवानं शेवटपर्यंत पाठपुरावा केला हो! आम्हीं तिला ज्या इस्पितळांत नेली तिथं डॉक्टर दादासाहेब मुख्य होते."

"म्हणजे?" मी आश्चर्याने उद्गारलो.

"होय, भाई! आम्हाला पहिल्यानं हे ठाऊक असत तर नेली नसती तिला तिथं! पण...इलाज नाही. दादासाहेबानीं जिवापाड श्रम घेतले. पण जखमेवर मीठ चोळल्यासारखं वाटलं काचनला! दादासाहेबाच्या दयेमुळेच कांचन इतक्या लवकर गेली..."

दैवाच्या विचित्र लीलेचा मी विचार करीत होतों. जीवनाच्या नाटकाचा शोकान्त होण्यासाठीं कित्येकदा खलपुरुषाची गरजच नसते. हेमंतनें सांगितलेल्या एक एक गोष्टीने हेच तत्त्व विशेष स्पष्ट होत होतें.

काहीं वेळानें हेमंत उठला.

एकदम त्याने माझे दंड धरले आणि म्हटले, "भाई, २७ नोव्हेंबरला कांचन वारली. तुम्ही आणि मी भूतलावर आहोंत तोवर या दिवशीं निदान पत्र तरी पाठवूं एकमेकाना, भाई...भाईसाहेब—"

त्याच्याने पुढें बोलवेना. माझ्या डोळ्याकडे तो पाहत राहिला. नंतर म्हणाला, " भाई, आमचे आजोबा आम्हाला कथा सांगत तेव्हा विदुराबद्दल त्यानीं सांगितले कीं, त्यानें समाधि घेतली तेव्हा विदुराची प्राणज्योत त्याच्या तोंडांतून निघून श्रीकृष्णाच्या शरीरात गेली. मला असंच वाटतं. कांचनचे प्राण तिच्या शरीराला सोडून गेले ते दुसरे कुठें नाहींच गेले ! तुमच्याच शरीरात शिरले. भाई ! मित्र आणि भगिनी या दोन्हींचं प्रेम तुमच्यात एकवटलेलं यापुढे मला दिसेल. तुम्ही आहांत म्हणजे कांचन आहेच.

" मी कांचनशीं प्रतारणा केली नाहीं असं तुम्हीं जरी मला आश्वासन दिलंत तरी माझं समाधान होईल. तुमचं आश्वासन म्हणजे कांचनचं आश्वासन !"

मी कांहीं न बोलता हेमंतला जवळ घेतलें. तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरील वादळाचे विसर्जन झालेलें दिसत होते. आपली प्रेमळ बहीण पुनः लाभल्याचा आनंद त्याला झालेला मला दिसला.

## नंदिनी : : : ४

शब्द आणि स्वर यात भावनेला हलविण्याच्या दृष्टीनें कोण अधिक समर्थ आहे याचा वाद घालीत बसत नाहीं मी. कारण तो वाद न तुटणारा आहे ! पण एवढें मात्र मी सागतों कीं माझीं कित्येक आवडतीं गीतें गायकाच्या बोलांतून ऐकताना मी जेवढा तल्लीन झालों असेन त्याहून क्लॅरिओनेटवर किंवा तशाच एकाद्या वाद्यावर तीं प्रकट होतांना किती तरी पटीनीं मी जास्त वेडावून गेलों आहें. " **मै क्या जानुं क्या जादू है** " हें पद तर जेव्हां जेव्हां मी क्लॅरिओनेटवर ऐकतों तेव्हां तेव्हां मनाला भोंवतालच्या परिस्थितींतून एकदम मुक्त झाल्यासारखें वाटतें; आपल्या जिवलग व्यक्तींच्या भेटींत आनंद व यातना याचे होणारें दृढालिंगन प्रत्ययाला येऊं लागतें. आणि कुठल्या तरी निकराच्या क्षणाजवळ आपण येऊन ठेपलों आहोंत असा भ्रम होतो.

नेमका हाच अनुभव एका व्यक्तीला आलेला मीं पाहिला आहे. नंदिनी तिचे नाव. तसें पाहिले तर नंदिनीनें माझ्या जीवनाचा फारच लहानसा भाग व्यापिला आहे. शिशिराच्या कडक थंडींत एक दिवस पहाटे ती निळा कोट घालून फिरायला आलेली मला दिसली; वसंत ऋतूंत आम्हीं स्नेहाचा उत्कर्ष गांठला; आणि पावसाळ्यात ती नाहींशी झाली ! त्यावर पुनः तिचें दर्शन नाहीं ! ती पुनः भेटण्याची आशाहि नाहीं ! पण एवढ्या अवधींत कधींहि न आटणारा अश्रूंचा सागर तिने निर्माण करून ठेवला आहे !

नंदिनीला ज्या दिवशीं मीं पाहिले त्याच्या दुसऱ्याच दिवशीं तिचा माझा परिचय झाला. आमच्या पेठेंत काहीं घरें अशीं आहेत कीं तेथें राहायला येणाऱ्या माणसांच्या जीवितांत काहीं तरी रहस्य असायचीं हे ठरल्यांसारखें

आहे ! समाजाच्या चाकोरींतून जाणें ज्यांना परवडलें नाहीं किंवा सामाजिक कायद्याचा ज्यांनीं कळत न कळत उपमर्द केला अशीं माणसे वस्तीसाठीं या घरांत येतात ! अशाच एका चाळीवजा घरात, एका खोलींत नंदिनी राहत होती. येथे लाकडी खेळण्याचें एक दुकान होते. तेथे खेळणीं खरेदी करण्यास गेलों असता तिची माझी ओळख झाली. कृत्रिमतेचीं जोखडें येथें मुळींच नसत. भाव लपविण्याच्या कलेची येथे चलती नव्हती. त्यामुळें एक दोन दिवसांपूर्वींच येऊन राहिलेल्या नंदिनीची आणि माझी सहजासहजीं ओळख होऊं शकला.

नदिनीच्या गत आयुष्याबद्दल मीं कधीं कुतूहल दाखविले नाहीं. तिचा वर्ण, केशकलाप, वेषभूषा, संभाषण इ. सर्वच काहीं इतके उंची व तलम होतें कीं ती उच्च जातकुळीची असावी यांत शंकाच नव्हती. तिच्याशीं बोलतांना कुलकन्यकेला साजेल असाच भाषेचा थाट मी ठेवीत असें. यामुळेच कदाचित् असेल तिला माझ्याविषयीं पराकाष्ठेचा विश्वास वाटूं लागला. आपल्या पूर्वा-युष्याबद्दल हा जिज्ञासा दाखवीत नाहीं म्हणूनच याला सारें सारें काहीं सांगून टाकावें असें नंदिनीला वाटूं लागलें. तिच्या नेत्रात चाचल्य नव्हते असे नाहीं; पण भक्ति विशेष दिसे. आपल्या पाककौशल्याचे नमुने दाखवून ती माझ्याकडून स्तुतीची बिदागी घेई. अगदीं थोड्याच अवधींत तिने साध्या ओळखीपासून दृढ मैत्रीचा पल्ला गाठला.

नंदिनीच्या ज्या रसिकतेचा उल्लेख मीं प्रथम केला तिचा परिणाम माझ्या मनावर विशेष स्पष्ट राहिला आहे. एके दिवशीं तिच्या घरीं हास्य-विनोद करीत बसलों असतां रेडिओवर "मै क्या जानु क्या जादु है" हें गीत क्लॅरिओनेटवर छेडलेले ऐकूं येऊं लागलें. नंदिनी स्तब्ध होऊन ऐकूं लागली. माझी अर्थातच तिकडे तंद्री लागली होती. रेकॉर्ड संपल्यावर मीं नंदिनीच्या चेहऱ्याकडे पाहिलें तो तिच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते ! आपल्या करुण आलापानीं दुसऱ्याला विव्हळ करणारी व्यक्ति क्रूर असणें शक्य आहे याबद्दल मी निःशंक होतों. पण गीताचे मधुर स्वर ऐकून जी व्यक्ति अगदीं उत्कटतेनें विव्हळ होऊं शकते ती चंचल असली तरी सहृदय असणारच असें मात्र ठाम वाटले. नंदिनीच्या त्या अश्रूंमुळे तिच्या माझ्यात सहानुभूतीचा एक नवा ऋणानुबंध निर्माण झाला.

नंदिनीची राहणी खानदानी पद्धतीची दिसे. पण तिला पैसा कुठून मिळतो हें मला ठाऊक नव्हतें. शेजारी लाकडाचीं रंगीत खेळणीं करणारा कारागीर होता. तो आपल्या मित्रांना क्वचित् मिष्किल स्वरात कधीं म्हणे, "काल इंजिनिअरसाहेब वस्तीला होते बरं का?" एवढ्यावरून मी इतका अंदाज बांधला कीं नंदिनीचा पोशिंदा कोणी इंजिनिअर असून तो मधून मधून येथें येत असतो. पुढे तिनेच आपण होऊन एकदां सांगितलें कीं, "माझं लग्न अगदीं लहानपणीं फसगतीनं एका म्हाताऱ्याशीं झालं. पुढं त्यानंच सोडचिठ्ठी देऊन दुसरा विवाह करण्याची मला परवानगी दिली." मी ती हकीकत सत्य धरून चाललों. उच्च वर्णीयात अशी सोडचिठ्ठीची सवलत नाहीं असा कायद्याचा कीस काढीत मी बसलों नाहीं. एका प्रेमळ व रसिक रमणीचे हृदयंगम मनोव्यापार व विलास पाहणे हे नंदिनीच्या बाबतींतले माझे मुख्य कुतूहल होतें. ती पट्टीची विलासिनी होती. सहज कप पुसता पुसता—

"मी पुष्पराणी। वनीं रानीं। नसे कोणी। पाहीं माझ्यावाणी..."

हे गीत भिंगरीसारखी फिरत असलेल्या आवाजांत म्हणत ती खालीभर नाचूं लागे. चाळीच्या भय्याशीं बोलताना इतके उत्कट भाव प्रकट करी कीं, त्याला ही जगाची सम्राज्ञी वाटावी. मोलकरणींना इतकी माया दाखवी कीं, आपली जन्मोजन्मींची अन्नदात्री एकाएकीं आपणाला भेटली असे त्याना वाटे. नंदिनी ही निसर्गाची एक प्रबळ व मनोहर शक्ति होती. दुर्दैवानें त्या शक्तीला शिस्त नव्हती म्हणून तिचे सारे पराक्रम वाया जात किंवा दुःखकारक होत!

एके दिवशीं सायंकाळीं नंदिनीच्या खोलीचा नूर अगदीं बदलून गेलेला दिसला. सुंदर सुंदर पातळे अस्ताव्यस्त पडली होतीं! केर तसाच होता! एक दोन तसबिरी वेड्यावाकड्या होऊन पडल्या होत्या! घड्याळ बंद होतें! आणि नंदिनी खिन्न होऊन आकाशाकडे पाहत बसली होती. तिचे पारोसे व म्लान मुख पाहून काहीं तरी बिघडलें आहे असा मीं तर्क केला. आणि असे तर्क खोटे थोडेच ठरायला?

मी खोलींत पाऊल टाकताच अश्रुवृष्टि सुरू झाली. तिच्या वेदना इतक्या असह्य दिसल्या कीं, पहिला आवेग पूर्ण ओसरूं देणेच इष्ट असे मला वाटूं लागले. मी स्तब्ध बसलों. कांहीं वेळानें रडें थांबवून ती बोलूं लागली,

" तुमच्या साऱ्या चांगुलपणाचा आतां फायदा घेतल्याशिवाय मला गत्यंतर नाहीं! मी आज अनाथ झालें आहें. निराश्रित आहें! आमच्या मालकाच्या लहरीपणाचे असे तडाखे मधून मधून मला सोसावे लागतात. मध्येंच केंव्हां तरी आपला संबंध कायमचा तुटला असें सागून ते निघून जातात. अंगांत मुरलेलं दुखणं जसं मधूनच केंव्हां तरी त्रास देतं तसं एकटं पडण्याचं हें संकट अचानक उद्भवत. पुनः केंव्हा तरी ते 'चुकलों' म्हणत परततात, पश्चात्ताप दाखवून अश्रु गाळतात. माझंहि मन विरघळतं. नव्या अन् अधिक उत्साहाने आमचा संसार सुरू होतो. हें खरं असलं तरी मधल्या काळच्या माझ्या यमयातनांचं काय? आणि दर वेळीं हे परत येतीलच अशी खात्री मीं का बाळगावी? म्हणून दर वेळीं आतां जन्माचं वाटोळं झालं, आपली स्थिति रस्त्यातल्या कुत्र्यासारखी होणार या भयानं वेड लागण्याची पाळी येते... "

नंदिनी असे किती वेळ तरी बोलत होती. तिच्या शरिरालाच नव्हे तर मनालाहि भीतीमुळें घाम सुटलेला दिसत होता. इतकें संपन्न रूप निराधार-पणाच्या भीतीनें केविलवाणें झालेले पाहून मी खिन्न झालों. आपल्या कायमच्या उदासीनतेचा क्षणभर विसर पडावा असा भयंकर प्रकार तो होता. नंदिनी म्हणूं लागली—

" माझी दुपारची भ्रांत नाहींशी करा. मला विद्या नाहीं, कला नाहीं. मोलमजुरी करीन म्हटलं तर नेहमीं चैनींत राहिल्यानं शरीर सुखावलं आहे. त्याला काबाडकष्टाची सवय नाहीं." नंतर जणूं काहीं झालेच नाहीं असा तिचा चेहरा पालटला! चेहऱ्यावर नेहमींचें माधुर्य आणि हावभावांत सहजता आली! गळ्यातील चपलाहाराचे पदर आपल्या गोऱ्या आणि लाडिक हनुवटीवर फिरवीत मधुर स्वरात नंदिनी म्हणाली, " खरंच. सिनेमाचं नाहीं का जुळायचं मला? तुमचे खूप डायरेक्टर ओळखीचे आहेत. द्या ना मला कुठे लावून...अं! कराच गडे माझं काम! तुमचे उपकार जन्मभर विसरणार नाहीं."

सिनेमांत काम करण्याच्या नुसत्या मादक कल्पनेनें नंदिनी क्षणार्धात आपल्या अश्रूंचें रूपांतर हास्यांत करूं शकली. पण तिच्या दुःखानें मला आलेली खिन्नता मात्र कायमच होती. तिचें विलासी रूप कित्येक प्रसिद्ध

चित्रपटचंद्रिकांना लाजवील असे होतें, आणि तिच्या गोड गळयावर तिला हवे तेवढे पैसे मिळणे शक्य होते. पण या वैभवापर्यंत चढण्याइतकी नंदिनीची निष्ठा तीव्र होती का? केवळ चरितार्थाच्या साधनाहून वेगळया उच्च दृष्टीनें तिनें या धंद्याकडे पाहिले होते का? माझें मन या प्रश्नाचें उत्तर नकारार्थीच देत होतें. पण मी सर्व तऱ्हेनें सांगूनहि स्वावलंबनाचा तोच एक मार्ग आहे हे तिचें मत बदलले नाहीं.

शेवटीं नाइलाज म्हणून नंदिनीला मी एका सिनेमा दिग्दर्शकाकडे परिचय-पत्र देऊन पाठविलें. आणि माझ्या शब्दाला मान देऊन त्या दिग्दर्शकानें तिला कामावर रुजूहि करून घेतलें! नंदिनीचें वेगळे जीवन सुरू झालें. आता नंदिनीच्या उल्हासाला तुफान भरती आली! दररोज वेषभूषेचे निराळे ढंग दिसत. "आज अमुक नटाने आपण होऊन माझी ओळख करून घेतली, ...आज कंपनीचे एक डायरेक्टर घरापर्यंत मोटारींतून तुम्हांला सोडतो म्हणाले." या आणि अशा गोष्टी नंदिनी मोठ्या अभिमानाने सांगे. कलेच्या बारकाव्यान्नें किंवा तंत्राचें नवें ज्ञान आपण करून घ्यावें या महत्त्वाकाक्षेचा मागमूस नव्हता. आधार शोधण्याची वृत्ति मात्र भरपूर दिसे!

एक दिवस स्टुडिओला सुटी होती. मी नंदिनीच्या घरीं गेलो असता, एक छटेल पोरगें आणि तो शेजारचा खेळणीवाला कॅरम् खेळत बसले होते. मी आंत जाताच दोघेहि उठले आणि बाहेर जाऊ लागले. खेळणीवाला शेजारीच होता. तो झटकन् आपल्या खुराड्यात जाऊन पोचला! तें पोरगें मात्र आपलें जावळ कुरवाळीत पुनः केव्हा भेटायचे याचा वायदा नंदिनीशीं करीत होते. नंदिनीहि त्याला लौकर जावें लागते आहे या विचाराने दिलगीर होऊन त्याच्याशीं बोलत होती! मी तुटकपणें म्हटले, "जातों मी पाहिजे तर—" "नाहीं नाहीं. बसा ना? तो काय पुनः येईल. आणि स्टुडिओंत आम्ही दिवसभर भेटतच असतों कीं! तुम्हीच बडे लोक क्वचित् भेटता!" नंदिनी हंसत म्हणाली. तें पोरगे निघून गेले! मी स्तब्ध होऊन खुर्चीवर बसलों.

"आज खुषींत दिसत नाहीं तुम्ही."

"इथं येण्यापूर्वी होतों."

"आतां तें पोरगं नि तो शेजारी इथें पाहून तुमचा पारा चढला हे मला माहित आहे. महाराज, आपला राग रास्त आहे. पण आम्हीहि असल्या लोकाना कांहीं आपणहून बोलावणं पाठवीत नाहीं. आमच्या जीवनांत त्याच्यावाचून पदोपदीं अडतं. अलीकडे स्टुडिओतून यायला रात्र होते. वाटेत चिटपाखरूं नसतं. मोटर नेहमीं मिळतेच असं नाहीं. अशा वेळीं हे पोर हटकून सोबत येतें. हा शेजारचा खेळणीवाला कदील घेऊन शोधायला येतो. औषधपाणी आणून दे म्हणलं तर नाहीं म्हणत नाहीं. महाराज, आमच्याशीं चार लोकांसमक्ष भेटण्या-बोलण्यांत ज्याना कमीपणा वाटत नाहीं अन् जे आमच्या हांकेला धांवून येतात ते आमच्यासारख्याशीं घरगुती-पणें वागले तर त्यांत वावगे ते काय झालं ? प्रतिष्ठित माणसानीं आमच्याशीं दुरून सहानुभूति दाखविण्या पुरताच काय तो संबंध ठेवायचा. आणि आमच्याभोंवतीं अप्रतिष्ठित माणसं जमलीं कीं, पुनः आमच्यावर नाराज व्हायचं. हा न्याय आहे का ?"

नंदिनीचे म्हणणें खरे होते. पण सर्वांशीं खरें नव्हतें. सामान्य लोकाना ती जवळ येऊं देते ही माझी खरी तक्रार नव्हती. अशा लोकांशीं ती लघाळ-पणें व बरोबरीच्या नात्याने वागते यावर माझा रोख होता. हें तिला पटवून देण्याइतका अधिकार मला आहे कीं नाहीं याचा मी विचार करीत होतों. इतक्यांत तिची चर्या बदलली. आज सारें माधुर्य वापरायला काढायचें तिनें ठरविलेले दिसले. अबोलीच्या फुलाची वेणी, सुरमा, भलीं मोठीं कर्णभूषणे इ. नवीं मदनास्त्रें आज नेहमाच्या भरगच्च शस्त्रागारात आलीं होतीं. ती झटकन् उठली आणि मी बसलो होतों त्या खुर्चीच्या दोन्ही हातावर हात ठेवून अगदीं विकल प्रेमार्द्र स्वरात बोलूं लागली, "माझ्या साऱ्या जीविताचा ताबा घ्या. तुमच्याशिवाय एकाहि माणसाची सावली अंगावर पडूं देणार नाहीं. प्रथम-दर्शनीं प्रेम का काय म्हणतात ना ते कादंबरींतच असतं असं मी मानीत होते. पण ज्या क्षणी मीं तुम्हाला पाहिले, त्या क्षणीं कधीं झाला नव्हता असा आनंद झाला. मनानं तुमच्यापुढें माझं सारं जीवन ठेवलं. तुम्हीं मला एका शब्दानं मागच्या गोष्टी विचारल्या नाहींत यामुळें तर मी दडपूनच गेलें. हर्षवायु झाल्यासारखी मी दोन दिवस गात होते, नाचत होतें. तुमच्या थोर हृदयाची एकेक पाकळी उलगडत गेली. मला आतां

त्यांत जागा पाहिजे. लहानसा कोपरा द्या. पण एवढी विनंति मान्य करा."

मी अगदीं गोंधळून गेलो. या गोंधळांत हुरहूर होती, आनंद होता. अभिमानहि होता. नंदिनीसारख्या रसज्ञ सुंदरीचे समर्पण म्हणजे केवढा आनंदाचा ठेवा आहे हें न कळण्याइतका मी विरक्त नव्हतों. कुठल्या प्रेरणेनें मीं तिला आणि स्वतःला सावरलें हें आता मला नीट कळत नाहीं. मी झटकन् उठलो आणि तिला म्हटले, "नंदिनीबाई, तुमच्यासारख्या सुंदर हृदयाचे प्रेम मी डावलतों असं समजूं नका. पण तुम्ही माझ्या जीवनांत जरा उशीरा आलां. तरीहि आजचा प्रसंग मी अंतःकरणात जपून ठेवीन. तुमच्या रमणीयपणाला कमीपणा येईल असं काहीं तुमच्या हातून न होऊं देणें हें मी यापुढें एक मधुर कर्तव्य समजेन." इतके बोलून मी तिच्या खोलींतून बाहेर गेलों.

लोखंडाच्या तुकड्याभोवतीं तार गुंडाळली आणि तींतून विद्युत्प्रवाह सोडला तर तो तुकडा लोहचुंबक बनतो. पण हें त्याचे लोहचुंबकत्व विद्युत्प्रवाह भोवतीं खेळत आहे तोंवरच टिकतें. विद्युत्प्रवाह बंद झाला कीं, तो तुकडा पुनः लोखंड होतो. नंदिनीचे अगदीं असेच होई. मी तिच्या सन्निध असलों कीं सुसस्कृती, आर्जव, प्रेमलता इ. गुणाची ती मूर्त बनून जाई. पण माझ्या गैरहजेरींतले तिचें जें जीवन मला समजे त्यात हिणकसपणा खूपच होता. मी उदास होई. पण काय इलाज होता यावर— ?

आपण एकाकी पडूं याचे नंदिनीला नेहमीं भय वाटे. या भयामुळें हरेक माणूस केव्हां ना केव्हा तरी आपल्या उपयोगीं पडेल अशी एक विचित्र आशा तिच्या मनात उत्पन्न होई. जीवनातले सर्व उपभोग तिला हवे होते. ते प्रतिष्ठित मार्गानें मिळण्याचा संभव पूर्ण नष्ट झाला होता। कुठल्या तरी वृक्षाला कायम बिलगूं पाहणारी ती वेल होती. पण तिच्या वाट्याला चंडोलाचें जीवन आलें होते.

—आणि एक दिवस मी नंदिनीकडे गेलों तों काय ! —खोली अगदीं सताड उघडी आणि रिकामी । मुंबईला चार सहा दिवस मला राहावें लागलें. तेवढ्या अवधींत नंदिनीकडे गेलों नव्हतों मी. पण एवढ्या काळात तिनें घर बदललें केव्हां, कां ? —काहींच कळेना ।

बाहेर अंगणात तो खेळणीवाला दोन लाकडी उंट रंगवीत बसला होता. माझी गोंधळलेली मनःस्थिति अर्थातच त्याच्या लक्षांत आली. रंगाचा कुंचला साफ करीत मिष्किलपणें हसून तो म्हणाला, "साहेब, नांदिनीबाईंचे ईंजिनिअरसाहेब परवा येऊन त्याना घेऊन गेले. कोणत्या गांवाला तें कांहीं सांगितलें नाहीं...पण माफ करा, साहेब. हें आम्हांला माहीतच होतें. तुमच्यासारख्या थोर लोकानीं जीव लावावा इतकी लायकीच नव्हती तिची, आम्ही नेहमीं म्हणायचे. अहो! एक नंबरची उनाड—" पण इतक्यांत पावसाचे थेब येऊं लागले म्हणून तो ते उंट व रंगपात्रें घेऊन आपल्या खोलींत पळाला.

मी जड पावलानीं परतलों! जीवनांतलें एक लहानसे पण चित्ताकर्षक प्रकरण संपले! मीं पूर्वी कधींहि न पाहिलेल्या एका विलक्षण जगात नंदिनीनें मला फिरवून आणिले होतें. पण त्या जगापेक्षाहि नंदिनीचें व्यक्तिमत्व मला विशेष विचित्र वाटले. पण विचित्र तितकेंच आकर्षक! नंदिनीमधील रसिकता, कला आणि चांगुलपणा दीर्घायुषी कां झाली नाहीं याला कारण समाज हे उत्तर सोपे आहे. कारण या उत्तरानें आपल्यावरील जबाबदारी सहजासहजीं टळून अंतर्मुख वृत्तीच्या यातना वाचतात! पण हें उत्तर मला पूर्ण खरें कधींच वाटत नाहीं. माझ्या सहवासांत असतां नंदिनीच्या हृदयातला जो सुप्त प्रकाश प्रकट होई तो अखंड तेवत ठेवण्यासाठीं मी काहीं केलें कां? मला कांहीं करण्यासारखें होते का? तो प्रकाश पुढें अस्तंगत होण्यांत माझ्याहि वासनामय जीविताचा कांहीं भाग होता का? हे प्रश्न मला नेहमीं भंडावून सोडतात. नंदिनीच्या सहवासात घालविलेल्या प्रमत्त क्षणांची आठवण या प्रश्नांनीं तीव्र होते हें खरें असलें, तरी पुनः पुनः त्यांवर मी विचार करतो. कारण हाच विचार माझ्या आत्मसंशोधनाच्या साधनेचें एक महत्त्वाचें अंग होऊन राहिला आहे.

## चित्रा : : : ५

चांगल्या पुस्तकांच्याबद्दल मी आता पूर्ण विरक्तीच्या पातळीला आलों आहें. म्हणजे चांगलीं पुस्तकें हीं आपल्याजवळ आलीं कीं तीं लौकरच दृष्टीआड व्हावयाचींच आणि त्याची आपली गाठभेट पुनः व्हायची नाहीं हें ठरल्यासारखें आहे असें मला वाटते. पुस्तक लाभल्याच्या आनंदाची टवटवी कायम आहे तोच त्याच्या वियोगाची छाया माझ्या मनावर पडूं लागते. याबद्दल माझा आळस, अव्यवस्थितपणा, किंवा आणखी एकादा अवगुण जबाबदार असेल किंवा पुस्तक आस्थेने वाचायला घेऊन जाणाऱ्या माझ्या मित्रांना परत ते माझ्याजवळ आणून देण्याइतकी आस्था वाटत नसेल! काहींहि असलें तरी 'पुस्तक म्हणजे किंचित्काल आपणाजवळ येऊन कायम नाहींशी होणारी गोष्ट' ही व्याख्या माझ्या जीवनकोशांत मीं कायम केली आहे!

पण केव्हां केव्हा अगदीं ठाम समजुतींना एकादा धक्का बसतोच कीं नाहीं? परवां हजरतनीं माझें फार दिवसापूर्वी अदृश्य झालेले एक पुस्तक मला आणून दिलें. तेव्हा मी अगदीं चकित झालों. माझ्या जीवनकोशांतल्या पुस्तका-संबंधीच्या व्याख्येला एक गोड अपवाद तयार झाला याचा फार आनंद झाला मला. हे पुस्तक माझें जीव कीं प्राण होतें. एक सुरस इंग्रजी काव्यसंग्रह होता तो. दोन तीन वर्षे तो माझ्या नित्यपाठांत होता. मधुवयाच्या गुलाबी पहाटे जीं रम्य, स्पष्ट वा अस्पष्ट स्वप्नें पडत तीं यांत शब्दरूपानें साठविलीं आहेत अशी माझी तेव्हां श्रद्धा होती. उमर खय्यामप्रमाणें एकाद्या विजनांत अर्धी भाकर, सुरेची सुरई, आणि हृदयस्वामिनी यांसह बसण्याचा योग आला

असता तर हाच काव्यसंग्रह मीं नेला असता. असें बहुमोल वाटणारें माझें पुस्तक मला हजरतनीं फार दिवसानीं भेटविलें यामुळे कोण हर्ष झाला मला! श्रीकृष्णानें सागरांत बुडालेला सादीपनीचा पुत्र सादीपनीला आणून दिला तेव्हां त्या ऋषिवर्याला जो परमानंद झाला असेल तोच मी अनुभवीत आहें असें मला वाटले.

या काव्यसंग्रहानें माझ्याबरोबर पुणे ते इंदूर असा प्रवास केला होता. हजरतच्या हातांतून काव्यसंग्रह घेऊन कौतुकाने मी त्याचें पानन् पान् न्याहाळूं लागलों तो शेवटच्या पानावर मी पेन्सिलीने खरडलेली एक ' कणिका ' दिसली.

हिंडती शेकडों गगनीं मेघावली
बिंबती सर्व त्या सरोवराच्या जलीं
परि जीवनपोषण त्याचे करण्यास्तव—
येतात कितीगा जलरूपे खालती ?

.........................

कणिकेची पांचवी ओळ रचायची राहिलीच होती. पण चार ओळींच्या या अपूर्ण कणिकेंत पुरेसा आशय व्यक्त झाला होता. ऐकलेल्या स्वरमालिकां-पेक्षां न ऐकलेल्या स्वरमालिकाच अधिक मधुर असतात. तसेच पूर्ण झालेल्या कवितांपेक्षा अपुऱ्या पडलेल्या कविताच कित्येकदा अधिक अर्थगर्भ नसतात का ? ही अपूर्ण कणिका तशीच होती. पाचव्या ओळीकरिता जागा सोडून खालीं कोपऱ्यात ' रतलाम ' असे स्थलनाम घातलें होते. मला सर्व कांहीं स्पष्ट आठवत होते. पुणें ते इंदूर चित्राबरोबर प्रवास, इंदूरला तिच्याकडे चार दिवस वास्तव्य असा रमणीय कार्यक्रम आटोपून परत रतलाममार्गें बडोदें शहर पाहून मी पुण्यास येत होतों. तेव्हां रतलाम स्टेशनवर चित्राच्या आठ-वणीनें विकल होऊन बसलों असतां या पुस्तकाच्या कोऱ्या पानावर ही कणिका मीं लिहिली होती. प्रत्यक्ष चित्रावर तें स्तोत्र रचिले नव्हतें. पण तिच्या मादक सहवासानें लागलेली हुरहूर त्यात खास व्यक्त झाली होती.

चित्रा ही माझ्या एका सन्मान्य मित्राची दूरची भाची. या आमच्या मित्राना त्याच्या काव्यमय वृत्तीमुळें आम्ही ' शेली ' म्हणत होतों. या पदवीला

शोभणारेंच त्याचे रूपहि होते. आपल्या कलंदर प्रवृत्तीस अनुसरून यानीं सामाजिक चाकोरींतून थोडे बाहेर पडून विवाह केला आणि विवाहसमारंभ लोणावळ्याच्या सुंदर परिसरांत घडवून आणिला. अकल्पित अडचण निर्माण होऊन मला मात्र त्या समारंभास जाता आलें नाहीं. आमच्या मित्राची निराशा झाली, पण माझी त्याहून फारच झाली! विशेषतः समारंभ उरकून परत आलेली मंडळी जीं बहारदार वर्णनें देत त्यावरून तर जीवनातली एक बहुमोल संधि आपण गमावली अशी हळहळ मला वाटली! पण इलाज काय?

लोणावळ्याच्या त्या अत्यंत रम्य समारंभाच्या वर्णनांत ज्याच्या त्याच्या तोंडीं एकच नांव प्रामुख्याने येई. ते म्हणजे 'चित्रा.' वर्णन देणारी बहुतेक मंडळी तारुण्याच्या उंबरठ्यातच घोटाळणारी होती. 'चित्रा'च्या सहवासाचा जणूं कैफच चढला होता प्रत्येकाला! कुणी तिच्या 'पर्शियन्' डोळ्यांचें वर्णन करी. कुणी तिच्या लाबसडक केसांचे सौंदर्य वर्णूं लागे, तर आपल्या लांबलचक शेपट्याने आपल्या मैत्रिणींच्या कंठाला वेष्टन घालून चित्रा हंसत हंसत दोघींचीं प्रतिबिंबें तलावात कशी पाहत होती याची रसभरीत माहिती कोणी सांगे. कोणी मार्मिकाने 'चित्रा'चे दोन दात किंचित् पुढें आहेत एवढीच एक तिच्या सौंदर्याला उणीव आहे म्हणावें तर दुसऱ्यानें त्याला हिरीरीनें खोडून काढावे कीं, "ते दात जरा मागें असते तर चित्राचे अर्धे अधिक सौंदर्य कमी झालें असते." आणि सर्वांनीं या विरोधकाला 'हो! हो!' बरोबर अशी साथ द्यावी. 'मार्मिका'लाहि पराभव झाल्याचे वाईट वाटलें नाहीं असें दिसावे. 'पिरोज्' नांवावर 'चित्रा'नें केलेली कोटीच कुणाला आठवे. या सर्व वर्णनामुळे एका अपूर्व सुंदरीच्या दर्शनाला मी आचवलों ही हुरहूर मला तीव्रतेनें लागून राहिली.

पण सुदैवाने ती हुरहूर थांबण्याचा योग फारच लौकर आला. आमचे नवविवाहित 'शेली' इंदुरला सहपरिवार जाणार होते. कोल्हापूरहून पुण्याच्या मार्गे त्यांचा दौरा जाणार होता. माझेंहि इंदुरला याच सुमारास काम असल्यानें मीहि प्रस्थान ठेवलें. आमच्या मित्राच्या परिवारांत मी सामील होण्याचें ठरविल्यामुळें त्यांना आणि मला सारखाच आनंद झाला. मित्राच्या

परिवारांत ' चित्रा ' येईल अशी अटकळ होती. आणि ती खरी ठरल्यानें मी तुफान उत्साहांत पुणे स्टेशनवर त्यांच्या डब्यांत शिरलो.

गाडी सुटायला अवकाश होता. इतर सर्व मंडळी ओळखीची होती. परिचय नव्हता काय तो मी व चित्रा याचाच. आमच्या रसिक मित्रांनी हे चटकन् ओळखले आणि आम्हा उभयताची ओळख करून दिली आणि लौकरच मी आणि चित्रा संवादसुखात इतके तल्लीन झालों की लोणावळ्याच्या स्टेशनवर मुद्दाम चहाकरितां आम्हांला त्या तल्लीनतेतून जागे करतांना आमचे ' शेली ' हंसत उद्गारले, " अरे, किती जन्मांची ओळख होती तुमची ? अन् तुमची भेट झाली तरी किती युगांनीं ?"

चित्राचें जें वर्णन मीं ऐकिलें होतें त्यावरून मीं बनविलेल्या मनोमय मूर्तीशीं जुळणारेंच चित्राचें लावण्य होतें. पण मला विषाद वाटला तो याचा कीं चित्राचे कितीतरी अवर्णनीय विशेष मुळीं कुणीं लक्षातच घेतले नव्हते. एकाद्या ' शहाजादी ' सारखी तिच्या चेहऱ्यावरील बेपर्वाई कुणाच्या लक्षांत आलेली नसावी. तिचा वर्ण असा होता कीं अमुक असे त्याला नाव देता आलें नसतें. पण श्रीमंती आणि गूढता याचें मनोहर वातावरण तयार करण्याची शक्ति त्या वर्णात होती. तिच्या मोकळेपणाला—नव्हे काहींशा उद्दामपणाला—सुस्वभावाची मोठी मजेदार मर्यादा पडलेली दिसे. पण हे कुणाला उमगलें नसावे !

आमचा प्रवास मोठ्या खुषींत पार पडला. खरोखर ऐन पंचविशीच्या अलीकडे असणाऱ्या मंडळींचा परिचय वाढायला आणि त्याला मोहकपणा यायला दूरच्या प्रवासासारखे कुठलें दुसरें साधन नसेल ! गाडींत चढतांना तिला हात देणें, मोठ्या स्टेशनवर गोष्टी बोलत दूर दूर फिरत राहणे, तिनें एकाद्या वस्तूविषयीं इच्छा प्रदर्शित करताच धावत जाऊन ती तिला आणून देणें, आणि गाडी भर वेगांत असता काहीं रहस्यसूचक बोलण्यासाठीं कानाला लागणें ह्या सहजासहजीं घडणाऱ्या गोष्टींतून नकळत हृदयाची ओढ वाढूं लागली होती.

प्रवासांतली एक घटना मला आठवते. बोरीबंदरवरून आमची गाडी सुटण्यापूर्वी कांहीं स्नेही आमच्या त्या नवपरिणीत मित्राला भेटायला आले होते. त्यांत एक नामांकित सिनेमानट होता. काळाकुट्ट, गल्लेलठ्ठ, ग्लॅक्सो बेबीच्या चेहऱ्याचा. आणि जावळाचें जंगल असलेला तो अभिनयपटु आदमी

चित्राच्या बराच ओळखीचा असावा असें मला वाटलें. कारण त्याचा सुगंधित हातरुमाल चित्रानें हंसत हंसत काढून घेतला आणि त्यानेहि थोडा खोटा प्रतिकार करीत तो तिला घेऊं दिला. ही लगट पाहून मी अस्वस्थ झालों! मीं कां अस्वस्थ व्हावें?...पण उलटसुलट विचार करण्याचें ते वयच नव्हतें. त्या नटाचा मला भारी राग आला. आणि चित्रा जरी कितीहि मोकळी असली तरी तिने असें वागूं नये असें मला वाटलें. मनांतला गोंधळ व अस्वस्थता लपविण्यासाठीं माझा तो आवडता काव्यसंग्रह घेऊन वाचण्याचा मी बहाणा करूं लागलो. इतक्यात नटवर्य दुसरीकडे गेले आणि चित्रानें माझ्याकडे पाहून जरा मिष्किलपणे म्हटलें, "काहीं लोकाची गर्दी-गोंगाटात सुद्धां समाधि लागूं शकते, नवल आहे बाई! काय वाचत होतां? आम्हाला तरी थोडं काव्यामृत पाजा."

मी जरा आतुरल्या वृत्तीनेंच पुस्तकाकडे पाहून पुढील ओळ उच्चारली—

"And I would that my tongue could utter
The thoughts that arise in me–"

चित्रा लगेच म्हणाली, "अहो अर्थ सांगा. इंग्रजी कविता सहज समजेल इतकं आमचं ज्ञान नाहीं म्हटलं!" मीं सावकाश म्हटलें, "माझ्या अंतःकरणांत उदय पावणारे विचार मला सांगता आले असते तर मला किती आनंद झाला असता." पण हा अर्थ ऐकताच तिचा खेळकरपणा एकदम मावळला आणि ती सद्गदित होऊन म्हणाली, "किती आपल्या मनातल बोलला हा कवि!" आणि मीहि तिच्यावरचा रोष विसरून तिच्या भावप्रवाहात समरस झालो!

इंदूरचे चार दिवस तर किती भुर्कन् उडून गेले! जड अंतःकरणानें रतलामला जाण्यासाठीं चित्राचा मीं निरोप घेतला तेव्हा तोंडावाटे शब्दही निघेना. गाडींत सुनेसुनें वाटूं लागले. वास्तविक गाडींत करमणुकीचीं साधनें भरपूर होतीं. विशेषतः रतलाममार्गे चितोडला जायला निघालेलीं रजपुत कुटुंबें म्हणजे अद्भुतरसाचीं आगरेंच होतीं. बनारसी शालूचे पडदे लावून त्यांनीं डब्यांतच आपल्या राणीवंशाचा सवतासुभा तयार केला होता! त्यातून एकादें मुखमंडल ओझरतें दिसलें तरी पद्मिनी—कृष्णकुमारीच्या सौंदर्याचें ऐश्वर्य राजस्तानांतून अजून काहीं फारसें लोपलें नाहीं हा प्रत्यय येई. पुरुष मंडळीची

तीं रंगीबेरंगी शिरोभूषणें व झगे, आकर्ण भुवया, कल्लेदार मिशा, तर्रर चेहरे पाहिले म्हणजे प्रताप–हमीराच्या कालात आपण वावरत आहोत असें वाटे! कोणी लोकगीतें गात होते. पण अशा त्या रम्याद्भुत सृष्टींतहि मला करमेनासें होत होतें! चित्राच्या विभ्रमांची व विनोदाची आठवण मनात ओसंडत होती. रतलामला उतरून पुढें बडोद्यास गेलो. मला ते सारेंच नवीन होतें, आकर्षक वाटत होते. पण सारीं रम्य दृश्ये पार्श्वभूमीवर जात आणि पुढें चित्राची मूर्ति दिसूं लागे.

या प्रवासातल्या पहिल्या सहवासानंतर पुढील दोन वर्षांत चित्रा दोन-तीनदाच भेटली. या दोन वर्षांत एकदा एक मोटा निर्णय घेण्याचा मोठा प्रसंग मजवर गुदरला! चित्राच्या मामानीं म्हणजे आमच्या ‘शेली’नीं आमच्या एका विश्वासू मित्राजवळ मी आणि चित्रा यानीं जीवनाचे जोडीदार व्हावें अशी इच्छा प्रदर्शित केल्याचे मला समजलें! त्या इच्छेंत कितीसा गंभीरपणा होता हे मला ठाऊक नव्हते. आणि चित्राला या योजनेची दखल तरी होती कीं नाहीं याचा अंदाज मला कधींच घेता आला नाहीं. पण या आमच्या ‘शेली’च्या कल्पना-चंडोलानें जवळजवळ दोन महिने माझी झोप हिरावून नेली! चित्रासारखी ‘शहाजादी’ आपली सहचारिणी व्हावी यासारखी हृदयंगम कल्पना दुसरी कोणती असणार? पण ती कल्पना इतकी दिव्य होती कीं, मला ती भयप्रद वाटूं लागली! माझ्या जीवनांचा जम बसला नव्हता. “**जिवलगे! सांगि मम सारा। दुःखाचा मात्र पसारा॥**” हे करुण गीत या ‘शहाजादी’स नेहमीं ऐकवीत राहावें असें वाटेना. आणि तिच्या त्या स्वतंत्र विलासी वृत्तीला ते मानवलें तरी असते का? ‘**निःशंक रंक मी प्रेम करीं। जोहार तुला घे दिव्य परी।**’ ही उमदी समर्पणाची वृत्ति पत्करणें माझ्या बालिश अहंकाराला पटेना. चित्रा ही एक काव्यमय रम्य शक्ति आहे असे तर वाटे. पण ती आपल्या बाबतींत तरी अमोघ आहे, तिचा प्रभाव आपणाला कायमचें पंगू करून टाकील असे विचार येत. अलोचन जाग्रणें केलीं! जिवलग मित्रांशीं उलट-सुलट चर्चा केली! ओली-सुकी करून निर्णय घेण्याचेहि हास्यास्पद प्रयत्न केलें! पण अखेर कुठल्या तरी अनामिक भीतीचा अखेर जय झाला आणि ‘शेली’च्या कल्पनेला खेदपूर्वक नकार देण्याचें मीं ठरविलें.

या दोन महिन्यात मनाचे हाल विलक्षण झाले. तरीपण 'शहाजादी'चा जोडीदार होण्याची आपली लायकी मान्य झाली या समाधानाने हजार नागांचें बळ आलें होतें मला! वर सांगितलेल्या माझ्या कणिकेंतले रूपक घ्यायचें म्हटले तर एक मेघावली सरोवराच्या जीवनात विलीन होण्याचा योग आला होता. आभाळ भरून आलें म्हणजे कशी गदगद होते? तशी तळमळ होत होती. पण ही मेघावली खालीं कोसळण्याऐवजीं विरून जावी व आकाश स्वच्छ व्हावें हीच इच्छा तीव्र झाली. तसेच अखेर झाले! आभाळ निर्मळ झाले. तगमग थाबली. पण 'शेली'च्या कल्पनेला होकार दिला असता तर? हा प्रश्न आजवर पुनः पुनः मनाला व्यग्र करीत आला आहे!

पुढे चित्राचे मामा उत्तर हिंदुस्थानात कुठंगे स्थायिक झाले. वाङ्मयाचा दरिद्री मार्ग सोडून सत्ता-सपत्तीर्चा वैभवशाला वाट त्यानीं पत्करली. चित्राचा नक्की ठावठिकाणा मला बरींच वर्षे माहित नव्हता. प्रीतिसंगमाला आलेल्या नद्या काही उंचसखल भूमीच्या अडचणींमुळे पुनः दूर सरकत जाव्या तसे मी आणि चित्रा याचे झाले. कित्येक वर्षं ती मला भेटली नाहीं. तिच्या लहान मोठ्या बहिणींचीं लग्नें यथाकाल झालीं. चित्रा विद्यालयीन शिक्षण घेत होती. कुठे शिक्षिका झाली होती. समाजकार्यहि ती करी. अशा काहीं वार्ता कानावर येत. एकदा वऱ्हाडात एका जिल्ह्याच्या गावीं एका महिला संघानें केलेल्या नाटकात चित्राने काम केल्याचे एका मासिकात वाचले. हौशी अभिनेत्रींचा लहानसा फोटोहि होता. पण त्यातून चित्राचा चेहरा हुडकून काढणे एकादा अशोककालीन भग्न शिलालेख वाचण्याइतके दुर्घट होते. चित्राचे वसतिस्थान तरी कळलें एवढाच आनंद झाला मला. पण तो फार दिवस टिकला नाहीं! कारण चौकशी करता ते गाव सोडून चित्रा कुठे तरी दूर गेल्याचें कळले! दिवसामागून दिवस जात होते. चित्राची स्मृति मात्र ताजी होती. नदीच्या पात्रात सोडलेली कागदाची नाव पुढे पुढें जावी याचा मूल शक्य तेवढा प्रयत्न करतें. ती कुठे अडकली तर काठीने पुनः तिला प्रवाहाच्या मध्यावर आणून सोडतें. त्याप्रमाणे चित्राची स्मृति मी भूतकालात रेंगाळूं द्यायला तयार नव्हतो. माझ्या जीवनप्रवाहात ती सतत मजबरोबर यावी यासाठीं मी झटत होतो. आणि त्यांत यशस्वीहि झालों होतों.

—आणि अर्धें तप लोटून गेल्यावर चित्राचें आकस्मिक दर्शन झालें. तो प्रसंग असा—

ऑगस्ट चळवळीचा देशव्यापी वणवा पेटला. त्या वर्षीच्या दिवाळ्यांत दक्षिणेकडे एका शहरीं मी सार्वजनिक कामासाठीं म्हणून गेलों. तेथील मंडळींचें कितीतरी दिवस आग्रहाचें आमंत्रण होतें. मी त्या शहरीं पोचलों तेव्हां रीतिप्रमाणें स्टेशनवर कार्यकर्ती मंडळी स्वागतासाठीं आली होती. मी गाडींतून उतरताच अगोदरपासून मला ओळखणाऱ्या एका सद्गृहस्थानें तेथल्या माणसाची ओळख करून दिली.

'हे आमच्या संस्थेचे उपाध्यक्ष'

'हे संचालक...'

असा परिचयविधि चालू होता. तो संपण्याचे सुमारास मागील घोळक्या-तून एक स्त्री पुढें आली. मी चकित झालों.

"कोण? चित्रा?"

"हो. मी कशाचीहि चिटणीस किंवा अध्यक्ष म्हणून औपचारिक स्वागता-साठीं आलेली नाहीं. आपल्या एका जुन्या मित्राची भेट होईल या उत्कण्ठेने आलें."

"वाः..." असें म्हणून मीं तिला न्याहाळूं लागलो.

चित्राच्या चेहऱ्यावर किंचित् प्रौढता आली होती. डोळ्यावर सोनेरी फ्रेमचा चष्मा चढला असला तरी डोळ्यांचें आकर्षण फारसें उणावलें नव्हते. लाडावलेपणाची झाक जरा कमी झाली होती. पण आत्मविश्वास वाढलेला दिसत होता. आतां हें कांहीं कांचेच्या कुंडींतले फुलझाड राहिलेलें नाहीं हें स्पष्ट दिसत होते. जगाचे वाईट अनुभव असल्याने जी तुसडेपणाची कडवट छटा येते ती चित्राच्या चेहऱ्यावर होतीच. पण त्या छटेच्या झरोक्यांतूनहि तिच्या सुस्वभावाचें सुखद दर्शन होत होतें.

मी त्या शहरीं तीन दिवस होतों.

तीनही दिवस माझ्या सर्व खाजगी व सार्वजनिक कार्यक्रमांत चित्रा छाये-सारखी मजबरोबर होती. पण निवांतपणें बोलायला काहीं उसंत मिळाली

नाहीं. मध्यंतरीं चित्रा कोणत्या स्थित्यंतरांतून गेली, कोणत्या वादळात सापडली याची सुसंगत कथा ऐकायला मी किती उत्सुक होतों! आणि तिलाहि मधून मधून डोकावणाऱ्या माझ्या औदासीन्याचें कारण समजावून घ्यायचे होते. पण काहींच जमलें नाहीं! इतके वर्षांनीं भेट झाली या आनंदावरच संतोष मानला आणि पुनः भेटण्याचें व पत्रव्यवहाराचे आश्वासन घेऊन निरोप घेतला.

मला राहून राहून आश्चर्य वाटतें ते हे कीं, मध्ये इतक्या वर्षांचा खंड पडून चित्रानें माझ्या मैत्रीचा ऐवज अगदीं सुरक्षित कसा ठेविला! या तीन दिवसात परकेपणाचा स्पर्शहि तिच्या वागणुकीला नव्हता. जणु एका भिंती-आड आम्ही अनेक वर्षे राहत आलों आहोंत अशी आपुलकी तिच्या मनो-व्यापारात मला दिसली. इतकेंच काय, पण समाज व राष्ट्र या संबंधींची तिची श्रद्धा व सेवाभावाविषयींचीं तिचीं मते देखील माझ्याच साहचर्यामुळें तयार व्हावीं अशींच होतीं. उग्र संग्रामाऐवजी सात्त्विक सेवेचे विजय हेंच चिरस्थायी असतात अशी माझ्याप्रमाणेच तिची गाढ समजूत होती. गांधीजी, नेहरू, रवीन्द्र या पूज्य नावांच्या उच्चारानेंहि ती सद्गदित होई. या विभूतींच्या विश्वव्यापी अवतारकार्यांत प्रकट होणारें सौंदर्य पाहणें हीच आपल्या जीवनाची सार्थकता आहे हे चित्राला माझ्याप्रमाणेंच वाटत होतें. मध्यंतरीच्या काळात आमच्या दोघांच्या हृदयावर एकाच श्रद्धेचे संस्कार कसे घडले? आमच्या नकळत एकाच अमृतकुंभातून वेगवेगळ्या ठिकाणीं राहिलेल्या आम्हावर कोणती दैवी शक्ति तुषार आणून टाकीत होती?

यानतर लगेच काहीं दिवसानीं चित्रा पुण्यास मला भेटली गांधीजींनीं एकवीस दिवसाचें प्रायोपवेशन सुरू केल्याने जग हादरून गेले होते! मी डेक्कन जिमखान्यावरून बसमधून येत असता लकडी पुलावर एका खादीधारी इसमाशीं चित्रा बोलत आहे असें दिसले! आमची दृष्टादृष्ट होतांच तिनें खालीं उतरण्याची मला खूण केली. पुढल्या टप्प्यावर बस थांबतांच मी उतरलों आणि परत चित्राला भेटलों. तिने तिरंगी काठाचें पातळ परिधान केलें होते. हातांत सोन्याच्या नाजुक तारांच्या वेष्टनांत पातळाच्या रंगाला शोभेशा कांचेच्या बांगड्या होत्या. तिच्या चेहऱ्यावर चिंता आणि खळबळ दिसत होती. आम्ही एका उपाहारगृहाचा आश्रय केला. या वेळीं चित्रा बरेंच

बोलली. पण त्यांतहि अपुरा भाग पुष्कळ होता. दुसरे दिवशीं आगाखान पॅलेसवर मोर्चा घेऊन चित्राच्या काहीं मैत्रिणी जाणार होत्या. त्याची व्यवस्था करण्यासाठीं चित्रा आली होती. पण ती पुण्यांत फार थांबली नाहीं. त्यामुळें या मुक्कामात आमची पुनः भेट झाली नाहीं।

माझा एकदा हरवलेला काव्यग्रंथ पुनः सापडला. तसेच चित्राचे बाबतींत झाले। नाहीं का? एकदा जुळलेला तिच्या स्नेहाचा धागा मध्ये अनेक वर्षें नापत्ता झाला होता. तो आता पुनः हातीं आला आहे. चित्राचा जीवनग्रंथ अद्यापि अपूर्ण आहे. त्यातील कित्येक पाने मला अजून वाचावयाचीं आहेत. कर्णोपकर्णी जे ध्वनि-प्रतिध्वनि येतात त्याची जुळणी करून मला अज्ञात असलेल्या चित्राच्या जीवनाची संगति मी लावीत असतो. चित्राच्या मोकळेपणाचा अर्थ ती उच्छृंखल आहे असा केला जात असेल आणि तिच्या स्वावलंबी जीवनाला उन्मत्तपणा हे विशेषण दिले जात असेल याविषयीं मला संशय नाहीं. तिच्यासारख्या भक्तिमान् हृदयाला यातनेहून कोणती दुसरी बिदागी मिळणार? अगदीं अलीकडील एका सुंदर पत्रात चित्रा लिहिते—

" प्रतिसृष्टि निर्माण करण्याची शक्ति दुर्दैवाने माझ्याकडून हिरावून घेतली आहे। पण तुमच्यासारख्या जिवलग मित्राच्या सुंदर सुंदर कलाकृतींचा आस्वाद घेता येईल ही रसिकता कायम आहे हें तरी भाग्यच नाहीं का? शिक्षण घ्यावें, आणि वैयक्तिक जीवनाच्या अरण्यात नामशेष न होता काहीं समाजसेवा करावी हें ध्येय पुष्कळ वर्षांपूर्वी ठरविलं होतं. ते साध्य कितपत होईल, कुणास ठाऊक? पण केवळ मनोमय अवस्थेतहि तें अभंग राहावें यासाठीं खडतर त्रास सोसला आहे मीं। जीवनमार्गावर ऐटीनं पाउलं टाकताना मी दिसत असेन तुम्हाला. पण पावलाच्या डौलाकडे पाहताना त्यांच्यावरील लाल रंगाकडेहि पहा. ती मेंदी नाहीं, तर उपहास अपयशाचे काटे बोचल्यामुळे आलेलें रक्त आहे तें।। अर्थात् मधुर अनुभवानाहि मी पारखी आहें असं समजूं नका. तुमचा स्नेह हें याचं मोठं उदाहरण नाहीं का? मला विलक्षण भीति वाटते की माझे स्वभावदोष तुम्हांला कळले तर तुम्ही भीतीने कदाचित् स्नेह कायमचा तोडाल. हें मला नको आहे म्हणून तर तुमच्या निकट

सहवासात येण्यापेक्षां दूरतेचं दुःख अनंतकाळपर्यंत सोसण्याची माझी तयारी आहे!"

पण चित्राची भीति किती व्यर्थ आहे! याच पत्रांत व्यक्त झालेली तिची प्रेमलता इतकी प्रभावशाली आहे की, तिच्या स्वभावातले कुठलेहि दोष (असलेच तर!) या प्रेमलतेपुढें निष्प्रभ होऊन जातील आणि अग्निशिखेतून वर येणाऱ्या सीतेप्रमाणे तिची शुद्ध प्रेममूर्ति तेवढी कायम राहील.

## पूर्णिमा : : : ६

पहाटे चारचा सुमार होता. आकाशांतील मोठाली नक्षत्रे पृथ्वीवर झेप घेण्याकरिता खाली उतरत आहेत असे वाटत होते. झाडाच्या काळ्या-कभिन्न छाया, पलीकडे चकाकणारा नदीचा प्रवाह, काळपुरुषाच्या मेजा-प्रमाणे दिसणारा सिंहगड, साराच देखावा भव्य होता. आकाशगंगेच्या दोन तीरावर चकमकणारे दोन तारे होते. ते पाहून एकादे चिरविरही चक्रवाकाचे हें स्वर्गस्थ जोडपे तर नसेल ना, अशी कल्पना सहज येई. पानातून पाखराची चुळबूळ सुरू होती. गुलाबी थंडी आपला अंमल बसवूं लागली होती.

मी आणि पूर्णिमा एका गायनाच्या जलशाहून परत येत होतो. आज गाणे फारच रंगले. खुद्द गायक मोठे कल्पक कलाकार होते आणि आपणा-जवळ काही उरूं द्यायचे नाहीं अशा औदार्याने त्यानीं आपली कला प्रगट केली होती. त्याच्या गानकुशल पत्नीनेंहि दोनचार भावमधुर चिजा आळवून बैठकीचे माधुर्य अतोनात वाढविले. त्या स्वरसमेलनांतून मनें बाहेर यायला तयारच होईनात. मी आणि पूर्णिमा एकमेकाशीं बोलत नव्हतों. गाण्यातल्या स्वरपाक्ति मनात पुनः पुनः उमटत होत्या. सारींच गाणीं गोड होतीं. पण ज्या गाण्याने माझ्या अंतरंगाला पुलकित केलें त्याचे सूर मनात ध्वनि-प्रतिध्वनि निर्माण करीत आपला प्रभाव गाजवीत होते. पण माझ्यासारख्या सामान्य माणसाला जे गाणें आवडले तेच पूर्णिमासारख्या तज्ज्ञ रसिकेला आकर्षक वाटलें असेल का असा विचार माझ्या मनांत आला. इतक्यात मौन सोडून पूर्णिमा म्हणाली, "भाई, आज **'आ'जा करके पार... सजनुवा'** या ओळीवर रावनीं जी कलाकुसर दाखविली ती जन्मांत

विसरणं शक्य नाहीं! खरं कीं नाहीं?" मीं चकित होऊन म्हटलें, "म्हणजे? माझ्याप्रमाणे तुम्हीं सुद्धा '**रावी के उसपार**" या वरच रेंगाळत आहा तर?" "का बरं? रावीवर तुमचा कांहीं विशेष हक्क आहे काय? आम्ही कां न यावं?" असें म्हणून पूर्णिमा मनमोकळेपणाने हंसली. एकाद्या साध्या वाक्याचे सूक्ष्म उल्लेखाने विनोदात रूपातर करण्याची कला पूर्णिमेला फार अवगत होती. तिच्या स्फोटासारख्या हास्यानें जणुं मनातली स्वरमाला वितळली. मी तिच्याकडे पाहूं लागलों. हिरव्या स्वेटरनें वेष्टिलेली ती मनोहर ठेंगणीठुसकी आकृति, केस किंचित् विसकटल्यामुळे अधिकच लहान दिसणारें खानदानी मुखमंडल, विनोदबुद्धि व प्रेमळता यानीं चकाकणारे विशाल डोळे, गार वाऱ्याने अधिक ताबुस झालेले गाल व नासिका— इतकीं वर्षे पाहिलेली ही युवती मी आजच पहिल्याने पाहत आहें असा नवा साक्षात्कार मला होत होता.

इतक्यात पूर्णिमेचा बंगला आला. फिरकीच्या फाटकातून आत शिरताना पूर्णिमा त्याच हृदयंगम चिजेतील एक ओळ "**प्रेमपुजारी बनकर आ जा**" गुणगुणत होती. तिने दारावरील घंटेचे बटन दाबले. तेंव्हा "आलें अं" "...अय्या, आक्का आली!" "आले ग!" असे तीनचार प्रकारचे मंजुळ आवाज आले. आपल्या बहिणी आपली मार्गप्रतीक्षा करीत जागयाच आहेत या कल्पनेने पूर्णिमेच्या ओठावर समाधानाचे स्मित उमटले. "अच्छा, भाई, आता थँक्स देऊं नको ना?" "नको नको!" आणि क्षणभर थाबून मी म्हटले, "पूर्णिमाताई!" "काय?" पूर्णिमा सरसर पायऱ्या उतरून पुढें आली आणि तिने विचारले, "काय, भाई?" नंतर भानावर आल्यासारखे मला झालें आणि मीं म्हटलं, "काहीं नाहीं. .अं! येतो म्हटलं! परवा भेटेनच." इतकें बोलून मीं तडक घरचा रस्ता सुधारला.

पूर्णिमेच्या बाबतींत माझा हा अनुभव एकुलता एकच आहे असें नाहीं. आम्ही एकातात अनेकदा बोलत बसलो आहोत. सहली केल्या आहेत, समारंभांत आडोशाला जाऊन गोष्टी केल्या आहेत. पण निवेदनाच्या शेवटच्या मुक्कामाला मी कधीं पोहोचलो नाहीं. अलीकडील एकाद्या ठिकाणावर निवेदनाची गाडी थाबली असता मी बहुधा उतरून पसार होतों. या अपुऱ्या सफरींत मीं काय साधलें याचा अंदाज मीं घेतलेला नाहीं. पण अशा अनेक

त्रुटित प्रकरणानीं माझ्या जीवनाला माधुर्य आले यांत शंका नाही. प्रत्येक वेळीं निवेदनाचा प्रवास खंडित न करता केंव्हा तरी अखेरचा पल्ला मीं गांठला असता तर कदाचित् पूर्णिमेच्या हृदयंगम स्नेहाची कादंबरी एका लघुतम कथेतच आटपली असती.

दूधसागरावरून रेल्वेने गोव्याकडे गेलेल्या लोकांना माहित आहे कीं, दूधसागर एकदा आपणाला दर्शन देतो आणि गाडी वळूं लागली कीं नजरेआड जातो. पण काहीं वेळानें पुनः तेच दिव्य दृश्य आपणाला दिसतें. एकादें विलक्षण स्वप्न जसे पुनः पुनः आपणांला आठवते तसे दूधसागराचें दर्शन वारंवार आपणाला घडते. गेल्या दीड दशकाच्या काळात पूर्णिमेचा मोहक सहवास मला असाच मधून मधून घडत गेला आहे. या दृष्टांतात फरक एवढाच करूं शकेन कीं, दूधसागर प्रत्येक दर्शनाचे वेळीं लांब लांब गेलेला असतो; पण प्रत्येक वेळच्या सहवासानें पूर्णिमा आणि मीं अधिकाधिक जवळ येत गेलों.

पूर्णिमेला मीं प्रथम पाहिलें तेंव्हा कौमार्याच्या मध्यावर मी असेन. इंग्रजी पाचवींत होतों आम्ही. शाळेंत माझा चित्रकार म्हणून लौकिक होता. कुठलेंहि हस्तलिखित मासिक निघालें तरी मुखपृष्ठ माझ्याच कुंचलींतून निघालेले असावयाचें. कलेच्या बाबतींत मी ' अ–पक्ष ' वृत्ति धरिली होती. एका गटाच्या ' वसंत ' मासिकांत दुसऱ्या गटाच्या ' शार्दूल ' विरुद्ध व्यंगचित्रें काढावी आणि ' शार्दूल 'च्या विनंतीवरून नंतर ' शार्दूल 'मध्यें ' वसंता 'ची सचित्र कुचाळी करावी हा माझा व्यवसाय असे. मी एकटाच चित्रकार असल्यानें सर्वांचाच नाइलाज असे आणि माझें सर्वगामित्व ते चालवून घेत. शाळेच्या जगांत एक सन्मान्य कलावंत म्हणून शिक्षक व वर्गबंधू यांच्यांत माझी चहा होती.

एक दिवस मधल्या सुट्टींत वर्गातला एक जनानी चेहऱ्याचा श्रीमंत मुलगा माझ्याकडे आला. तो कधीं कुणाशीं बोलत नसे. मुलीसारखा लाजरा होता. त्यामुळें आपणहून माझ्याशीं तो बोलण्यास आला याचें मला आश्चर्य वाटलें. तो म्हणाला, " तूं चित्रं चांगलीं काढतोस. आमच्या घरीं आम्ही एक मासिक काढत असतों, त्याचीं देशील का चित्रं काढून ? माझा एक दूरचा मावस भाऊ व बहीण माझ्याकडे शिकायला असतात. आम्ही तिघं मिळून तें मासिक

चालवितों. पहा... " त्याची लडिवाळ विनंति आणि आर्जव यानीं मी भारून गेलों आणि सुट्टीच्या दिवशीं त्याच्याकडे जायचें कबूल केलें.

या बालसंपादकांच्या त्रयींतल्या एकाची (माझ्या वर्गबंधूची) ओळख झाली होती. मी चित्रें काढायला म्हणून ज्या दिवशीं गेलों त्या दिवशीं त्याचा तो 'दूरचा मावसभाऊ' भेटला. माझें काम संपल्यावर आतून चहाचे पेले आले, तेव्हा पडद्याच्या आडून सर्चलाइटसारखे दोन तेजस्वी डोळे आणि काळ्याकभिन्न ढगासारखे विपुल केस दिसले. मी कुतूहलानें पाहूं लागलों. तेवढ्यात माझा वर्गबंधु म्हणाला, "ती पूर्णिमाताई. या आमच्या सुरेशची बहीण..." पडदा सरकला गेला आणि ढग व वीज एकदम डोळ्या-आड गेलीं!

माझ्या वर्गबंधूचें तें कौटुंबिक मासिक मजकडून फार दिवस सेवा घेऊं शकलें नाहीं. वडिलांची बदली झाल्यामुळें तो माझा मित्र दूर गावीं गेला. पूर्णिमा व तिचा भाऊ हींहि त्याच्याबरोबर गेलीं. तो माझा बालमित्र मला अद्यापि भेटलेला नाहीं! मौज अशी कीं लौकरच चित्रकलेचीहि माझ्याशीं कायमची ताटातूट झाली. रंगरेषांच्या जालांतून आपणाला सोडवून मी शब्द-सृष्टींत येऊन राहिलों. देवदूत जेब्राइल महंमदाकडे येऊन त्यानें दिव्य कुराण त्यापुढें ठेवलें आणि तो अंतर्धान पावला. त्याप्रमाणें पूर्णिमेच्या सौंदर्याची ओळख करून तो माझा वर्गबंधु माझ्या जीवनांतून गेला. आपल्याला जिची प्रतिमा रेखाटणें अशक्य आहे अशी मूर्ति मजपुढे ठेवून चित्रकलाहि अदृश्य झाली!

पुढें खानदेशच्या भूमींत दैवाशीं झुंजत राहण्याची पाळी मजवर आली. कष्ट उपसत होतों. मनातील अतृप्त आकांक्षांच्या वेदनावर कसाबसा विजय मिळवीत होतों. इतक्यात एके दिवशीं सुरेश अचानक भेटला. माझ्या आश्च-र्याला पारावार उरला नाहीं. सुरेश भेटला तेव्हां पूर्णिमा भेटणारच! अनेक महिन्यानीं जहाजाच्या डोलकाठ्यांवर पाखरें येऊन बसलेलीं पाहताच कोलंबस जसा हर्षभरित झाला, तसें माझें अंतःकरण आनंदित झालें. सुरेशहि खूष झालेला दिसला. त्यानें मला घरीं नेलें. आणि पुढे मी जवळ जवळ दररोज त्याच्याकडे जाऊं लागलों.

पूर्णिमेचें दर्शन होई, पण अगदीं ओझरतें! एकादे वेळ ब्लाउझ, कंगवा,

पेटी किंवा असाच काहीं जिन्नस घेऊन जायला पूर्णिमा बैठकीच्या खोलींत येई, पण थांबत मात्र नसे. सुरेश तिला आणि मला उद्देशून बोलला तर एकादे वेळ स्मितपूर्वक कटाक्ष टाकी एवढेच. बाकी "सुरेश घरात नाहीं," "चहा झाला आहे" असल्या साध्या वाक्याखेरीज तिच्या मधुर शब्दपंक्ति माझ्या कानीं कधींच आल्या नाहींत. कित्येकदा सुरेश मला माझ्या कविता म्हणायला सांगे. पूर्णिमा अंतर्गृहातून त्या ऐकत असे. पण बाहेर येऊन मनमोकळेपणाने धन्यवाद तिने कधींच दिले नाहींत. पण ती आत ऐकत आहे या विचारानेंच माझ्या स्वरात कंप येई आणि माझा चेहरा लाल होऊन गेलेला समोरच्या आरशात दिसे.

असा सहा महिन्याचा काल गेला. आमच्यातलें अंतर कमी झाले नाहीं, पण सौहार्द मात्र खास वाढत गेले. केव्हा मी निरोप घेऊं लागलों तर सुरेशने म्हणावे, "थाबा, पूर्णिमा म्हणते चहा झाला आहे." एकदा सुरेशच्या घरीं एक लहान मूल गाताना मीं ऐकले—

"तुझ्यामुळें पाषाणांत  
झरे लागले जिवंत।  
वठलेली जीवनाची  
बाग झाली शोभीवंत॥"

माझीच कविता होती ती. मी त्या चिमण्या जीवाला विचारले, "कुणी रे शिकवल हे गाणं तुला?" त्यानें उत्तर दिले, "पूर्णिमाताईनं." त्या उत्तरानें केवढा मधुर अहंकार जागृत झाला माझ्या मनात! अशा गोड प्रसंगाची पिसें व तृणपर्णे वेळोवेळी वेचून पूर्णिमेच्यासाठीं अंतःकरणात मीं सुंदर घरटें तयार केलें. पण तें घरटे आणखी कित्येक दिवस रिकामेच राहणार होते. दैवाचीं चक्रे पुनः फिरलीं आणि पूर्णिमेशीं भरपूर बोलण्याइतका मनमोकळेपणा यायच्या आंत मला ते गाव सोडून पुण्यास परत यावे लागलें.

काहीं वर्षे पूर्णिमेचा माग मला लागलाच नाहीं. गुजराथेंतल्या एका शहरीं पुनः सुरेशची गाठ पडली. इतर सर्व मंडळी भेटली. पण पूर्णिमा मात्र तेथे नव्हती. संगीताची पदवी घेऊन उत्तर हिंदुस्थानांत कुठें तरी गायन-शिक्षिका म्हणून ती गल्याचें कळलें. तिच्या एक दोन रेकॉर्डसुहि निघाल्या होत्या.

त्यामुळे एक प्रकारची 'शाब्दिक' भेट झाल्यासारखें वाटलें एवढेच. पण त्यामुळें हुरहूर दुणावली. पूर्णिमेच्या सहवासात गेलेल्या क्षणाची पुनः पुनः आठवण करणें याखेरीज दुसरें काहींच माझ्या हातीं नव्हतें.

—आणि नंतर एके दिवशीं रस्त्यांत एक साधारण तोडओळखीचा तरतरीत छोकरा मला पाहतांच सायकलवरून खालीं उतरला. पुण्याच्या एका प्रसिद्ध सिनेमा कपनींत एक नवीन कुलीन अभिनेत्री आल्याचे त्यानें मला सांगितलें. "काय म्हणता?" मीं आश्चर्योद्गार काढला. कारण त्यानें तिचें जे नाव सांगितलें त्यावरून ती पूर्णिमेची धाकटी बहीण होती हे मला कळून चुकले. "तुम्हाला म्हणूनच रस्त्यात हटकून ही बातमी मीं सांगितली. त्या फॅमिलींचा माझा फार घरोबा आहे. तुमचं नाव तिथं बरेच वेळा निघाले—अच्छा, भेटा त्याना..." असें म्हणून त्याने सायकलवर टाग टाकली. किंचित् पुढे जाऊन आठवल्यासारखे करून त्याने एका तारेच्या खांबाचा आधार घेऊन सायकल उभी केली. सीटवरून न उतरताच त्या नव्या अभिनेत्रीच्या घरचा पत्ता सांगितला, आणि किंचित् लवून त्याने सायकलला गति दिली व तो पसार झाला.

केवढ्या तत्परतेनें मी घराचा पत्ता काढला! सर्वांना आनंद झाला. पूर्णिमा मुंबईस होती. ती काहीं दिवसानीं आली. पहिल्याच भेटीला तिच्या बोलण्यांत जो आर्जवीपणा व जें माधुर्य दिसले त्यावरून मला खूपच धीर आला. अगदीं थोड्या शब्दांच्या देवघेवीनें आणि काही प्रेमळ कटाक्षानीं जो ऋणानुबंध मागें वाढीला लागला होता तो अद्यापि कायम आहे याचा प्रत्यय आल्याने मला अनिवार आनंद झाला. किती वर्षांनीं आम्ही भेटलों! किती जमाखर्च पुरा करावयाचा होता! तिच्या आणि माझ्या जीवनात किती क्रांतिकारक स्थित्यंतरें झालीं होतीं! पूर्णिमा संकोच न करता सर्व काहीं सांगे. तिने मला केवळ धीटच केलें असे नाहीं तर माझ्याच शक्तीचा प्रत्यय मला आणून दिला. या वेळचीं दोन वर्षे पुढें मस्तकावर कसला आघात झाला तरी मी विसरणार नाहीं!

या वेळीं पूर्णिमेच्या सौंदर्याचा सर्वांगीण विकास झाला होता. पण मी विशेष कशानें मुग्ध होत असें हें सांगायचें तर तिच्यातील परस्परविरोधी गुणांच्या मनोहर संगमामुळें असें म्हणतां येईल. तिची श्रीमंती राहणी आणि

आंदोलनाचे वादळी दिवस होते ते! मी परत आल्याचे पाहून सर्व बहिणी चकित झाल्या. " कुठलंहि आश्चर्य मानण्याचे दिवस आज राहिले नाहींत. " मी सांगूं लागलो, " आताच कर्फ्यू ऑर्डर पुकारली गेली आहे. आमचे आणि सरकारचें प्रेम किती आहे हे तुम्ही जाणताच! तेव्हां कायदेभंग करून घरीं जायचें म्हटलें तर सरकारी पाहुणचार ठेवलेलाच आहे. पण त्याची मला जरूर वाटत नाहीं. म्हणून तुमच्या आश्रयाला हा पाथस्थ आज राहणार. एकादी वाकळ द्या, अर्धी दशमी हातावर टाका, म्हणजे इथं रात्र काढतो!." सर्वजणी हसूं लागल्या. मी मुक्कामाला राहणार याचा सर्वांनाच फार आनंद झाला होता.

जेवणें झाल्यावर अंथरुणावर पडल्यापडल्या आम्ही बोलत होतों. आंदोलनाच्या रोमांचकारी कथा व आख्यायिका हाच बोलण्याचा विषय होता. त्यातच अभिनेत्री भगिनी आपल्या स्टुडिओतल्या गमती सांगत होती. धाकटी बहिण आपल्या मुख्याध्यापकाला कसे चकविले याचे रसभरित वर्णन देत होती, तिसरी बसमुळे पुण्यात निर्माण झालेल्या कांहीं नव्या विनोदी कथा सांगत होती, तर चौथी एकादा अनवधानामुळें उडालेला शब्द उचलून त्यावर मार्मिक कोटी करीत होती. पूर्णिमेनें आज श्रवणभक्तीच करायचे ठरविले होते असे दिसलें. बोलता बोलता एकेक कमलिनी मिटत गेली. सामसूम झाले. मी आणि पूर्णिमा काय ते जागे राहिलो!

आणि मग पूर्णिमा आणि मी बोलूं लागलो. 'तो' विषय आज जणुं काढायचाच असें तिने ठरविलें असावें. माझ्या त्या बालमित्राची आणि आपली सर्व हकीकत मला तिनें सांगितली. ती ऐकत असता तिच्यापेक्षाहि मी गहिंवरलो असें म्हणण्यास हरकत नाहीं. हा माझा बालमित्र व पूर्णिमा यांची एकमेकावर अनन्य भक्ति होती. पूर्णिमेच्या सांगण्यात असे आले की, उभय कुटुंबातील जबाबदार व्यक्तींना ही भक्ति प्रणयाच्या स्वरूपाची वाटली. पूर्णिमेला त्या लहान वयात आपली बाजू स्पष्टपणे मांडण्याइतके चातुर्य कुठून असणार? ज्या कित्येकांना पूर्णिमेची भक्ति अगदीं सात्त्विक वाटे त्यानाहि या भक्तीचें रूपांतर प्रेमात होणे संभवनीय वाटले. विवाह अशक्य होता. (पण पूर्णिमेच्या मनात ती कल्पनाहि नव्हती!) अनेक वादळे झाली, कित्येकाच्या डोळ्यांत अश्रु आले, पूर्णिमेला दूषणें दिलीं

गेलीं ! अखेर भयंकर यातना उघड्या डोळ्यांनीं पत्करून पूर्णिमेने त्या आपल्या सुहृदापासून आपली कायमची ताटातूट करून घेतली !

अर्थात् जबाबदार मंडळींचे धन्यवाद पूर्णिमेने मिळविले. पण या एकंदर शोकपूर्ण घटनेने पूर्णिमेच्या मनाची नासधूस कांहीं कमी केली नाहीं. कला-क्षेत्रातली आपली महत्त्वाकांक्षा तिला सोडून द्यावी लागली. इतकेंच नव्हे, तर गतकालात पुरलेल्या त्या घटनेचे पिशाच पुनः पुनः जागृत होई आणि सुरळीत चाललेल्या जीवनक्रमांत नसत्या अडचणी येत ! खरोखरीच्या प्रणयाची पूर्ति होण्याच्या मार्गांतहि कित्येकदा हे पिशाच अपशकुन करीत असे.

हा सर्व इतिहास कळल्यावर मात्र पूर्णिमेचें जीवन संपूर्णपणे कळल्याचा संतोष मला झाला. बाहेर पुष्पपर्णांनीं सुरम्य असलेल्या सृष्टींत अंतरंगीं हिरे-माणकाच्या खाणी आहेत हे कळल्यावर केवढी कृतार्थता वाटते ! पूर्णिमा अंतर्बाह्य रमणीय आहे, संयमाच्या व त्यागाच्या वेलेने वेष्टिलेला तिचा जीवन-सागर जितका सुंदर तितकाच खोल आहे हा पूर्ण प्रत्यय आला.

आज पूर्णिमेला जे पाहिजे ते मिळाले आहे. कौमार्यातल्या भक्तीकडे तिला पाठ फिरवावी लागली असली, तरी यौवनातला प्रणय मात्र पूर्ण सफळ झाला आहे. मागील वर्षी विवाहमंगलात वधूवेषात असताना तिला मीं पाहिले तेव्हां तिच्या मुखावर विलसणारी तृप्ति अविस्मरणीय वाटली मला. आपण मनाने वरलेला शिलेदार मिळविला याचा अभिमान आणि गोंधळ व माधुर्य यांचें मजेदार मिश्रण तिच्या चेहऱ्यावर होतें. तिच्या जीवनातलीं बारा-चौदा वर्षे कमी झालीं होतीं. द्वादशवर्षा बालिकेचे निर्व्याजपण जेहऱ्यावर आले होतें !

पूर्णिमेचीं विविध दर्शनें माझ्या हृदयांत रंगविलेली आहेत. तिचे सौंदर्य अवर्णनीय तर खरेंच, पण तिचा आणि माझा स्नेह मला त्याहीपेक्षा अवर्णनीय वाटतो. ह्या स्नेहाचे स्वरूप प्रणयासारखें असले तरी प्रणय तर तो खासच नव्हे. जीवनपुरी आणि असावरी या रागिण्या बाह्यतः किती सारख्या वाटतात ? पण त्यामध्यें सूक्ष्म फरक आहेच कीं नाहीं ? आमचा स्नेह आणि प्रणय याच्यांत असाच सूक्ष्म पण महत्त्वाचा भेद आहे. या भेदामुळें कांहीं बाबतींत प्रणयापेक्षाहि आमचा स्नेह अधिक हृदयंगम झाला आहे. खरोखर

पूर्णिमेच्या मोहक व्यक्तिमत्त्वाच्या पार्श्वभूमीवर त्याचें वर्णन रेखाटणें मला शक्य नाहीं. कित्येकदा मला ती कालिदासाची आख्यायिका अशा वेळीं आठवते. रघुवंशाचा एक सर्ग अर्धाच लिहिल्यावर पुढें काहीं सुचेनासें होऊन तो झोपीं गेला. पुढे उठून पाहतो तों सर्व सर्ग प्रत्यक्ष सरस्वतीनें पुरा करून ठेवलेला! अर्थातच हें काव्य अमर होऊन राहिलें आहे. पूर्णिमेवर मी लिहायला घेतले आणि सरस्वतीनें अशी कृपा केली तरच माझ्या मनांतले सर्व दिव्यभाव शब्दात प्रकट होतील. पण कालिदासाचें हें भाग्य मला कुठलें लाभायला?

*

## रमणी : : : ७

जगात उपलब्ध असलेली एकादी उपयुक्त गोष्ट आमच्या पुण्यांत नव्यानें आली आणि तिला आम्हीं विनोदाची जोड दिली नाहीं तर मग आम्ही पुणेकर ते कसले ! बस सर्व्हिसचेंच उदाहरण घ्या ना ! इतर प्रसिद्ध शहरीं असणाऱ्या बस सर्व्हिसच्या मानानें आम्ही किती घरगुती वातावरण पुण्याला निर्माण केलें आहे ! येथें बसमध्ये रेशनिंगच्या गव्हापासून सॅन्फ्रान्सिस्को परिषदेपर्यंत आणि सहशिक्षणापासून सुभाषबाबूंच्या 'आझाद हिंद' सैन्यापर्यंत शेंकडो विषयाची चर्चा होते. तुम्ही पट्टीचे तुसडे असाल तरच या सामुदायिक चर्चेतून सुटूं शकाल. तिकिटें देणाराशीं कोटीबाज पद्धतीनें बोलणें, आपण जागचें न हलता नवागताना, विशेषतः सुदर युवतींना जागा करून देण्याचा आदेश उतारूंना शिष्टपणाने देणे, 'रेशनिंग ऑफिस का ?' म्हणून तोंडभर प्रश्न विचारून त्याच्या खाजगी जीवनांत शिरण्याचा प्रयत्न करणें अशा नाना गमतींचा गोपाळकाला बसच्या या धावत्या जगात आढळतो. म्हणून केव्हांहि बसमध्ये शिरताना अशाच कांहीं विनोदी घटनेची अपेक्षा बाळगून मी आंत पाऊल टाकतों.

एकदा रात्रीं आठच्या सुमारास मी डेक्कन जिमखान्यावर स्वारगेटाकडे येणाऱ्या बसमध्यें शिरलों. कांहीं तरी महत्त्वाच्या विषयावर मंडळींची सामुदायिक चर्चा चालू होती. दोनचार लोक मात्र स्तब्ध होते.

"दररोज या वेळेला ती इथे उतरते. प्रभातमध्यें रात्रीं शूटिंगला जात असावी." एक मध्यवयीन शेटजी तर्क करीत होते.

" नक्कीच. परवां ' लाखाराणी 'चं ' स्टील ' पाहिल त्यात हिचा चेहरा होता. " एक तुळतुळीत काळसर चेहऱ्याचे छाकटे पोर उद्गारले !

" पण नटी दिसत नाहीं ! बाकी आता काय म्हणा कुलीन घराण्यातल्या मुलीसुद्धा सिनेमात जातात. " जणूं आपल्या कुटुंबात हे पुरोगामित्व धिंगाणा घालूं लागले आहे अशाच चिडीने निश्वास टाकून एक पेन्शनर म्हणाले !

सर्व उद्गारावरून बसने नियमाने येणाऱ्या कोणी लावण्यमयीने या मंडळींना वेधून घेतलें होते हे स्पष्ट होत होते. इतक्यात चहा प्यायला गेलेले सारथी परतले आणि बस सुरू झाली. बसच्या खडखडाटात चर्चा बंद पडली !

योगायोग असा की, चर्चाविषय झालेली ती रमणी एकदोन दिवसातच मला बसमध्ये भेटली. तिची रूपसंपदा असामान्य होती असे मला मुळीच वाटले नाहीं. परतु तिच्या साध्या पण ठसठशीत चेहऱ्यात जीवनशक्तीचा प्रबळ विलास दिसे. त्यामुळे रूपातल्या उणीवानींहि तिचें आकर्षण उत्कट केले होते. त्यातून सुरमा, मेंदी, जरीचे गोंडे, हालतीं कर्णभूषणें, जरतारी किनारीचीं रंगीबेरंगीं पातळे इ० साधनानीं आपल्या रूपाभोंवती हृदयंगम वलये निर्माण करण्याची जादूगिरी तिला साधली होती. दोन दिवसांपूर्वी बसमध्ये तिच्याविषयीं चर्चा करीत असलेल्या मंडळींची आठवण मला झाली. त्याच्यात उथळपणा आणि काहींशी विकृत जिज्ञासा होती हे खरे, पण हिच्या सौंदर्याचें गुप्त सामर्थ्य त्यांना प्रतीत झाले होते हे खास. मी मनातून त्या मंडळींना दोषमुक्त करीत या रूपमतीच्या आकर्षणाचे रहस्य शोधूं लागलो.

नंतर ती मला अनेकदा दिसली.

दर वेळीं तिच्या जीवनाचा क्रम व अर्थ लावण्याचा मी प्रयत्न करीं आणि दर वेळीं आपला पूर्वीचा अंदाज चुकला आहे याचा मला प्रत्यय येई ! पण या दर वेळच्या निराशेने मी नाउमेद मात्र झालों नाहीं. तिच्या जीविताशीं माझा संबंध काय, तिचा चरित्रक्रम उलगडला तर मला कोणता फायदा किंवा तोटा होणार आहे याचा मी विचार केला नाहीं. आवश्यकताच वाटली नाहीं मला त्याची. आदर्श काव्यें किंवा अद्‌भुत सृष्टिचमत्कार यांचा अन्वयार्थ

आपण लावतों तेव्हां त्यांच्याशीं प्रथम आपला कसला ऋणानुबंध असतो ? त्याच्यांत प्रकट झालेलें संमोहकारी चैतन्य हाच त्यांचा शोध घेण्याचा आपला अधिकार. या स्वयंभू अधिकाराच्या आधारावर मी तिचें जीवन न्याहाळीत होतों.

एकदा पोस्टाच्या बाहेरील फळीवर ती एक पत्र पुरें करीत होती. शेजारीं दोनतीन जाड पुस्तकें व त्यावर कोपर टेकविलेलें. हाताच्या आडून पुस्तकाच्या पानाच्या कडावर घातललें नाव दिसत होतें. "ला...ळकर" एवढींच अक्षरें स्पष्ट वाचता येत होतीं. खास हिचें नांव 'लीला' असावें ! आणि आडनांव ? 'ळकर' एवढीं तीन अक्षरें कळून या कोड्याचें एकच उत्तर येणें शक्य नव्हतें. तरी पण 'हुल्याळकर', 'शिराळकर', 'प्रियोळकर' अशीं आडनांवें जमवून पाहिलीं. पण अमुक नांव म्हणजे अमुक जात निश्चित असायची. आपलें समाजशास्त्रीय ज्ञान व अवलोकन वापरून हिच्या रूपलावण्याच्या तऱ्हेवरून तिची जात कोणती असावी याचा तर्क केला आणि त्या तर्कावरून आडनांवें आठवून पाहिलीं. एक मनाशीं पक्केंहि केलें. पण तेच तिचें आडनांव होतें कशावरून ?

इतक्यांत एक मैत्रीण तिला हाक मारायला आली. "बेबी, चल ना," मैत्रीण म्हणाली. मैत्रिणीनें संबोधल्यामुळेंहि या रमणीचें मूळ नाव कळायला मदत झाली नाहीं हें उघड होतें. ती म्हणाली, "थाब ग ! माझं काही पत्र आलं आहे का पाहते पोस्टात." माझें तर्कयंत्र पुनः जोरानें फिरूं लागलें. प्रवासी मंडळी आपलीं पत्रें पोस्टमास्तरच्या नांवावर मागवितात. मग ही पुण्याला कुठून सफरीवर आली आहे कीं काय अशी मला शंका आली. या शंकेनें ही लौकरच पुणें सोडणार या कल्पनेला जन्म दिला. कांहीं अकारण दूरदर्शानें खिन्न झाल्यासारखें वाटलें मला. पण दुसरा एक विचार उद्भवला आणि पहिली शंका दूर झाली. ही कोणा तिऱ्हाइताकडे राहत असेल किंवा घरीं खूप मंडळी असतील. नेमकें हिच्याच हातांत पडायला पाहिजे असें पत्र कदाचित् ही C/o पोस्टमास्तर या पत्त्यावर मागवीत असेल. हाच तर्क मला खरा वाटला. मग एका प्रणयरहस्याची नायिका कल्पून मी तिच्याकडे वेगळ्या दृष्टीनें पाहूं लागलों.

आठच दिवसांनी एका नाटकगृहांत तिची गांठ पडली. "लग्नाची बेडी"

हें नाटक होतें. नाटकगृहात शिरून माझ्या खुर्चीवर बसल्याबरोबर एकदां मीं आजूबाजूला नजर टाकली. माझ्या मागच्याच बाजूला ती रमणी आणि तिची मैत्रीण बसली होती. नाटक आज विशेष रंगणार याचा विसारच मिळाल्या-सारखें मला वाटले. दुसऱ्या अंकाच्या आरंभीं मला वाटतें पहिली घंटा झाल्यावर असेल ती रमणी आपल्या मैत्रिणीशीं पहिल्या अंकातील अभिनय, नेपथ्य इ० गोष्टींविषयीं चर्चा करीत होती. मध्येच मैत्रीण म्हणाली, "काहीं म्हण, तुझ्यासारख रश्मीचं काम कुणाला साधायचं नाहीं." ती रमणी अर्थात जरा लाजली पण नंतर म्हणाली, "नाहीं ग ! हा रश्मीचा पार्ट सुद्धा काहीं कमी नाहीं ॲक्टिंगमध्ये." या संभाषणावरून मला पुनः तर्क लढविण्याची स्फूर्ति आली. खास ही एकाद्या नाट्यसंस्थेंत अभिनेत्री म्हणून गाजलेली असावी. आता तर कुठे तरी रंगभूमीवर हिचा चेहरा पाहिल्याचे सुद्धा मला आठवूं लागले. एवढी घरंदाज स्त्री एकाद्या ध्येयवादी नाट्यसंस्थेंतच होती हे निश्चित. अर्थात् या ध्येयवादी नाट्यसंस्थेनें रंगभूमि व संस्कृति यात क्राति करण्याचे प्रयत्न केले असतील आणि आमच्या सामान्य प्रेक्षकाना ते न पटल्यामुळें ही संस्था कायमची बंद पडली असेल. पण इतक्यात पडदा वर गेला आणि विचारपरंपरा तुटली.

एकदा मी स्टेशनवरून येत होतो. जंगली महाराजच्या स्टॅंडवर ती बसमध्ये चढूं लागली. खालीं कोरलेल्या मिशाचा एक चुणचुणीत तरुण मित्र तिला पोचवायला आला होता. गाडींतील कांहीं मडळी त्याच्याकडे मत्सरी दृष्टीनें पाहताना दिसली.

"अच्छा बाय् बाय् !" तिनें आपला गोडस हात उचलून म्हटले.

"उद्या परस्पर ६। ला येशील ना डेक्कनवर ?" तो आग्रही आवाजात म्हणाला. "नाहीं तर तुझं प्रॉमिस् तें !"

त्याच्या हावभावावरून मला तिचा तो प्रियकर वाटला. तेवढ्यांत त्या तरुणानें म्हटले, "तूं आली नाहींस तर माझं काहींच बिघडणार नाहीं. पण मोहन मात्र नाराज होईल."

मीं मनांत म्हटलें, "हा नाहीं दिसत हिचा प्रियकर. तें मानाचें स्थान या मोहन नांवाच्या भाग्यशाली माणसाकडे असलं पाहिजे."

एवढ्यात त्या तरुणाला थट्टेच्या सुरांत रमणीने उत्तर दिलें, "पुरे पुरे. मोहनची काळजी तूं नको करू. तिला मी तुझ्यापेक्षां जास्त ओळखतें."

आमचा तर्क पुनः एकदां कोलमडला! 'मोहन' हें एका स्त्रीचें नांव होते तर!—डाव पुढें मांडून बसल्यानंतर तो जुळनासा झाल्यावर पत्ते विसकटून डाव मोडून टाकतो त्याप्रमाणे मीं पुढील तर्काचा माला बंद केली.

अखेर माझी ही धडपड बंद पडण्याचा एक दिवस ( अथवा रात्र म्हणा ) उजाडला. पुण्यातील एका जुनाट सिनेमागृहात मी एक प्रसिद्ध सिनेमा पाहायला गेलो. चित्रपट मीं अनेकदा पाहिला होता. पण तो पुनःपुन्हा पाहावा अशी अवीट गोडी त्यात होती. या थिएटरमध्ये अनेक ठिकाणी सुवर्ण-हीरक महोत्सव गाजविलेले जुने चित्रपट अनेक वर्षांनीं आठवड्या-पंधरवड्याच्या मुक्कामाला येत. यंत्राच्या जुनेपणामुळे दहापंधरा मिनिटांनीं होणारा ठरीव उजेड आणि जुनी फिल्म पुनः पुनः तुटल्यामुळें मधून-मधून पडणारा प्रकाश यामुळें सिनेमा पाहत असता अनेक 'मध्यतरा'चा लाभ मिळे. वर पत्र्याचें छपर आणि खाली जुन्यापुराण्या खिळेदार खुर्च्या! हे वर्णन देण्याचे कारण अशा प्रतिकूल स्थितींतहि आम्हीं व आमच्यासारखे काहीं लोक तिथे जात. यावरून येथे येणाऱ्या त्या जुन्या चित्रपटाची श्रेष्ठता कळावी हेच होय.

मी गेलो तेव्हा सिनेमा सुरू झाला होता. वार्तापट, युद्धचित्रे वगैरे ठराविक आन्हिक संपून चित्रपटाला सुरवात झाली होती. पाच मिनिटात पडद्यावर चकचक् झाले आणि थिएटरमध्यें दिवे लागले. आता पुनः फिल्म जोडण्यात काहीं मिनिटे जाणार म्हणून मी इकडे तिकडे पाहूं लागलो. तो माझ्या शेजारींच आमचे पोस्टमास्तर आणि पलीकडे ती रमणी! आश्चर्याची परमावधि झाली! मी आणि पोस्टमास्तर यानीं एकमेकाना सस्मित नमस्कार केला.

"वाः मास्तरसाहेब, आजच मी थिएटरमध्ये पाहतो आहें आपणाला."

"हः हः, तुमचं म्हणणं बरोबर आहे. मी कधी पहात नाहीं सिनेमा. पण आमची ही पुतणी आहे ना? हिनं आग्रहच केला आज. अरे हो! लेट मी इन्ट्रोडयूस हर टु यू-ही मिसेस् सुनीला कशाळकर. आमचे जावई

किंग्ज् कमिशन् घेऊन गेले आहेत. ही मुंबईला विल्सनमध्यें होती. अन् हो, बेबी, हे—"

त्या रमणीनें हात जोडून एकाद्या अभिनय-चंद्रिकेचें मार्दव आवाजांत आणून जिवणी विस्तृत करीत म्हटलें, "नमस्ते." मींहि उलट नमस्कार केला.

मग आम्हीं बरोबरच सिनेमा पाहिला. मध्येंमध्यें उजेड होई. तेंव्हा काका पुतणीबद्दल कौतुकानें काहीं माहिती देत. "जंगलीमहाराज रोडवर तिचा एक मावसभाऊ राहतो आणि त्याची मोहनतारा म्हणून पत्नी आहे. तेवढीच तिची मैत्रीण...आम्ही शिवाजीनगरला राहतो. तेथून सायंकाळीं फिडल शिकायला ही जिमखान्यावर येते. ही उत्तम अभिनय करते. कॉलेजच्या गॅदरिंगमध्ये मुंबईला नुकतेंच एका नाटकात हिने एका सिनेमा नटीचं सुंदर काम केलं...माझा हिला लळा फार! वडील मुंबईला असतात. हिचा खर्च, पत्रव्यवहार सर्व मीं पाहतों..." काकांच्या एकएका वाक्याने या रमणीबद्दल मीं बाधलेला एकएक तर्क पत्त्याच्या बंगल्याप्रमाणें ढासळत होता. अखेर जागेवर काहीं उरले नाहीं!

पुढें ती मला काहीं दिवस दिसत असे. भेटली म्हणजे गोड अभिवादन करी. पण आता तिच्या भेटींत पूर्वीइतकी हृदयंगमता वाटेना. काय असेल ते असो! कदाचित् सत्याच्या संशोधनांत जी मौज असते ती सत्य हातीं आल्यावर उरत नसेल. तिच्या जीवनाची माहिती जुळविण्याचे कामीं जो संभ्रमयुक्त काळ मीं घालविला त्याची गोडी मी कधींच विसरणार नाहीं. कल्पनानौकेंत बसून आणि हुरहुरींचीं शिडें उभारून मी वास्तवाचा शोध करीत होतों. हें पर्यटन निष्फळ झालें, हे खरे असलें तरी त्या पर्यटनाची माधुरी न विसरण्यासारखी होता. ते अकारण असेल. पण जगातील बहुतेक ज्ञान, विज्ञान, कला हीं सर्व अकारण संशोधनाच्या पोटींच जन्म पावलीं नाहींत का?

## शमीम : : : ८

" यस्...कम् इन्—" दारावर टकटक ऐकूं आली तेव्हां मी काहींसें नाखुषीनेच उत्तर दिलें. कुठलेसे एक महत्त्वाचे वाक्य वाचून मी पुस्तक मिटलें होते आणि आपल्या जीवनातील एका करुण प्रसंगाशीं ते वाक्य जुळतें कीं काय याचा विचार करीत होतो. मूळ सूत्र सुटून अनेक आठवणींच्या जंगलात मन वावरूं लागले आणि त्यातून मुक्कामाचा सीधा मार्ग पत्करावा असे वाटेना. अशा स्थितींत दारावरच्या या टकटकीने माझा समाधिभंग केला. ऑगस्ट क्रांतीच्या त्या दिवसात अनपेक्षित असे काहींच नसे. कोणाचे आपल्या खाजगी वेळावर केव्हां आक्रमण होईल याचा नेम नसे. हीं आक्रमणें कित्येकदां निरर्थकहि असत. तशाच पैकीं हा प्रकार असेल अशा समजुतीनें मनांतून किंचित् नाराज होऊनच मी दाराची कडी काढली.

तो आश्चर्याने माझे डोळे विस्फारित झाले! कधींहि न पाहिलेली एक तेजस्वी मुलगी मोठ्या विनयाने अमुक गृहस्थ (म्हणजे मी) इथेंच राहतात का म्हणून विचारूं लागली. "मीच तो" असें सांगताच तिने सस्मित वदनाने ब्लाउजच्या चोर खिशातून एक बंद पाकींट काढलें आणि माझ्या हातात दिलें. आश्चर्याचा भर ओसरून मी काहीं विचारणार तोंच "नमस्ते" असे म्हणून ती सरसर पायऱ्या उतरून दृष्टीआड निघून गेलीसुद्धा!

विचित्र घटनांच्या त्या अपूर्व हंगामात देखील या एका मिनिटाच्या घटनेनें मला बुचकळ्यात पाडलें. पाकिटांत कांहीं ताजी जळजळीत बुलेटिन्स होतीं. पण तीं आवर्जून एकत्र करून मला आणून देणारी ही युवती कोण असेल बरें! हा चेहरा मीं पुण्यात पाहिला तर नव्हताच, पण असा चेहराच

पूर्वी मला कधीं दिसला नव्हता. मी मनापुढें त्या तेजस्विनीचें चित्र पुनः रंगवूं लागलो. रंग गोरा नव्हता, त्वचाही काहीं नितळ नमावी–पण आकर्ण भुवया, धुंद व विशाल नेत्र, बोलण्यात काहीं शब्दाचे होणारे निसरडे उच्चार असे कितीतरी विशेष मनात भरण्यासारखे होते. पण यापेक्षां, कुठलेंहि साहस करण्याचा जो निडरपणा उमटून दिसे त्यामुळे त्या सौंदर्याला एक विलक्षण धार आली होती. काय वाटले कोणास ठाऊक, पण मी मनात म्हटले, " बस्स. . हिचं नाव शमीम ठेवावं ! " तिच्या त्या अपूर्व व्यक्तित्वाला साजेसें नाव सुचलें याचा कोण आनंद झाला मला ! मनातल्या मनात नामकरणविधीचा हा सोहळा मोठ्या प्रसन्नतेने मी साजरा केला.

'शमीम' राहते कुठे, पुनः भेटेल कीं नाहीं, अशी हुरहूर अनुभवीत असतां दुसरे दिवशीं सकाळींच ती मला रस्यांत भेटली. माझ्या उत्साहाला पारावार राहिला नाहीं. आज तिनें डोक्यावरून पदर घेतला होता. ती अ–महाराष्ट्रीय आहे, असे मला अस्पष्ट वाटत होतें. तो ग्रह मीं आता ठाम केला. मी मोठ्या अदबीनें तिला नाव गाव विचारलें. तें ऐकून मात्र मी चकितच झालो. कोंकणपट्टीला एका शहरात राहणाऱ्या अस्सल महाराष्ट्रीय व्यापाऱ्याची कन्या होती ती !

तिचे लौकिक नाव काहींहि असले तरी 'शमीम' या नांवानेच ती माझ्या मनःसृष्टींत वावरत होती. पुढे ती मला नित्य भेटूं लागली. केव्हा केव्हां विषय अर्धवट टाकून देई, केव्हां बोलणाराच्या तोंडाकडे पहात नुसता होकार देत बसे, तर कधीं एकदम अतर्मुख झाल्यासारखी वाटे. ती उत्तम प्रकारची कार्यकर्त्री मला वाटली. पण कार्याइतकीच तिची ज्ञानलालसाहि तीव्र होती. " या वादळात निर्माण झालेल्या भावनांना चिरस्थायी स्वरूप यायचं असेल तर आपल्या राष्ट्रवादाचा पद्धतशीर अभ्यास व्हायला पाहिजे. " असें मीं एकदा म्हटले. तिसऱ्याच दिवशीं सुप्रभातीं 'शमीम' आली आणि म्हणाली, " दहा मुली जमविल्या आहेत. आज आपलं अभ्यासमंडळ सुरू करायचं. " आर्जव व करारीपणा याचें असें सुंदर मिश्रण तिच्या सांगण्यांत होतें कीं मला 'नाहीं' म्हणणेंच शक्य नव्हतें. त्या दिवशीं माझ्या जीवनांतल्या एका नव्या प्रकरणाचा 'शमीम'ने श्रीगणेशा करून दिला.

अभ्यासमंडळात 'शमीम' अगदीं पहिल्या रांगेत बसे. जवळ जवळ

तासभर व्याख्यानाचीं टिपणें घेई. मान वर उचलून स्वस्थ ऐकत ती कधींच बसली नाहीं.

आणि एके दिवशीं नित्याप्रमाणें मी अभ्यासमंडळास गेलों तों चौकांत सावधगिरीच्या चेहऱ्यानें ' शमीम ' उभी होती. मी येतांच पुढे होऊन तिनें म्हटलें, " काल या ठिकाणीं गुप्त पोलिस चौकशीला आले होते. त्यामुळं घरवाले घाबरले आहेत. ते अभ्यासमंडळाला इथं आता जागा देत नाहींत. "

" मग बंद ना आज मंडळ ? " मी अधीरपणें विचारलें.

" छे छे. दुसरीकडे व्यवस्था केली आहे. चला. "

आणि आम्ही तिकडे गेलों. पण सरकारी अवकृपेच्या दहशतीनें तिथूनहि आम्हाला अर्धचंद्र मिळाला ! निरुपद्रवी असें अभ्यासमंडळ चालविणेंहि त्या काळात दुर्घट होतें. पण ' शमीम ' निराश झाली नाहीं. तिनें पुनः नवी जागा शोधून काढली.

दोनच वर्ग झाले. नंतर महात्माजींचा तो जगविख्यात उपवास सुरू झाला. साऱ्या जगाचे लक्ष पुण्यानजीकच्या आगाखान प्रासादाकडे होतें. आम्ही तासाला जमलों. सर्वच जण चिंतामग्न होतो. ' अहिंसा ' या विषयावर चर्चा होती. आज ' शमीम ' आली नाहीं. आगाखान प्रासादाकडे मोर्चा नेत असता तिला पकडल्याचें वृत्त एकीने आणलें होते ! !

" पण त्या तर तुरुंगात जाणार नव्हत्या ना ? बाहेर कार्यकर्त्यांची वाण आहे तेव्हा तुमच्यासारख्यानीं आत जाता कामा नये असं मी त्याना सागें अन् त्यानाहि तें पटल होतं." मीं विषण्णपणे म्हटले.

" काल संध्याकाळपर्यंत तिचीहि कल्पना नव्हती आपण जाऊं म्हणून." एकजण सागूं लागली. " एका मोर्चाबरोबर सहज ती गेली. पण तो प्रचंड जमाव, महात्माजींचा जयजयकार वगैरेचा इतका परिणाम झाला तिच्यावर, कीं मैत्रिणीचा हात सोडून एकदम पोलिस व्हॅनमध्यें जाऊन बसली ती. इन्स्पेक्टर तिला परत जाण्याचं स्वातंत्र्य देत होते. पण ती हलेनाच. अखेर तिला येरवड्याला नेलं."

आज कुणाचेच तासाकडे लक्ष नव्हते. विवेचन अर्धवटच राहिलें. ' शमीम ' आपणात नाहीं म्हणून सर्वजण खिन्न होतो. पण ती मोठ्या धैर्यानें तुरुंगाकडे चालून गेली याचे सर्वांना साभिमान कौतुकच वाटत होते.

' शमीम 'वर खटला झाला. रीतसर चौकशी होऊन तिला तीन महिन्यांची शिक्षा झाली! त्या वेळीं मी हजर नव्हतों. पण हजर असलेल्या मैत्रिणींबरोबर तिनें मला प्रणाम धाडले होते.

' ज्या देणगीवर आपला हक्क नाहीं ती घेतांना जसा संकोच वाटतो तसें मला त्या दिवशीं झाले!

' शमीम ' सुटायला अजून तीन आठवडे होते. मी रात्रीं फिरून परत येत असतां दोन मुली बोलत चाललेल्या मीं पाहिल्या. माझ्या नांवाचा उच्चार झालेला ऐकून मी त्यांच्या संभाषणाकडे विशेष लक्ष देऊं लागलों.

" बाकी तुला अटक झाली त्या दिवशीं भाईंना जेवढं वाईट वाटलं तेवढं कुण्णाला वाटलं नसेल. त्याना तुझ्याविषयीं कमालीची—"

" हो ग! मी जाणते तें. म्हणूनच उद्या सकाळीं मुंबईला न जातां दुपारी जाणार. सकाळीं मी भाईंना भेटेन."

काय आश्चर्य, ' शमीम ' होती ती! मुदतीच्या पूर्वी तिची सुटका झाली होती. त्या प्रेमळ मैत्रिणींच्या सुखसंवादाचा विरस नको व्हायला म्हणून मी पुढें गेलों नाहीं. मागल्या पावलीं घरचा रस्ता सुधारला. अरुणोदय केव्हां होतो आहे असें मला त्या रात्रीं होऊन गेलें!

' शमीम ' सुप्रभातींच आली. आदल्या दिवशीं रात्रीं तिच्या बोलण्यांत माझ्याविषयींचें जें सौहार्द प्रकट झालें होते त्याची ओळख तिला मुळींच द्यायची नाहीं हें मीं मनाशीं नक्की ठरविलें होते. अचानक भेट झाल्याचें आश्चर्यच मीं दाखविलें.

' शमीम ' जवळ जवळ दोन तास होती. तुरुंगातल्या विविध गमती तिने सांगितल्या. तुरुंगातल्या राजबंदी स्त्रियांत ' डाव्या ' ' उजव्या 'चे वाद कसे कडाक्यानें चालत, पुढारीपणासाठीं कशीं भांडणें होत, बाहेरच्या व इतर वॉर्ड-मधल्या बातम्या कशा युक्तीने मिळविल्या जात, दृष्टि सुधारण्याचे प्रयोग कोण मुली कशा करीत होत्या—अशा अनेक गोष्टी तिच्या बोलण्यांत आल्या.

दुपारीं ती मुंबईस गेली.

लौकरच पदवी-परीक्षेसाठीं ' शमीम ' परत पुण्यास आली. अभ्यासाच्या गर्दीतहि तिने अभ्यासमंडळ सुरू केलें होतें. मध्यंतरीं तिच्याविषयीं किती

तरी गमतीदार हकीकती कळल्या. 'शमीम'चें जीवन उलगडून घेण्याची मला विशेष आस्था वाटते हें रहस्य आतां तिच्या मैत्रिणींना ठाऊक झालें होतें. 'शमीम'विषयीं जिला जी माहिती असेल ती ती मजपाशीं सांगे. 'शमीम'च्या जातींत तिच्याइतक्या सुशिक्षित मुली कमी असल्यानें तिच्या लग्नाच्या बाबतींत वडिलांचे फार मोठे बेत आहेत, पण हिनें मनानें एका साध्या तरुणालाच वरिले आहे, ती उत्कृष्ट अभिनेत्री असून दक्षिण महाराष्ट्रांतील एका कॉलेजांत तिनें वेडीचे काम फार सुंदर केले होतें, इ. इ. वृत्त मला कळलें होते. पण कुठलीहि हकीकत कळल्यानें 'शमीम'बद्दलचें माझें सादर आकर्षण कमी झालें नाहीं. उलट तिच्या जीवनाचे नवे नवे पैलू दिसत जाऊन ते वाढलेच.

अपेक्षाभंग हें तिच्या माझ्या ऋणानुबंधाचें सूत्र असावें असें मला वाटे. कल्पना नसताना ती माझ्या जीवनात आली; कार्यकर्त्री वाटली पण अभ्यासूहि निघाली; ध्यानींमनीं नसता तुरुंगांत गेली आणि सुटलीहि अचानक; अ-महाराष्ट्रीय वाटली पण महाराष्ट्रीय निघाली. दररोजच्या जीवनात तर असे लहानसान अपेक्षाभंगाचे धक्के मला तिच्यामुळे किती तरी बसले!

एक प्रसंग मला आठवतो. अभ्यासमंडळांत नेहमीं निष्ठापूर्वक अखेरपर्यंत बसणारी 'शमीम' एक दिवस एक मैत्रीण आलेली पाहून मधूनच उठून गेला! मला अगदीं अप्रशस्त वाटले ते. आणि माझा राग तिच्या इतर मैत्रिणींजवळ मीं बोलूनहि दाखविला. माझा हेतु हा होता कीं माझ्या रोषाची दखल तिला लागावी. दुसरे दिवशीं 'शमीम' मजकडे आली तेव्हां तिच्या सौजन्यपूर्ण स्वभावाप्रमाणें ती आता दिलगिरी प्रदर्शित करील असें मला वाटलें. पण तसे काहीं झाले नाहीं. "मी मध्येच उठून गेले म्हणून तुम्ही रागावणें चुकांचेच होते." असा कठोरपणें माझ्याशीं वाद ती घालूं लागली! या अपेक्षाभंगानें मी दोन दिवस बेचैन होतों!

पण असे प्रसंग अगदींच थोडे आले. पदवी परीक्षा देऊन 'शमीम' आपल्या गांवीं कायमची राहायला निघाली तेव्हां ओळख न विसरण्याविषयीं मीं तिला कळकळीने विनविलें. ती कांहीं बोलली नाहीं. पण इतक्या आर्जवाची गरजच काय असा भाव तिच्या रमणीय चेहऱ्यांत प्रतिबिंबित झाला होता.

'शमीम'चें एकादे वेळीं पत्र येई तो दिवस मला सणासारखा वाटायचा. पत्रांतील मजकुरावरून कसल्या तरी संघर्षांत ती आहे एवढेच कळे. तिच्या जीवनातलें गूढ उकलून घेण्याची उत्सुकता मीं अनेकदां प्रकट केली. पण ती त्याबाबत मुग्ध असे. एकदा तिनें लिहिले, "माझ्या जीवनाबद्दल आकर्षण वाटण्यासारखें काहीं नाहीं. तुमच्यासारखे तें जाणून घेण्याची इच्छा करतात हे मात्र एकच मला आकर्षण असें वाटते."

'शमीम'चें समाजकार्य व राष्ट्रकार्य चालू होतें. तिच्या बाजूला जीं स्थानिक वृत्तपत्रें निघत, तीं आतां मी आस्थेनें वाचूं लागलों. कारण त्यांत तिचें नाव वाचयला मिळून सुखसंवेदना होत. तिचे मला आपल्या गावीं येण्याविषयीं कायमचे निमंत्रण आहे. पण नारळी-पोफळींच्या त्या प्रदेशात जाऊन 'शमीम'चा पाहुणचार घेत सागरसंगीत ऐकण्याचें ते सुख मी शिल्केंत म्हणून राखून ठेवलें आहे. योग्य काळ येईपर्यंत मी त्याला हात लावणार नाहीं.

'शमीम'नें मला एका आधुनिक युवतीचा रम्य आदर्श दाखविला आहे. ही युवती स्त्रीत्वाचे शाश्वत गुण घेऊन नव्या जगांत स्वतंत्र बाण्याने मिरविणार आहे. क्रांतीचें कालिनृत्य चालू असता तिच्या मुकुटातून पडलेले एक मोरपीस मला सापडलें. 'शमीम'चा १॥-२ वर्षांचा स्फूर्तिदायक सहवास हें ते मोरपीस होय. माझ्या जीवन-ग्रंथांत मीं ते जपून ठेवलें आहे. आणि मन जेव्हा कंपित होते व उल्हासाचें अवर्षण पडते तेव्हां जीवनग्रंथातलें नेमकें पान उघडून तें मोरपीस पाहतों. पुनः श्रद्धा बळावते आणि आशेला नवजीवन मिळतें!

# कामिनी : : : १

माझ्या आठवणींचा जन्म झाला तेव्हांपासून मी या पुण्यात वावरतों आहे. पण ते रमणीय स्थळ कधींहि मीं पूर्वी पाहिलें नव्हते. लाल देवळावरून आपण गावात येऊ लागलो कीं, विद्युत्गृहाच्या जरा अलीकडे एक मुलींचे वसतिगृह आहे. बाहेरचें बंद फाटक ओलांडून आत शिरतांच अगदी वेगळ्या, परीकथेतील सृष्टीत येऊन पडलों आहों असा भास होतो. उंच उंच हिरवीगार झाडें आकाशाला भिडलेलीं, छायाप्रकाशाचे लाबलाब पट्टे वालुकामय विस्तीर्ण अंगणावर पडलेले, आणि मध्यंतरीं रंगीबेरंगी तावदानानीं झळकणारी इमारत. या इमारतीच्या जुनेपणामुळे भूतकालाचें गूढरम्य धुके साऱ्या देखाव्यावर पसरल्यासारखे वाटते. चोहोंकडे सामसूम असल्याने तर आपल्या आश्चर्याला थोडी भीतीची उत्कटता येते. इतक्यांत एकादी सुंदर कुलकन्यका अंगणांत येऊन भोवतील राईच्या उंच उच शिखरांकडे सहज पाहत उभी राहते. मागील बाजूला "विद्या", "डायना", "भारती ऽ ऽ" अशा मंजुळ हाका ऐकू येत असतात. अशा त्या रमणीराज्यांत शिरल्यानंतर आपण कशासाठीं आलो आहों याची आठवण राहिली तरच नवल म्हणायचे !

कधींहि न पाहिलेल्या त्या आश्चर्यमय जागीं मी कामिनीला पहिल्यानेंच भेटलों. कदाचित् याच योगायोगामुळें असेल, तिच्या पहिल्याच भेटींत तिची जबरदस्त मोहिनी माझ्यावर पडली. ती माझ्या हृदयाच्या दाराशीं न थांबतां एकदम गाभाऱ्यापर्यंत गेली. अर्थात् याची जाणीव तिला नव्हती ! आणि त्याचमुळें तिला आणि मला असह्य वेदनांचा मुका मार पुढें सोसावा

लागला! शेवट गोड झाला की कडू झाला याचें निश्चित उत्तर मला तरी अद्याप सांपडलेलें नाहीं!

कामिनी माझी दूरची नातलग होती. तिचें लहानपणापासूनचे आयुष्य महाराष्ट्राबाहेरच गेलें होतें. साहजिकच तिच्या वागणुकींत एक प्रकारचा आकर्षक मोकळेपणा आला होता. अगदीं पहिल्याच भेटींत तास दीड तास भरपूर मुलाखत झाल्यावर मी जेव्हां तिचा निरोप घेतला, तेव्हां झटकन् हात पुढे करून तिने हस्तादोलन केले आणि माझ्या हातांतून हात काढून घेण्याची घाई न करता आर्जवी स्वरात म्हटलें, "येत जा बरं का नेहमीं. आजवर न भेटता राहिलों त्याची भरपाई करायचीय् हें लक्षांत असूं द्या. बाकी, भाईसाहेब, मी तुमचे वर्णन ऐकत होते त्यापेक्षा तुम्ही फारच निराळे आहांत!"

"म्हणजे? सांगा तरी कसा निराळा आहें मी तें."

माझ्या या गांगरलेल्या उत्कंठेची हौस ती त्या दिवशीं पुरविणार नव्हती. माझ्या हातांतून हात काढून मोठ्यानें हंसून कामिनी म्हणाली, "सांगीन. पण आता पुष्कळ वेळ मिळणारच आहे कीं आपणांला! आज पहिल्या भेटींत नको."

मी वसतिगृहाच्या बाहेर पाऊल टाकले तेव्हा जवळ जवळ भानावरच नव्हतों. कामिनीच्या स्पर्शानें आलेली धुंदी ओसरली नव्हती. तिची वेषभूषा किती नवीन होती! जरतारी नक्षीची लालभडक सॅडल्स्, जरीचे बुट्टे असलेले किरमिजी रंगाचे पातळ, कुंकवाचे जागीं वर्खाची तारकाकृति, गुंजशुक्राप्रमाणें चकाकणारीं कणभूषणें आणि काळ्याभोर जाळींत बसविलेला भव्य केशकलाप...सारे अतीव चित्ताकर्षक आणि तितकेच नवीन! तिच्या श्यामलतेला अशी विलक्षण झिलाई दिसे कीं गोरेपणहि त्यापुढें काळें-ठिक्कर पडलें असतें. डोळ्यांत एक विलक्षण आवाहन आणि काहींशी बेपर्वाई होती. माझ्या माहितीप्रमाणें यौवनाच्या उंबरठ्यांत येऊन तिला ५-६ वर्षे तरी झालीं होतीं. पण तिला किशोरी म्हणून समजायला कुणीं हरकत घेतली नसती.

कामिनीच्या आणि माझ्या मधूनमधून भेटी होऊं लागल्या. मोकळेपणा-

साठीं उमेदवारी करण्याची फारशी गरजच नव्हती. कामिनी आणि मी एकमेकाच्या जीवनाचा, आशा-आकांक्षाचा, आवडी-निवडींचा एकमेकाना परिचय करून देण्यास नेहमीच अधीर होऊन जायचे. आपल्या जीवनातले पराजयसुद्धा आम्ही संकोच सोडून एकमेकाना सांगू लागलो! अशा रीतीनें गप्पागोष्टी होता होता एकादे वेळीं कामिनी अगदीं संत्रस्त होऊन म्हणायची, "...हे सगळं ऐकलं म्हणजे वाटतं, भाईसाहेब, कीं तुमच्या आणि माझ्या वाटा अगदीं भिन्न आहेत! मला कुठलंहि उच्च ध्येय नाहीं, भक्तीची हौस नाहीं, कलाकौशल्य तर अंगीं नाहींच, हर तऱ्हेचीं सुखं पैदा करून त्यांत बेहोष व्हावं ह्याशिवाय दुसरा उद्योग आवडत नाहीं..." या तिच्या उद्गारात माझ्याविषयींची प्रशंसा व्यक्त होत असूनहि मला ते असह्य होत. एक तर कामिनी स्वतःला समजे तितकी सुखलोलुप नव्हती. तिच्या मनाच्या तळाशीं उच्च भावना जिवंत होती. आणि दुसरें, माझ्या उणीवा मला पूर्ण माहीत होत्या. कामिनी स्वतःच्या सुखाची पूर्ति करून घेण्यासाठीं निर्भयपणें हवें तें साहस करायला मागेपुढें पाहणारी नव्हतो. ही निर्भयता माझ्याजवळ नसल्याने कामिनीबद्दल मला भीतियुक्त आदरच वाटे. आणि म्हणूनच कामिनीनें आवेगानें काढलेल्या उद्गाराना विरोध करून मी तिची परोपरीनें समजूत घालीत असे. तिच्या निर्भयतेची मी स्तुति करीं. केवळ स्वतःच्या आनंदासाठीं सुखविषयाची शिकार करण्यांत जी निर्भयता कामीं येई तीच जर खरोखर काहीं भव्य ध्येयाच्या कारणीं लागली तर कामिनी केवढ्या पदाला चढेल, असें मला वाटे. आणि हे मी तिला बोलूनहि दाखवीं. मग कपाळाला हातमिठी घालून आढ्याकडे शून्य दृष्टीने पाहत ती स्वस्थ बसे.

कामिनीनें वसतिगृह सोडून शहरात बिऱ्हाड केले. त्यामुळे आमच्या भेटींचें प्रमाण अर्थातच बरेच वाढलें. कामिनीकडे फार लोकाचा राबता नव्हता. त्यांतहि मी गेलो कीं आपल्या इतर पाहुण्याना निरोप देण्यास ती संकोच करीत नसे! यात अर्थातच माझा अहंकार चाळविला जाई. कित्येकदा सकाळींच ती निळें जरतारी किनारीचें पातळ नेसून व दोन वेण्या सोडून समारंभाच्या थाटांत वावरताना दिसे. हंसाकृति डूल तर या वेळीं कानात असायचेच. कधीं मी आंत पाऊल टाकतांच सहज विचारीं, "आज विशेष थाटमाट? कुठें समारंभाला जायचंय् वाटतं?" म्हणजे अगदीं सानंद

मनमोकळेपणानें कामिनी उत्तर देई, " भाईसाहेब, आज तुम्ही येणार होता ना !...हा रंग अन् या ईअररिंग्ज़ तुमच्या आवडत्या आहेत ! नाहीं का ? ...खरोखर आपलं हमखास कौतुक व्हायचं एकच एक ठिकाण माणसाला मिळणं म्हणजे भाग्यच म्हटलं पाहिजे." "कुणाला मिळालय् पण ?" मी अंतरंगींचा संतोष वर न दाखविता असा भाबडा प्रश्न टाकीं. " मिळालंय् एका व्यक्तीला. पण पूर्ण ताबा आहे कीं नाहीं याची खात्री नाहीं तिला." असें काहींसें बोलून कामिनी गप्प होई !

आणि तिच्या त्या खेळकर व आनंदी जीवनात ती अशीच कित्येकदां एकदम गंभीर होई. धावत धावत एकाद्या डोंगराच्या टोंकापर्यंत यावें आणि मग एकदम खालीं दरी आहे हे कळून पाय लटपटूं लागावे असें काहींसें विचित्रपण तिच्या वर्तनांत दिसे ! अशा वेळीं तिचे साधे सुखसंवाद सुद्धां एकाएकीं बंद होत ! कालिया डोहावरून अंतराळीं जाणारीं निरुपद्रवी व गोजिरवाणीं पाखरें जशीं डोहातल्या विषाच्या प्रभावाने मरून खालीं पडत, तसें तिचे नेहमींचे आशावादी व विलासी विचार एकदम मावळून जात ! कुठल्या कालियानें तिचा जीवनडोह विषमय करून टाकला होता कुणास ठाऊक ?

आता माझें अंतःकरण कामिनीनें पूर्ण व्यापून टाकिले आहे असें मला हळूंहळूं वाटूं लागले. पर्शियन कवीच्या शब्दात सागायचें म्हणजे तिच्या हनुवटीवरील खळींत उडी घ्यायला माझे पंचप्राण उत्सुक होते ! तिच्या विशाल केशकलापाच्या शृंखलांत जीवनाला जखडून घेण्यास मी तयार होतों ! पण इतकें असूनहि काहीं गोष्टी अशा घडत कीं, माझ्या भावनेला वेगळें वळण देण्याचा मी प्रयत्न करीं; शरीराकर्षणाची पातळी सोडून वर जाण्यास मनाला सक्तीनें शिकवीं ! ! हा दुर्विलास खरोखर कुणाच्या वाट्याला आला नसेल !

एक प्रसंग मला आठवतो. मी मुंबईस गेलों होतों. कामिनीहि त्या वेळीं तेथें होती. आम्ही सायंकाळीं चौपाटीवर फिरायला गेलों. आज कामिनीचें सौंदर्य कांहीं विलक्षणच प्रभावी दिसत होते. बोलता बोलता पायावर वाळू ओढून लहान मुलाप्रमाणें ती बोगदा तयार करीत होती. तिनें पाय बाहेर घेतांच मीं पायाकडे न्याहाळून पाहिल्यासारखें केले.

" काहो, पायाकडे निरखूनसे पाहतां ?"

" नाहीं म्हटलं पायाकडील भाग माशासारखा आहे कीं काय ?"

" म्हणजे ?" गोंधळून कामिनी म्हणाली.

" मला भास झाला कीं, एक मत्स्यकन्या येथें येऊन माझ्याशीं बोलत बसली आहे. ही लहान आकृति, हा तलम शुभ्र वेष, खांद्यावर समुद्रफेसाप्रमाणे दिसणाऱ्या पोलक्याच्या फुगीर बाह्या, आणखी..." मी मध्येंच थांबलों. आपल्या सौंदर्याच्या स्तुतीनें लाजून चूर होणारी कामिनी नव्हती. ती एकदम उठून म्हणाली, " आलं लक्षात, कविराज, उठा. हे सौंदर्यवर्णन पुरे. ही मत्स्यकन्या आता एखाद्या उपाहारगृहाची वाट दाखवा असं आपल्या भक्ताला फर्मावीत आहे."

असें म्हणून हात देऊन तिनें मला उठविले आणि लगेच आम्ही एका उपाहारगृहाकडे वळलोच.

उपाहारगृहातल्या लहानशा स्वतंत्र खोलींत मी आणि कामिनी बसलों. प्रथम चहा मागविला. आणि दुसरे कांहीं पदार्थ आणण्यास तेथील नोकराला सांगावे म्हटलें तर तो चहा आणण्यास पसार झालासुद्धा !

कामिनी माझ्यासमोर बसली होती. तिच्या पाठीमागें विजेच्या घंटेचें बटन होते. ती कशासाठीं तरी—मला वाटतें जमिनीवर पडलेला आपला रुमाल घ्यायला असेल—खालीं वाकली. तेवढ्यात मीं नोकरास बोलविण्यासाठीं विजेचे बटन दाबले. माझा हात वर आहे हे न कळून कामिनानें रुमाल घेऊन वर मान उचलली तों तिच्या गालाला माझ्या हाताचा स्पर्श झाला. या अनपेक्षित स्पर्शानें ती थोडी गोंधळली आणि मलाहि कसेंसेंच वाटलें ! पण कामिनीच्या चेहऱ्यावर अस्वस्थतेऐवजीं आनंदाच्या छटाच अधिक स्पष्ट दिसत होत्या !

एकदोन मिनिटाच्या स्तब्धतेनंतर आम्ही खूप खूप बोलूं लागलो. समोरील पदार्थांचा आस्वाद घेत आणि मधून मधून चहाचे घुटके घेत कामिनी निरनिराळ्या विषयावर बोलत होती. इतक्यात टप्टप् असा बुटांचा आवाज झाला. जवळूनच कुणी पुरुष जात होता. स्वतंत्र खोलीला जें अर्धे दार असतें त्याखालून त्या पुरुषाची हिरवी विजार आणि पंप शू एवढे दिसत होते. कामिनीनें ते पाहिलें. तत्क्षणीं तिची चर्या भयभीत दिसूं लागली ! काहीं

अपराध करतांना आपण सापडलों आहोंत असाच जणूं तिचा चेहरा दिसूं लागला! पुढें आम्ही १५ मिनिटें तेथें होतो. पण ती क्वचित्‌च एकादा शब्द बोलली असेल. नंतर आम्ही बाहेर पडलों आणि तिला तिच्या घरीं पोंचवून मी कल्याण अलीकडील एका उपनगरात जाण्यासाठीं लोकल गांठण्याच्या उद्योगाला लागलो.

दोन दिवसांनीं मी आणि कामिनी पुण्यास परतलो.

नंतर पाच सहाच दिवसांनीं असेळ—

मी आणि कामिनी भांडारकर इन्स्टिटयूटकडे फिरायला गेलों होतों. परत येताना कालव्याच्या वाटेनें एक मनुष्य येताना दिसला. "ओ अय्या!" असा काहीं आश्चर्य व भीति यानीं संमिश्र असा उद्गार कामिनीच्या तोंडून बाहेर पडला! मला एकदम काहीं आठवल्यासारखें झाले. मीं प्रथम त्या माणसाच्या पायांकडे नजर टाकली. हो—! तीच हिरवी विजार आणि पंप शू त्याच्या पायात होते! तो जवळ आला. कामिनीनें मोकळेपणाचा उसना आव आणून त्याची व माझी ओळख करून दिली. त्याचा पोषाखच नव्हे, तर शरीराची ढब व हालचाल अगदीं आधुनिक होती. वर्ण गव्हाचा होता. हातावरचे व गळयापर्यंत आलेले छातीवरचे केस पांढरे करडे दिसत. डोक्यावरचे मात्र गर्द काळे पण विरळ होते! बोलताना तोंड जरा मोहक आणि डोळे किंचित् बारीक करण्याची लकब (एका प्रसिद्ध सिनेमा नटाच्या अनुकरणानें बहुधा!) त्याने उचलली होती. त्याचा बांधा मध्यम आणि नाकडोळे तरतरीत दिसत. विचित्र वासाचें अत्तर त्याने अंगभर चोपडलें असावें. त्या वासाच्या घमघमाटाने माझें डोकें उठून गेलें!

जणूं काहीं झालेच नाहीं असें दाखविण्याकरिता, आम्ही बोलत होतों तोच विषय कामिनीनें पुढें सफाईने चालविला. "आता यानाच विचारूं बरं का. काय हो! मी सिनेमात गेलें तर काहीं बिघडेल का? भाईसाहेब या गोष्टीच्या विरुद्ध आहेत."

"म्हणजे सनातनी आहेत वाटतं हे?"

यावर शक्य तितक्या निग्रही स्वरांत मीं म्हटलें, "मुळींच नाहीं. मला जाणणाऱ्या लोकांत असा आरोप माझ्यावर कुणी करणार नाहीं. माझ्या

एकदोघी उच्चकुलीन मैत्रिणी सिनेमांत गेल्या आहेत आणि त्यांपैकीं एकीवर स्वतःच्या नांवाने मीं गौरवपर लेख लिहून प्रसिद्ध केला आहे."

"मग आम्हींच काय पाप केलं आहे?"

"सांगतों, कामिनीताई. हें क्षेत्र एका दृष्टीनें फार भयंकर आहे. यांत मोहाचीं स्थळे जागजागी आहेत. उच्च कलाविलासाची महत्त्वाकांक्षा आणि खरोखरीची कलात्मकता अंगीं असेल तरच ह्या स्थळातले धोके माणूस टाळूं शकतो. कला हाहि एक योग आहे. ती अंगीं भरपूर प्रमाणात असली म्हणजे संयम सहजासहजीं येतो, माणूस मोहाचे खड्डे लीलेनं टाळूं शकतो. पण तुम्ही खऱ्या कलेच्या विकासाकरिता नव्हे तर 'सेन्सेशन्' म्हणून या क्षेत्रात जाणार आहांत. मला नाहीं वाटत तुम्ही त्यांत सुरक्षित राहाल."

यावर त्या माणसाने काहीं विशेष वाद केला नाहीं. त्याचा इरादा कामिनीला खूष करावे हा होता आणि त्याचे मत तर माझ्यासारखें होतें! अशा स्थितींत काहीं संदिग्ध, गुळमुळीत वाक्यें बोलून आणि माझ्यावर शक्य तर जुनेपणाचा आरोप आडवळणाने करून त्याने वेळ मारून नेली! त्या वेळेपुरता कामिनीलाहि तो माणूस 'पुरोगामी' वाटला! (सुदैवानें माझ्याशीं मतभेद झाला असताहि कामिनीनें माझेंच ऐकलें. आणि सिनेमात जाण्याचा विचार पुढें डोक्यातून कायमचा काढून टाकला ही गोष्ट वेगळी!)

तो दिवस अमावास्येचा होता.

अंधार बराच झाला. कशावरून तरी तो माणूस म्हणाला, "आज अमावास्या नाहीं का?"

"हो ना!" कामिनी उपरोधिक व कडवट स्वरात म्हणाली. "आमच्या भाईसाहेबाना पूर्णिमा फार आवडते. पण काय करणार? ती येणार महिन्यातून एकदाच..."

अर्थात् यांतला सूक्ष्म उल्लेख त्या 'पुरोगामी' माणसाला कळणें शक्य नव्हतें. पूर्णिमा आणि मी यांचा जिवाभावाचा स्नेह आहे हे कामिनीला ठाऊक होतें आणि कित्येकदा ती विनोदानें त्याविषयीं टोमणे देई. केव्हां केव्हा मत्सराचा झटका आल्यासारखें तिचें वागणें होई. मी पूर्णिमेच्या सहवासात जग विसरून जात असें हे काहीं खोटे नव्हतें. पण पूर्णिमेशीं माझा स्नेह होता,

तो प्रणय नव्हता. त्याचें बाह्य स्वरूप प्रणयासारखें होतें एवढेंच. पण कामिनीला हें पटवून देणें मला कधींच शक्य झालें नाहीं. त्या अमावास्येच्या काळोखात तिनें काढलेले उद्गार माझ्या या अपयशाचेच निदर्शक नव्हते का ?

कामिनीचें लग्न ठरलें आहे आणि तिचा नियोजित वर आसामच्या सरहद्दीवर कुठे सैन्याच्या छावणींत आहे असे मला पुसट कळलें होते. या वार्तेत सत्य किती आहे हें जाणून घेण्याचा मीं फारसा यत्न केला नाहीं. पण तें सत्य आहे असें समजून मी माझ्या मनाची समजूत घालीत असे. आणि कामिनीचा 'तो' मित्र भेटल्यानंतर तर भकास निराशेच्या निश्चयाचे बळ मी जमवूं लागलों ! कामिनीच्या रूपगुणावर मी बेहद्द संतुष्ट होतों. माझ्या काव्यमयतेला या रमणीय व्यक्तीच्या जीवनांत भरपूर वाव आहे हेंहि मला कळे. पण माझी भावना उदात्त केल्याशिवाय गत्यंतर नाही असें मला ठाम वाटूं लागलें. मी कामिनीचा स्नेह सोडण्याला तयार नव्हतों. कारण कामिनी आणि मी तिऱ्हाइतासारखें राहत आहोत ही कल्पनाच मला असह्य होई ! शिवाय माझ्या स्नेहाची कक्षा सुटली तर ही तारका अंतराळांतून हवी तिकडे बेबंद जात अखेर उल्का होऊन पडेल ही मला फार भीति वाटे. तिचा प्रियकर म्हणून नव्हे, तर तिचा संरक्षक म्हणून तिचें सानिध्य टिकविण्याची माझी धडपड होती.

कामिनीच्या मनाचा पूर्ण ठाव मला कधींच लागला नाहीं. एकदा मात्र एका विलक्षण प्रसंगानें मला काहींसा अंदाज आला. मी सात आठ दिवसांत कामिनीकडे गेलो नव्हतों. म्हणून मुद्दाम वेळ घेऊन मोठ्या उत्साहानें तिचे घर गाठलें. दारांत गेलो आणि बाहेर टोप्या वगैरे अडकविण्याचा स्टॅंड होता त्यावर टोपी काढून तेथील आरशात किंचित् डोकावून पाहिलें. इतक्यांत आंत काहींतरी कडाक्याचा वाद चालला आहे असें दिसलें. माझें नाव ऐकून मी विशेष लक्षपूर्वक ऐकूं लागलों.

"...मग भाईसाहेबाना तुमचं घर वर्ज्य करण्याची सूचना तुम्ही देणार नाहीं हें नक्की ना ?" त्या हिरव्या विजारीच्या माणसाचा हा आवाज होता हें स्पष्ट कळलें मला !

" अगदीं नक्की. भाईसाहेब माझे मित्र आहेत, अन् पालकहि आहेत. पूर्णिमानं त्यांचं हृदय आधींच व्यापलं नसतं तर...पण जाऊं द्या ! भाईसाहे-

यांच्या सहवासांत मला एक प्रकारची निर्भयता, एक विलक्षण आनंद वाटतो. माझ्यावर ते कुठलाहि अधिकार गाजवीत नाहींत. तसंच, माझ्याशीं स्नेह ठेवण्यात अन् चारचौघांत माझ्याबरोबर हिंडण्यात आपण फार भयंकर त्याग करीत आहोंत, असाहि रुबाब ते आणीत नाहींत."

"तुमच्या सौंदर्याची स्तुति करून तुमची खुषामत करतांना त्यांना मीं अनेकदां पाहिलं आहे, कामिनीताई !"

"मी कुठं नाकबूल करते तें. ते आहेतच रसिक तसे. त्याच्या सौंदर्याच्या आणि फॅशनबद्दलच्या आवडीनिवडी मला पूर्ण ठाऊक आहेत आणि त्या पुर-विण्यासाठीं तसतशी वेषभूषा करून त्याच्याकडून प्रशंसा करून घेण्यात मला भारी भारी आनंद होतो ! पण त्याच्या स्तुतींत एक प्रकारचा सात्त्विक मन-मोकळेपणा असतो, पण त्याची कल्पना तुम्हाला नाही यायची..."

मी पुढे तिथे थाबलो नाहीं. मागल्या पावलीं घरी परतलों. असे म्हणतात कीं, आडून ऐकणाराला त्याची निंदाच ऐकूं येते. पण त्या दिवशीं तरी मीं ही म्हण खोटी ठरविली हे खास !

पण कामिनीने केलेली स्तुति ऐकून मला सुख झालें ते निर्भेळ नव्हतें. जें हातीं आले त्याच्यापेक्षा जे हातीं येणें शक्य होते त्याची मातब्बरी मला विशेष वाटत होती, आणि म्हणून कामिनीच्या बोलण्यात अर्धवट सुटलेल्या वाक्यामुळे मला एक उदास हुरहूर लागली. कामिनी काय किंवा मी काय प्रथमपासून एकेका गैरसमजाच्या आहारीं जाऊन आपापल्या भावनांचें रूपातर करण्याचा प्रयत्न करीत होतों. मीं तिच्याशीं जडलेला ऋणानुबंध उदात्त केला आणि तिनेहि तो टिकविला म्हणून तिचा सामाजिक अधःपात टळला हे खरें असेल कदाचित्. पण माझा तो मूळ हेतु होता असें मला वाटत नाहीं. मला एका क्षणीं वाटलें हें सर्व धांवत धावत जाऊन तिला सागावें आणि शुद्ध प्रणयाचा मार्ग मोकळा करून घ्यावा. पण आतां त्या गोष्टीला फार उशीर झाला आहे. हे कठोर सत्य लगेंच माझ्या लक्षांत आलें !! कामिनी मला अत्यंत प्रिय होती. मोठ्या कष्टानें मीं जगात मिळविलेली प्रतिष्ठा तिच्या-खातर जननिंदेच्या वादळांत सोडून द्यायला मी तयार असें. पण हें सर्व आतां सक्तीनें गाठलेल्या उदात्तपणाच्या पातळीवर स्थिर केल्याशिवाय गत्यंतर नव्हतें.

या सर्व प्रकरणाला पुढें वेगळीच कलाटणी मिळाली.

कामिनीनें एके दिवशीं सकाळीं आपल्या लग्नाची निमंत्रणपत्रिका हातीं दिली !

लग्न मुंबईस होणार होते.

वराच्या मागें लष्करी हुद्याच्या निदर्शक पदव्या होत्या !

मला अंधुक आलेला संशय खरा होता म्हणायचा !

मीं विवाहसमारंभांत मोकळेपणानें भाग घेतला. मला परकें वाटूं नये एवढ्यापुरतेंच येऊन कामिनी मधून मधून मला कुशल विचारून जाई. समारंभ मोठा थाटाचा झाला.

दुसरेच दिवशीं सकाळीं मी पुण्यास परत निघालों. गाडींत गर्दी बेताचीच असल्याने मधोमध गेलेल्या रस्त्यातून एक फेरफटका मारण्यास मी निघालों. मध्यें चहाच्या स्टॉलवरून जाणाऱ्या अरुंद वाटेंत एक माणूस वर्तमानपत्र वाचीत उभा होता. जाड, गिड्डा, हंसरा, व काहींसा प्रतिष्ठ चेहऱ्याचा होता तो. त्याची व माझी तोंडओळख होती. मला पाहतांच तो एकदम सद्गदित झाला. माझ्यासाठीं चहा मागवून तो मला जवळ जवळ मिठी मारूनच म्हणाला, "भाईसाहेब, तुम्हांला हजार धन्यवाद !"

"का बुवा ? मीं काय केली एवढी बहादुरी ?"

"ही पहा." असे म्हणून हातांतलें वर्तमानपत्र त्याने माझ्यापुढे केलें. कामिनी आणि तिचा वर यांचे फोटो होते आणि उभयताच्या विवाहाची वार्ता देऊन त्या वृत्तपत्राने त्याचें अभीष्टचिंतन केलें होतें.

—पण ते पाहूनहि हा माणूस मला धन्यवाद का देतो आहे हें कळेना !

पुढें तोच बोलूं लागला, "ह्या मुलीला तुम्हीं त्या कर्दनकाळाच्या (हिरव्या विजारवाल्याच्या) हातून सोडविलीत, ससाराला लाविलीत, केवढं पुण्य जोडलंत ! तुमच्याशिवाय कुणाला हें शक्य झालं नसत. अहो, माशानं गिळिलेलं माणिक बाहेर काढणं एकवेळ सोपं, पण त्या कर्दनकाळाच्या नादाला लागलेल्या पोरीला ताळ्यावर आणणं महाकर्म कठीण ! मी त्याला लहानपणापासून ओळखतो आहें. आमच्या गावचाच ना तो ! पण, भाईसाहेब, तुम्ही तिच्या बाबतींत काही लोभ धरला नाहींत म्हणून हें साधलं बरं का ! चांगलीं माणसं तिच्याजवळ जायला भीत. जरा नरम माणूस जवळ गेलं असतं तर त्या

बैलानं त्याला हुंदाडून टाकलं असतं. तुम्ही नाहीं त्याला बघलां...आम्ही पाहत होतों ना सारं..."

तो असा सद्गदित होऊन कितीतरी वेळ बोलत होता. सक्तीनें जो उदात्तीकरणाचा प्रयोग मीं चालविला होता त्याकडे कुणी सज्जन इतक्या आदरानें पाहत असेल अशी माझी कल्पना नव्हती. हा भाबडा जीव मला अगदीं विभूति बनविण्याच्या घाईला आलेला पाहून मी चागलाच बुचकळ्यात पडलों! त्याच्या प्रशंसेवर माझा खराखुरा हक्क होता का? कामिनीच्या सौंदर्यानें मी कित्येकदां धुंद होत नसे काय? कामिनीच्या त्या 'पुरोगामी' मित्राचा मीं कित्येकदा पाणउतारा करीं तेव्हा मला एक प्रकारचा तामसी आनंद होई हें नाकारतां येईल काय?...अशा प्रश्नांचीं चक्रे माझ्या डोक्यात फिरूं लागलीं. अखेर सर्व मंगल झाले हे खरे आणि त्याला मीं असहाय होऊन थोडा हातभार लाविला ह्यात संशय नाहींच. पण स्वयंस्फूर्तीनें आणि कुठल्याहि यातना न सोसता मीं हे केलें असतें तर मला माझ्यावर स्तुतिपुष्पें उधळून घेण्यात सकोच वाटला नसता.

मीं घाईघाईनें चहा संपविला. "माझं सामान तिकडं आहे. येतों मी. पुण्याला भेटूं." असें कसेंबसे बोलून तडक आपल्या जागीं आलों आणि बाहेर शून्य मनाने पाहत बसलों. गाडी फारच वेगात होती. जवळचे खांब, झाडें, प्राणी भराभर मागें जात होते. काही अंतरावर नदीचें पाणी चकाकत होतें आणि अगदीं दूर उंच निळा डोंगर स्थितप्रज्ञासारखा बसला होता.

# शरावती : : : १०

टपालवाल्यानें चांगलीं सात आठ पत्रें माझ्या हातीं दिलीं तेव्हां मी अगदीं खूष होऊन गेलों. अर्थात् सारींच पत्रें जिव्हाळ्याचीं आणि हृदयाच्या चोरकप्प्यांत जपून ठेवण्याच्या लायकीचीं असतील असें मला मुळींच वाटलें नाहीं. यांतलीं एकदोन व्यवसायाचीं असणार, एकादें निमंत्रण असेल; नियमितपणें आपलें कुशल कळविणाऱ्या नातेवाइकाचीं दोनतीन असतील; आणि मग एकाददुसऱ्या पत्रात सटीसहामासीं पत्र लिहिणाऱ्या एकाद्या रमणीय व्यक्तीचें हस्ताक्षर दिसेल असा अंदाज मीं केला आणि शेवटचें पत्र वाचीपर्यंत माझी वर्गवारी ९९ टक्के खरी ठरत गेली.

शेवटच्या पत्रानें मात्र आश्चर्याचा धक्का दिला! पाकिटावरील हस्ताक्षर स्त्रीचें आहे हें तर सहज ओळखू येत होतें. पण माझ्या परिचयाच्या कुठल्याहि स्त्रीच्या हस्ताक्षराशीं ते जुळत नव्हतें. 'श्री' 'ल' इ. अक्षरात हिंदीचें वळण स्पष्ट दिसत होतें. कोण ही स्त्री असावी याचा काहीं तर्क चालेना. कोण व्यक्ति आहे हेच जिथे कळेना तिथें आतल्या मजकुराचें स्वरूप काय असेल याची काय कल्पना येणार? पत्र कुठून आले आहे याचा शोध घ्यावा म्हणून पोस्टाचा शिक्का पाहिला. तो अगदीं पुसट होता. ABAD. एवढींच शेवटचीं अक्षरे दिसत होतीं. पण 'आबाद' कोणतें? औरंगाबाद, अलाहाबाद कीं दुसरें आणखी कोणतें तरी? ...पण मग माझेंच मला हंसूं आलें! पत्र फोडून वाचावयाचें टाकून कल्पनातरंगांत काय मी वाहत चाललों याचे नवल वाटलें. आणि झटकन् पाकिट फोडून मोठ्या उत्सुकतेनें मीं मजकूर वाचला.

पत्र अगदी लहान चार सहा ओळींचे होतें.

"...यंदा एका दिवाळी अंकांत प्रसिद्ध झालेली आपली "एकाकिनीस" ही कविता वाचली. एकाद्या मोठ्या पर्वताच्या माथ्यावर उभें राहून दरींतला जलप्रवाह पाहावा आणि दरींत पसरलेल्या धुक्यामुळें त्याचें स्पष्ट दर्शन होऊं नये; मग काहीं तरी गूढ हुरहूर लागावी असा अनुभव आला. कवितेनें झालेला आनंद व्यक्त करण्याकरितां हे पत्र लिहीत आहें.

आ.

शरावती."

कवितेबद्दल धन्यवाद देतांना तिनें काव्यमय भाषाच वापरली होती. तिला नेमकें काय म्हणायचे आहे हें जरी मला उमगलें नाहीं तरी माझ्या कवितेनें तिला कंपायमान केलें होतें, आणि आपली संतोषाची भावना शक्य तेवढी चांगली व्यक्त व्हावी यासाठीं तिची धडपड होती हे मात्र मला पत्रावरून कळलें.

अनोळखी व्यक्तींकडून असें अनाहूत प्रशंसा-पत्र यायची ही कांहीं माझी पहिलीच वेळ होती अशातला भाग नाहीं. पण तरीहि शरावतीच्या पत्रानें आल्हादाचे काहीं विलक्षण हेलकावे हृदयाला बसूं लागले. ते पत्र मी कितीदा तरी वाचलें. माझ्या या अनोळखी चहातीच्या जीवनाचे काहीं पैलू या लहानशा पत्रावरून दिसतात कीं काय हें संशोधकाच्या तीव्र बुद्धीने पाहूं लागलों. रहस्य-कथांत नेहमीं यशस्वी होणाऱ्या गुप्त पोलिसाच्या चातुर्यानें पत्राचा कागद दोन्ही बाजूंनीं नीट न्याहाळला. पण शरावतीचे फार थोडें जीवन मला त्यावरून कळूं शकलें. पत्राखालीं दिलेल्या पत्त्यावरून ती अहमदाबाद येथे महाराष्ट्र वसाहतींत राहते एवढे कळलें. त्या विभागात राहणारी मंडळी सुखवस्तु वरिष्ठ मध्यम वर्गाची असतात हे मला माहित होतें. आणि त्यावरून शरावतीच्या गृहस्थितीची कल्पना आली. ती कुमारी होती आणि पदवीपरीक्षा उत्तीर्ण झाली होती हें नोटपेपरवर छापलेल्या तिच्या समग्र नांवावरून सहज लक्षांत येण्यासारखें होतें. तसेंच तिच्या नांवावरून म्हैसूर, कर्नाटकाच्या बाजूला तिचा जन्म झाला असावा असाहि तर्क करतां येण्यासारखा होता.

—आणि मग एकदम मला आठवलें कीं, 'शरावती' याच नांवाच्या लेखिकेचा एक कथासंग्रह आपण वाचला आहे. हो! तीच ही यांत शंका उरली नाहीं! आनंद आणि आश्चर्य यांना आणखीच भरती आली. आपणांला आलेली प्रशंसा नुसत्या रसिक स्त्रीची नाहीं तर एक कलावती विदुषीची आहे या कल्पनेनें अहंकाराला बरीच फुंकर घातली. "जीवन हें अगदींच काहीं निराशामय नाहीं, चमत्काराला तिथें भरपूर वाव आहे..." अशा 'उद्योग-उत्साह' छाप विचारांना तेजी आल्यासारखें झाले!

शरावतीला मीं सविस्तर आभारप्रदर्शक पत्र टाकलें आणि त्याच दिवशी तिचा कथासंग्रह आणून पुनः तो मननपूर्वक वाचूं लागलो. शरावतीचे लौकिक जीवन जाणायला मी उत्सुक होतोंच, पण तिच्या भावजीवनात प्रवेश मिळविण्याची आस्था मला विशेष वाटत होती. "एकाकिनीस" या माझ्या कवितेवर खूष झालेली शरावती फक्त माझ्या रचनाचातुर्यावर लुब्ध आहे कीं, कवितेमधील भावनेशीं ती पूर्णपणें समरस झालेली आहे हें मला जाणून घ्यायचें होते. आणि तिच्या कथात कोणता स्थायीभाव आहे हे याच दृष्टीनें मी पाहत होतों. मी अगदीं संतुष्ट होऊन तिचा कथासंग्रह खालीं ठेवला. कारण. माझ्या सर्व काव्यमय यातनाचे तोडवळे मला शरावतीच्या कथा-संग्रहांत दिसले. तीच ती अतृप्ति आणि तेच ते पृथ्वीच्या वातावरणाप्रमाणें मनःपृष्ठाकडे दाट दाट होत गेलेलें औदासीन्य शरावतीच्या लेखनांत मला प्रतीत झाले. शरावती आणि मी कुठल्या तरी एकाच खगोलावरून या धरणीवर अवतरलो असें मला ठाम वाटूं लागलें.

—आणि नंतर पुनः शरावतीला मीं लिहिले—

"...तुमच्या कथा मोठया आवडीनें वाचल्या. हा परत आहेर आहे असें समजूं नका. पण मोठया मजेंत तो माझा काळ गेला यांत शंका नाहीं. तुमचीं आणि माझीं प्रेये आणि ध्येये, प्रवृत्ति आणि वेदना सर्व अगदीं एक आहेत असें मला वाटतें. फार काय पण आपल्या वैफल्याचेंहि स्वरूप एकसारखेंच असावे असा माझा ठाम ग्रह झाला आहे. मला वाटतें पत्राच्या द्वारें आपण जर निःसंकोचपणे जीवन अन् वाङ्मय यांविषयीं सुखसंवाद केले तर आपण ज्या शुभ क्षणीं भेटूं त्या वेळीं आपण एकमेकांना खूप ओळखत होतों असें आढळून येईल.

तुम्हांला नाहीं का असें वाटत? मी तर इतकेंहि म्हणतों, कीं तुमच्या प्रत्यक्ष परिचयाविषयीं जी तीव्र उत्कंठा मला लागली आहे तिच्यावर थोडा ताण पडला तरी चालेल, पण पत्रव्यवहारानें भरपूर परिचय झाल्यावरच आपली गांठ पडावी......"

आपल्या अपेक्षेला आश्चर्यकारक कलाटणी न मिळाली तर स्त्रीजीवनाचा गूढपणा तो काय? माझ्या पत्राला शरावतीचें जें उत्तर आलें त्यांत मला पाहिजे असलेल्या उत्तराखेरीज अनेक रूक्ष व सामान्य गोष्टी होत्या! मी बेचैन झालों. पण हातीं घेतलेलें सूत्र खालीं मात्र ठेविलें नाहीं.

पुढें अकस्मात् मला अहमदाबादला जाण्याचा योग आला. गुजराथबद्दल मला लहानपणापासून विलक्षण आकर्षण असे. आणि अनेकदां बडोदें-अहमदाबादच्या सफरी केल्यावरहि ते कमी झालें नाहीं, उलट वाढलेंच. केव्हांहि बॉंबे सेंट्रलला आलों कीं, ते सुखवस्तू व कांतिमान् लोक, त्या गोपांगनांसारख्या रमणीय गुर्जर ललना, ती मृदु गुजराथी भाषा याच्या गजबजाटात मन अगदीं उत्फुल्ल होऊन जात. या वेळीं तर आनंदाला आणखी एक शाखा फुटली होती. अहमदाबादच्या मुक्कामांत शरावती भेटणार या कल्पनेनें काहीं अपूर्व उत्साह वाटत होता.

गाडीने रात्रीं वसई मागे टाकल्यावर सामान्यपणें उतारू झोंपण्याच्या नादीं लागतात. मी वरच्या बर्थवर पडलों होतों. विचारचक्र सुरू होतेंच. शरावती कशी असेल याचीं चित्रें मी मनःफलकावर रंगवीत होतो. आपला अपेक्षाभंग होऊं नये या दृष्टीने मीं तिलोत्तमा-उर्वशीचा आदर्श घेतलाच नव्हता. शरावती लहानखोरी, श्यामल, केस भरपूर व कुरळे असलेली (कदाचित् दोन वेण्या सोडणारीहि) अशी एक सडपातळ अंगकाठीची मुलगी असेल असें मी मनाशीं ठरवीत होतो. गूढ भावनाशीलतेमुळें जें कारुण्य रमणीच्या डोळ्यात सदैव दिसतें तसेच शरावतीच्या मुद्रेत असेल असें मीं कल्पिलें. अबोली रंगाचें गोल पातळ, निळा फुगेदार बाह्याचा ब्लाउझ, हातांत एक एक खूप मोठी हिरवी व नक्षीदार बांगडी, उघड्या मानेच्या नाजुकपणाला खुलविणारी नाजुक सुवर्णमाला, ...असा साज शरावतीच्या मनोमय मूर्तीवर मीं चढविला. आणि मग त्या चित्रांतला अस्पष्टपणा हळूंहळूं कमी होत जाऊन कांहीं वेगवेगळें सौंदर्य त्यांतून प्रकट होऊं लागलें. माझी कल्पनाशक्ति आतां अगदीं

स्वस्थ होती. शरावतीच्या एका भुवईवर ठसठशीत तीळ दिसूं लागला हसतांना तिच्या लालचुटूक हिरड्याच प्रामुख्यानें दिसत असून त्यांमुळें तिच्या मूळ लाडिकपणांत भर पडत आहे असा भास झाला...

जणूं काय खूप ओळखीच्या मुलीचेंच छायाचित्र मनःफलकावर पुनः उमटत होते असें मला वाटलें. पण मग माझेच मला हसूं आलें. एकादा पेपर कठीण गेला असला म्हणजे विद्यार्थी कठोर आत्मपरीक्षण करून प्रत्येक प्रश्नांतले कमींत कमी गुण घेऊन अंदाज करीत असतो. पण पास होण्या-इतकी सर्व गुणाची बेरीज व्हावी हे अवधान मात्र त्याच्याकडून नकळत पाळलें जातें. माझेंहि तसेंच नाहीं का झालें? शरावतीच्या रूपासंबंधीं फार मोठया कल्पना बांधायच्या नाहींत ही दक्षता बाळगून जें मीं चित्र रेखाटलें त्यांतहि माझ्या आदर्श सौंदर्यासंबंधींच्या कित्येक आवडी येऊन गेल्या होत्या. पुनः मीं आणखी कांहीं वेगळ्या पद्धतीनें हेंच चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला. त्यांतच निद्रेनें मोहजाल पसरलें. आणि कांहीं वेळाने जाग आली तों "दण्दणऽऽदण्दण्" असे गंभीर आवाज कानीं येत होते. नर्मदेच्या भव्य पुलावरून गाडी भडोचच्या अंतरंगांत शिरत होती.

बडोदें गेल्यावर उजाडलें. मी बर्थवरून खालीं उतरलो. समोरच्या बाका-वर दोन गृहस्थ बोलत होते. दोघेहि मुंबईलाच बसलेले. त्यातला एक गृहस्थ मला आपल्या संभाषणात ओढण्याचा प्रयत्न करीत होता. म्हणजे तो काय करी कीं, आपल्या मित्राला काहीं गोष्ट पटवून देत असतां माझ्याकडे पाहून बोलत बसे आणि मध्येंच "खरं की नाहीं?" "माझं काहीं चूक असलं तर सांगा." असें मलाच आवाहन करी! त्याची डुबरी आणि विनोदी मूर्ति आणि व्यापारी पेशाचा उंची पोषाख मोठा मजेदार दिसे. मधूनमधून तो तपकिरीची चिमूट नाकाला लावी. या व्यसनानें त्याच्या स्वच्छतेला अर्थातच थोड्या मर्यादा पडल्या होत्या! त्याची चिकाटी मात्र दांडगी खरी! अखेर त्याने मला बोलायला लाविलेंच!

अहमदाबादला मी पहिल्यानेंच जात आहें कीं काय याची त्यानें प्रथम चौकशी केली. नंतर तेथील एकेक प्रसिद्ध माणसाच्या ओळखीहि तो सांगं लागला. बहुतेक ठिकाणीं याचा स्वयंपाकघरापर्यंत प्रवेश होता असें त्याच्या बोलण्यावरून वाटे. "नाना" "तात्यासाहेब" "जिजी" "बाई"

अशीं घरगुती टोपण नांवे घेऊनच तेथल्या मंडळीची हकीकत तो सांगे. त्याचें सर्व पुराण ऐकतांना मौज वाटे. इतक्यांत सहज माझ्या मनांत एक कल्पना चमकून गेली. आणि मीं सहज विचारलें, "काय हो, शरावती म्हणून कुणी दक्षिणी मुलगी तुमच्या माहितीची आहे काय?" त्याबरोबर एकदम डोळे विस्फारित करून आणि बैठक बदलून तो म्हणाला, "वाः, तिला कोण ओळखत नाहीं हो!..."

—आणि मग त्यानें जे शरावती-पुराण लाविलें तें अहमदाबादपर्यंत! त्याच्या शेकडों शब्दांत पुनरुक्ति इतकी असे कीं, शेंकडों शब्दांतून एकदोन वाक्यांचे तथ्य हातीं येई. या बोलभाडाच्या सगळ्या भाषणांतून शरावतीची फारच थोडी जीवनकथा समजली. जुनीं माणसे ज्या रंगाच्या चष्म्यातून नव्या मोकळ्या वृत्तीच्या मुलीकडे पाहतात त्याच रंगाच्या चष्म्यातून हा इसम शरावतीकडे पाहत होता. शरावतीविषयींच्या ठरीव ठशाच्या भुमका त्यानें मला सांगितल्या. त्याचें सारे सारे म्हणणें शंभरनंबरी असत्य असण्याचा पूर्ण संभव मला उघड दिसत असूनहि मी मनांतून जरा अस्वस्थ झालों! शरावतीचें जीवन खरोखरच का असे असेल? तिने आपलें हृदय कुणाला समर्पण केले आहे हे खरें कीं काय?...इतक्यात मणिपूर गेलें, तेव्हां सामानाची आवरासावर करण्यांत माझी संशयशृंखला तुटली!

अहमदाबाद स्टेशनवर काहीं मंडळी जमावानें उभी होती. कांहीं माणसांच्या हातात पुष्पहार होते. मग आम्हांला कळले कीं आमच्या गाडीत एक पुढारी असून त्याच्या स्वागतार्थ हे लोक आले आहेत! गाडी थाबताच त्या पुढाऱ्याच्या डब्याकडे लाक धावले. लोकांचे रंगीबेरंगी पोषाख आणि त्यांची विरळ संख्या यावरून पुढाऱ्याचा दर्जा आणि त्याचा राजकीय पक्ष याचा निर्णय सहज घेता येत होता. पुढाऱ्याला त्याच्या भगत मंडळींनीं बाहेर काढलें आणि त्याच्या नांवापुढे 'घणुं जिव्युं' (चिरायु होवो) जोडून घोष करीत ते त्याला घेऊन गेले.

अहमदाबादचे माझे मित्र मला न्यायला आले होते. त्यांच्या मोटरींतून आम्ही महाराष्ट्रीय सोसायटीची वाट चालूं लागलो. एलिस ब्रिजवरून वळतांना त्यांच्या ओळखीची एक मुलगी दिसली म्हणून मोटर थांबवून ते तिला म्हणाले, "ताई, माझेकडे पाहुणे आले आहेत, तेव्हां आज रात्रीं मी कांहीं

येणार नाहीं असं तुझ्या घरीं सांग बरं का ?" इतकें बोलून त्यांनीं मोटर सुरू केली. कां कोणाला ठाऊक मीं एकदम त्यांना विचारलें, "का हो ! ही शरावती का ?" "छे छेः, ही आमची मालती—" असें काहीं उत्तर देऊन त्यांनीं मोटरला वेग दिला. मोटर व्यवस्थित हाकण्याच्या नादात ते असल्यानें मीं असा प्रश्न कां केला याचा विचारहि त्याच्या मनांत आला नाहीं ! माझ्याहि ते पथ्यावरच पडलें !

दुसरे दिवशीं महाराष्ट्रीय मंडळांत एक कार्यक्रम होता. तो संपल्यावर एक चुणचुणीत मुलगी माझी सही मागण्यास आली. स्वाक्षरीची वही पुढें करून आणि पोलक्यात गळ्याखालीं अडकविलेलें फाउंटन् पेन काढून ते मला देत ती स्मितपूर्वक म्हणाली, "तुमची सही पाहिजे. संदेश पण द्या हं !" मीं तिच्याकडे पाहिलें तों काय आश्चर्य ? मीं मनोमय रेखाटलेल्या शरावतीच्या मूर्तीशीं तिचें विलक्षण साम्य होतें ! वेषभूषाहि जवळ जवळ मीं कल्पिल्याप्रमाणेंच होती. तिच्याकडे पाहत मी संदेश लिहूं लागलों. मी भानावर नव्हतों. लिहिलेली ओळ पुनः वाचली तों ती पुढीलप्रमाणें असल्याचे आढळून आलें !

**"भेट होतां आज तूझी थांबल्या साऱ्या कळा !"**

मी मनाशीं ओशाळलों. दिलगिरीपूर्वक वहीचें तें पान फाडून दुसरा एक बोधप्रद संदेश दिला आणि सही केली. ती मुलगी परत फिरणार तोंच मीं थांबवून तिला विचारलें, "का हो, तुमचें नाव शरावती का ?" "छे, मी प्रमिला. तुम्ही शरावती म्हणजे ती लेखिका म्हणतां ना ?" "हो." "ती चार दिवसापूर्वींच अबूला गेली. आतां १०-५ दिवस तरी काहीं परत येत नाहीं." पाण्यांत टाकलेल्या ढेकळाप्रमाणें माझा सारा उल्हास विरघळून गेला !

आपण प्रत्यक्षच जाऊन शरावतीसमोर अकल्पितपणें हजर व्हावें या अद्भुत कल्पनेच्या आहारीं जाऊन मीं तिला अगोदर माझ्या येण्याची वार्ता पत्रानें कळविली नव्हती. त्याचा परिणाम हा असा झाला ! या घोटाळ्यामुळें निरुत्साह, गोंधळ, भ्रमिष्टपणा याच्या अशा विचित्र भोवऱ्यात मी सांपडलों कीं सर्व मुक्कामांत माझ्या वागण्यांत काहीं सुसूत्रताच राहिली नाहीं. 'बापू'ना 'दादा' म्हणून कितींदा तरी संबोधलें ! 'माई'च्या मृत पुत्राची हालहवाल चारचारदां विचारून त्यांना उगीचच दुःखी केलें ! कधीं बोडकाच बाहेर पडलों तर कधीं मागला भात न घेतांच पानावरून उठलों !

त्यातल्यात्यांत एक गोष्ट मात्र बरी झाली. दुसऱ्या दिवशीं शरावतीच्या एका खास मैत्रिणीचा परिचय झाला. आणि तिच्याशी झालेल्या संभाषणात शरावती-विषयींच्या गैरसमजाचे जें अंधुक पटल गाडींत आलें होतें तें जवळ जवळ सर्व नाहींसें झाले. शरावती म्हणजे एक मुग्ध, रसिक, सरळहृदयी युवती आहे हा माझा पूर्वींचाच ग्रह ठाम झाला. ती स्वप्नात रंगत असेल पण तीं दुःस्वप्नें खास नाहींत ही खात्री पटली.

शरावतीच्या निवासस्थानाचें फक्त दर्शन घेऊन मी पुण्यास परतलों! पुढें ती परत अहमदाबादला आल्यानंतर मी तेथे येऊन गेलों आणि भेट झाली नाहीं याचें तिलाहि अर्थात् वाईट वाटलें! माझें सारें जीवन म्हणजे हुकलेल्या योगायोगाची एक मालिकाच आहे आणि त्यामुळे एकाद्या गोष्टींत अपयश आले तरी सहसा मला नवल वाटत नाहीं. खेद होतो पण मन पुनः ताळ्यावर येतें. तरीहि अहमदाबादला जाऊन आपल्या रसिक चहातीच्या परिचयाला मी आचवलों याची खंत सदैव वाटते!

शरावती केव्हां भेटेल याचा ध्यास मनाला सदैव लागलेला आहेच. मला एका प्रसिद्ध बंगाली चित्रकाराच्या 'शबरी'वरील चित्राचें राहून राहून स्मरण होत असते चित्रकाराने 'शबरी'च्या तीन अवस्था दाखविल्या आहेत. एकात ती षोडषवर्षा वन्य कुमारी उत्फुल्ल नेत्रानीं चहूंकडे पाहत आहे असे दाखविले आहे; दुसऱ्यात ती मध्यमवयीन झाली असून राम अद्यापि न भेटल्याची निराशा तिच्या चेहऱ्यावर चित्रकारानें रंगविली आहे; तिसऱ्यांत ती अगदीं वृद्ध वाकलेली अशी दिसत असून तिला भेटायला आलेल्या रामाला अगदीं जवळ तोंड नेऊन पाहत आहे असे चित्रण आहे. 'शबरी'च्या या अद्वितीय चित्रांत ध्येय किंवा प्रेय यासाठीं आमरण झुरत राहिलेल्या मानवी मनाचें हृदयंगम दर्शन त्या अमर कलाकारानें घडविले आहे असे मला वाटते. मी माझी योजना या शबरीच्या जागी अनेकदां करतो. वृद्ध शबरी-इतके तरी तेज आपल्या डोळ्यात असेपर्यंत आपलें प्रेम आपणांला मिळेल का अशी हुरहूर लागलेली असते.

**" मायेची हुंडी, या येईल वेशीनें,**
**प्रेत त्या वेशीनें, जातां माझें "**

असा फिर्दोसीसारखा हृदयद्रावक शेवट तर नाहीं ना होणार हा धसका मनाला अहर्निश जाळीत असतो !

शरावती भेटली म्हणजे मागील कोणत्याच चुका मी करणार नाहीं असा निश्चय करीत असतों. आपणच विकल्प काढावेत आणि त्यातून आपणच मार्गहि शोधून काढावेत अशी मनाला एक शिकवण मी देत आहे. रोजच्या जीवनात उदासीनतेची पोकळी आली की शरावतीविषयींच्या रम्य कल्पनांनी ती भरून काढायची असा छंदच मला जडला आहे. जवळची अनुभवसंपदा वेंचून शरावतीच्या स्नेहांत मी यशस्वी होईन या आशेवर मी कित्येकदा रेंगाळतों. पण केलेल्या चुका पुनः न करण्याची दक्षता घेतली तरी नव्या चुका होणार नाहींत असें थोडेंच आहे ! हा विचार पुनः उदासीनतेच्या खोल गर्तेत मला पुनः फेकून देतो ! माझ्या भावजीवनांतले रोजचे चढउतार हे असे आहेत !

## धानू : : : ११

माझ्या प्रणयजीवनाची सरिता आता निम्मा मार्ग ओलांडून पुढें गेली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. मृत्यूच्या सागराला मिळण्यापूर्वी ती एकाद्या कच्छच्या रणांत लुप्त होऊन जाईल कीं प्रीतिसंगमात विसर्जन पावेल हें काहींच सागता येत नाही. दुसरा संभव जवळजवळ नाहींच ! आणि आज तर तो संभव अगदीं शून्यापेक्षा कमी वाटतो. भोंवतीं ऊन रणरणत आहे ! भयंकर झळा येत आहेत ! मुख्य सरित्प्रवाह पार आटलेला आहे ! आणि 'संगमोत्सुक डोहा'प्रमाणें माझें भावनाकुल अंतःकरण आक्रोश करीत आहे—

"अजून संपेना वैशाख हन्त !"

यापूर्वी सरितेला वेळोवेळीं आलेले पूर आठवतात. निश्चयाचे आणि महत्त्वाकांक्षेचे तट भराभर कोसळले. पुरात नेहमींच कमळे वाहत येतात असें थोडेंच आहे ! ओंडकेहि येतातच कीं. त्याप्रमाणें कित्येक मधुर प्रसंगां-बरोबर भीषण यातनाहि भोगाव्या लागल्या. पण त्याचेंहि ऐश्वर्य काहीं वेगळेंच होतें. जीवनशक्तीचें तें तांडवनृत्य होतें. आश्चर्य आणि भीति यां-बरोबरच त्यांत आनंदहि विपुल होता. आज सारी चेतना मंदावली आहे. नुसती रखरख मात्र वाटते.

आणि मग मागील वैभवें आठवीत आठवीत मी अगदीं यौवनाच्या मागच्या काळापर्यंत जातो. माझ्या प्रणयसरितेचा उगम कुठें झाला हें पाहण्याची तीव्र इच्छा होते. सौंदर्याची अनिवार ओढ, स्वप्नाळूपणा आणि

सौंदर्यमय वातावरणांत जीव विरवून टाकण्याची इच्छा हीं सारीं सारीं लक्षणें सूक्ष्म रूपानें माझ्यात उदय तरी केंव्हा पावलीं ? असा शोध घेत गेलों कीं कौमार्य आणि यौवन यांच्या सरहद्दीवर जरा अलीकडे मी स्थिरावतों. त्या ठिकाणीं ‘ बानू ’ची ती हिमगुभ्र मूर्ति दिसूं लागते. ज्या सौदर्यमय यातनांनीं गेलीं १५-२० वर्षं मी हैराण आहें त्याचा ‘ बानू ’नें आरंभ करून दिला !

खंडाळ्याच्या घाटाखालीं एक विद्युद्‌गृह तयार होत होते. त्या ठिकाणीं माझे वडील चागल्या इतमामाच्या जागवर होते. मी पुण्यास शिकत होतों. पण वर्षातून माझे तीन-चार महिने तरी या रम्य ठिकाणीं जात. आभाळाला भिडलेले काळेकभिन्न पहाड, त्याच्या शिखरांवरून तळापर्यंत आलेले अजस्र नळ, मुख्य यंत्रगृहाची भव्य इमारत व तीमधील राक्षसी यंत्रें, बाजूला टुमदार बंगले आणि भोंवतालीं पळस-करवंदाची दाट दाट झाडी—असा फार मनोरम प्रदेश होता तो. माझा सुटीचा वेळ बहुधा मी बंगल्याच्या बाहेर हिंडण्यातच काढीत असें. दररोज नवी पाऊलवाट पकडून करवंदें खात हिंडायचें आणि टळटळीत दुपार झाली कीं एकाद्या नजीकच्या खेडेगांवात जाऊन दूध व खजूर घ्यायचा हा माझा नित्याचा कार्यक्रम असे. यापेक्षा दुसरें खाद्य पेय मिळण्याची सोयच नसे कुठें ! एकाद्या वेळीं जंगलाच्या खूप अंतरंगात शिरले कीं रस्ता चुके. मग कामावरील कातवड्यांसाठीं भाकर घेऊन जाणारीं काळींकभिन्न पोरें आपले पाढरे शुभ्र हिरकण्यांसारखे दात काढून म्हणत, “ वाट चुकला व्हय्. चला आम्हासंगं.” असे म्हणून मला परत घरीं आणून सोडीत. अशामुळें सह्याद्रीच्या पायथ्याशीं असलेली दहा-बारा मैलांची ती जादूमय हिरवीगार सृष्टि माझ्या पुरीपुरी परिचयाची झाली. दर वेळीं मी जाई त्या वेळीं यंत्रसंस्कृतीचे आक्रमण तेथे अधिकाधिक झाले आहे असें आढळून येई. पण तेथील शोभा इतकी अद्‌भुत होती कीं यंत्रानीं ती कमी न होतां वाढतच गेली.

पण या शोभेलाहि दिपवील असे सौंदर्य एका सुटींत मला तेथें आढळलें. पुण्याहून येऊन मला एकदोन दिवसच झाले असतील. आमच्या बंगल्याशेजारीं एक पारशी एंजिनिअर नुक्ताच राह्यला आला होता. एक दिवस मी माझ्या वडिलाबरोबर त्याच्याकडे गेलों. तेथें त्यानें आपल्या तिलोत्तमेसारख्या पत्नीची ओळख करून दिली. ‘ जेरबानू ’ तिचें नांव होतें. तो एंजिनिअर म्हणाला,

" भाई, तूं सुटींत बानूची करमणूक करीत जा बरं का? आतापर्यंत लहानपणापासून सोळा वर्षे ती मुंबईसारख्या शहरांत होती. शहरांतून एकदम अरण्यांत येऊन पडल्यामुळें बानूला करमत नाहीं. तुझ्या-एवढीच आहे ती. Be her little playmate. ( तिचा छोटा खेळगडी हो. ) " मानेनें हो म्हणण्याचें सुद्धां भान मला नव्हतें इतका लाजेनें मी गुदमरून गेलों होतों. बानू मात्र धीटपणे पण स्मितपूर्वक माझ्याकडे टक लावून पाहत होती. आम्ही चहा घेऊं लागलों तेव्हां तर आगगाडी वेगांत असतांना जसे आपण थरथरत असतों तसे मला होत होतें !

दुपारीं मी जेवून सहज पडलों होतों. एक कादंबरी वाचायला घेतली होती, पण उगीच पानें चाळीत होतो. सकाळच्या घटनेवर मन तरंगत होतें. या घनघोर अरण्यांत मुंबईतले पारशी लावण्य पाहायला मिळेल ही कधीं अपेक्षाच नव्हती, आणि त्यांत त्या लावण्याशीं ऋणानुबंध इतक्या सहज जुळेल ही तर स्वप्नांतहि कल्पना नव्हती. त्यामुळे बानूचें अपूर्व दर्शन व तिचें प्रेमळ आतिथ्य यांमुळें मन मुग्ध होऊन गेले होतें. इतक्यात गडी येऊन सांगूं लागला, " तुम्हाला बानूबाईकडे बोलावण आलं आहे. " मी चमकलो. आनंद आणि अस्वस्थता यानीं मन व्यापून गेले !......

मी बानूच्या दिवाणखान्यांत पाय ठेवला तेव्हा बानू दिलरुबा वाजवीत होती. तिचे काळेभोर आणि कोरडे कोरडे केस फक्त एका रेशमी फितीची मर्यादा पाळून भुरभुर उडत होते. एक सैल रेशमी किरमिजी झगा बानूने अंगावर चढविला होता. आणि त्यातून दिलरुब्यावर गज फिरविणारा तो हात नवनीताचा केला असावा असे वाटे ! मला पाहतांच कोचावरून उठून एकदम हंसत हंसत ती माझ्याजवळ आली आणि तिने परत कोचावर आपल्या शेजारी नेऊन मला बसविलें ! माझ्या आरक्त झालेल्या चेहऱ्याकडे ती हंसत पाहत होती. माझी अंतर्यामीं उडालेली गडबड तिला कळत होती आणि त्याबद्दल तिला मौजच वाटत होती. माझ्या हातांत दिलरुबा देऊन ती म्हणाली, " हे घे. मी तुला शिकवेल दिलरुबा. तू चित्रं लई च्यागलीं काढतोस असं तुझे पपा मला सांगत होते. तूं मला चित्रं काढायला शिकव हं ! " तिच्या गमतीदार मराठीची गंमत वाटून मी हंसूं लागलों, तोच दिलरुबा कसा धरायचा तें मला सांगून ती गाऊं लागली—

**करम कर मेरे हाल पर, ऐ करीम,**
**तूहि दोनो आलम् का सुलतान है...**

( माझ्या दुर्दशेचा, हे करुणाकर परमेश्वरा ! सहानुभूतीनें विचार कर. तूं दोन्ही ( स्वर्ग व मृत्यु ) लोकांचा सम्राट् आहेस... )

'मालकसा 'तली चीज होती ती. बानूच्या गाण्यात काहींशी पाश्चात्य संगीताची झाक होती. शेजारीं पाहावे तो ही 'नवनीत कोमलागी', बाहेर दृष्टि टाकावी तो अनंत आकाश व अजस्र पहाड यांचें भव्य मीलन, आणि भोंवतीं वातावरणात 'मालकसा 'चे सूर. उदात्त कल्पनेच्या पंखावर बसून वरवर मन जातें आहे असें वाटूं लागले. गाण्याच्या नादांत गुंगताच, मी शेजारीं आहे हेहि बानू विसरून गेली ! पर्वत, स्त्रीसौंदर्य आणि मालकंस यानीं माझ्या मनाचें त्रिभुवन व्यापून टाकलें आहे असें मला वाटले.

इतक्यात दोनचे टोले पडले. त्याबरोबर बानू समाधींतून जागी झाली. "चल, चल आत चल" असे म्हणत ती उठली. तिनें सपाता पायात सरकाविल्या, दिलरुबा पेटींत ठेवून दिला, आणि मला घेऊन ती आंत गेली. एक वेताची सुंदर चौकोनी पेटी काढून बानूने त्यांत शुभ्र रुमाल पसरला. नोकराकडून चहा करून केटली भरली आणि काहीं बिस्किटे, केक्स् वगैरे वेताच्या पेटींत ठेविली. एवढें झाल्यावर बानू झटकन् बगिच्यात गेली आणि दोन गुलाबाचीं फुले आणून तिनें त्या पेटींत टाकिलीं आणि मग पेटी बंद केली. "साहेबाचा चहा घेऊन जा लवकर." असें नोकरास बजावून तिनें ती पेटी त्याच्या हवालीं केली.

—आणि मग बानू आणि मी चहापानास बसलों. बानूच्या बंगल्यांत कपबशापासून कोचापर्यंत साऱ्याच वस्तू उंची, आकर्षक आणि पूर्वी कधींहि न पाहिलेल्या अशा मला दिसल्या. आम्ही चहा घेत होतों तो कपबशांचा सेट खास याच लावण्यमयीला शोभेल असा घडविला आहे असे मला वाटलें. चहा घेता घेतां बानू आपल्या मजेदार मराठींत आपल्या प्रीतिविवाहाची हकीकत सांगत होती. आपल्या वडिलांचे किती बंगले व किती मोटरी आहेत, आपल्याशी लग्न व्हावें यासाठीं मोठमोठ्या बॅरोनेटचीं मुलें कशीं झुरत होतीं, आपण 'साहेबा 'सारखा गरीब एंजिनिअरच का पत्करला इ. इ. गोष्टी

सांगतांना ती रंगून गेली होती. माझी श्रवणभक्ति अगदीं उत्कट होती. माझ्या हातांत चहाचा कप तसाच होता. तेवढ्यांत बानूनें आपलें निवेदन थांबविलें आणि टेबलाकडे पाहून मग म्हटलें, "अरे पागल, तूं बिस्किट घेतलं नाहींस का? गोष्टी ऐकत बसलास ना नुसता?" एवढें बोलूनच ती थांबली नाहीं तर एक क्रीम बिस्किट घेऊन तें तिनें बळेंबळे माझ्या तोंडांत घातलें......

संध्याकाळीं मी घरीं परत आलों तों अंतरंगांत पूर्ण क्रांति झाल्यासारखें वाटूं लागलें. रात्रीं परिचित प्रदेशात आगगाडींत चढावे आणि सकाळीं डोळे उघडावे तों अगदीं नवीन प्रदेश दिसूं लागावा तसें मला होऊन गेलें. आजवर न अनुभवलेल्या भावना-कल्पनांची चाहूल लागूं लागली. ज्ञानवृक्षाचें फळ खाल्ल्यानंतर आदिमाता ईव्ह प्रथम निर्झराच्या पाण्यांत आपलें प्रतिबिंब पाहताना जशी सलज्जपणें दचकून मागें सरकली तसें मला झाले! जीवनाच्या एका कालखंडावर पडदा पडला आणि नव्या कालखंडाची पहाट फुटली.

त्या सुटींत जन्मभर पुरेल इतकें काव्य बानूनें माझ्या हृदय-मंजूषेंत भरून दिलें. मी गेलों कीं कित्येक वेळां आपले कपड्याचें उच कपाट उघडून बानू विचार करीत उभी राहायची आणि निरनिराळ्या उची उची साड्या, पोलकीं, फिती भराभर माझ्यापुढे आणून टाकायची, इतकें झाले कीं अगदीं अर्भकासारखा चेहरा करून ती म्हणे, "ए भाई, यांतली साडी अन् समूदा ड्रेस तू निवडून दे मला." "बानू, तुम्हांला काय वाईट दिसणार आहे? काहींहि नेसलं तर तुम्हीं..." पण माझें वाक्य पुरें बहुधा होतच नसे. तिच्या नेहमींच्या अवखळपणाने माझा कान धरून ती मध्येंच म्हणायची, "अरे लुच्चा, माझी खुसामत करतो अन् नीट बोलत नाहीं का तूं?" मग ती खूप खूप हंसूं लागे.

त्या गिरिप्रदेशांत मी आणि बानू किती हिंडलो याचा अंदाजच नाहीं. तेथील प्रत्येक विशाल वृक्षाखालीं आम्ही थोडा वेळ तरी बसलो होतो. तेथील प्रत्येक ओहळात आम्हीं एकदां तरी पाय भिजविले होते. आणि एकादे विषारी जिवाणूं दिसून भीतीनें नकळत एकमेकाचा आधार आम्हीं घेतल्याचे प्रसंग पन्नास साठ स्थळीं तरी आम्हांवर आले होते. त्या वेळचा प्रत्येक क्षणच अविस्मरणीय खरा, पण एका प्रसंगाची स्मृति अगदीं ताजी

आहे. किंबहुना तो प्रसंग पुनः आठवला कीं पूर्वी न कळलेलें नवें सौंदर्य त्यांत दिसूं लागतें.

त्या दिवशीं बानूनें तांबडी लाल रेशमी साडी परिधान केली होती. कमरेच्या सभोंवार पाढऱ्या पोलक्याची शुभ्र जाळी मोठी उठून दिसत होती. तिच्या मनोहर बांध्याचा डौल त्यामुळें फार खुलून दिसत होता. तिच्या पायांत नुसते स्लीपरच होते. आम्ही नेहमींप्रमाणें हिंडत असता एका मोठ्या ओहळावर आलों. अनवाणी होऊन आम्हीं पाय बुडविले. प्रवाह जरा जोराचा होता आणि दगड गुळगुळीत होते. बानूनें माझ्या खांद्याचा आधार घेतला होता. खालीं पाण्यांत पाहतां पाहता बानू म्हणाली, "भाई, तुझे पाय लई पांढरे आहेत. तुमच्या लोकांत बायकांचे बी पाय नसतात असे." यावर मीं विनोदाने म्हटले, "बानू, तुम्हाला पाढरे पाय शुभ वाटतात. आमच्यात 'पांढऱ्या पायाची' ही अमंगळ शिवी समजतात." "असें कां?" असा तिनें प्रश्न करतांच त्या शिवीचा अर्थ मीं तिला समजावून सागितला आणि तो ऐकून ती विचारात गढल्यासारखी झाली.

हळूं हळूं आम्ही प्रवाहातून वर आलो. पळसकरवंदांच्या हिरव्या सृष्टी-पलीकडे धुळीचे लोट दिसत होते. ती सडक होती. त्या धुळीच्या लोटातून तांबडा सूर्यगोल जवळ जवळ निम्मा अस्तंगत झाला होता. समोरील पहा-डाच्या मोठमोठ्या सावल्या त्या प्रदेशावर पडून त्यांनीं तिमीसांजची वेळ तासभर अलीकडेच ओढली होती. एक डगर वर चढून आल्यावर किंचित् थांबून बानूनें दोन हात माझ्या खांद्यावर ठेवले आणि म्हटलें, "तूं भाई कसाला झाला? मिनू, मंचरशा असा कुणी पारशी झाला असतास तर काय बिघडला असता?" मला याचा काहीं अर्थच कळला नाहीं! मीं विचारलें, "का?" यावर कांहीं उत्तर न देता तिने मला जवळ घेऊन आपले सुगंधित केश माझ्या तोंडावरून फिरविले! तो प्रसंग आठवला कीं, अद्यापि सुख-संवेदनांचा कांटा माझ्या अंगावर उभा राहतो.

सुटी संपली!

मोठ्या कष्टाने मी पुण्यास परतलों. पुण्याहून जातांना मी ज्या जाणिवेच्या अवस्थेंत होतों ती पार बदलून गेली होती. पुण्याला आल्यावर ज्या सौंदर्य-

स्थळांना पाहून पूर्वी हर्ष वाटे तीं फिकीं वाटूं लागलीं. क्षणभर दिसून पुनः हरपलेल्या श्रेयासाठीं मन हुरहुरूं लागलें.

शाळेला पुनः सुटी लागली आणि मी परत त्या गिरिप्रदेशीं मोठ्या उत्साहानें गेलों.

पण विरह आणि विफलता या जोडीचा मी आजन्म मित्र आहें ! या जोडीची कृपा माझ्यावर सदैव असते. तेव्हाहि तिचा प्रसाद मला मिळालाच ! बानू आणि तिचा पति ते गाव सोडून देवळालीला गेल्याचें कळलें ! ती सुटी मीं कशी घालविली तें माझें मलाच माहित ! बानू आणि मी ज्या ज्या ठिकाणीं बसलों होतों, रमलों होतों, त्या त्या ठिकाणीं दररोज जाऊन, पूर्वीच्या आठवणींनीं मन तापवून यायचें हा माझा उद्योग होता !

पुढें कांहीं वर्षे बानूचा पत्ता नव्हता. माझा शालेय शिक्षणक्रम पूर्ण झाला आणि मुंबई येथें मीं कॉलेजमध्यें नाव दाखल केलें. अगदीं पहिल्याच दिवशीं मधल्या सुटींत मी व्हराड्यात उभा होतों. तेवढ्यांत पारशी मुलींचा एक घोळका किलबिल् करीत कॉलेजच्या आवारात शिरला. ' पिरोज, ' ' बानू ' अशीं कांहीं संबोधनें त्यांच्या बोलण्यांत येत होतीं. पुनः कित्येक दिवस बुजत चाललेली बानूची आठवण तीव्र झाली. या घोळक्यांत बानू असेल का ?

" तऱ्हेतऱ्हेचीं फुलें उमललीं
रंगीबेरंगी हीं सगळीं
तूंही शिरतां त्यांच्या मेळीं
माझें मग तें, फूल कोणतें, कसें ओळखूं सांग !"

गोविंदाग्रजांच्या मधुर काव्यपंक्ति आठवल्या. पण मग माझेंच मला हंसूं आलें. त्या सुंदर संभारांत बानू असण्याचा संभव पुसट तरी होता काय ? मुळींच नाहीं.

वर्गांत माझ्या बाकावर एक पारशी मुलगा होता. प्रयोगशाळेतहि त्याचें-माझें टेबल एकच होतें. त्याची ओळख जेव्हां जास्त झाली तेव्हा मीं त्याला बानूची माहिती विचारली. त्यानें चमत्कारिक चेहरा करून विचारले, " तुम्हांला ही बाई कशी माहिती ? " मीं सर्व हकीकत सांगितली. पण तो

कांहींच बोलला नाहीं! मी बानूचा कमी चहाता असतों तर कदाचित् मला कांहीं माहिती त्याच्याकडून कळली असती.

एक दिवस चर्नीरोड स्टेशनमागील लहानशा बगिचांत मी हिंडत होतों. मनांतलीं वादळें चालू असता कुणीं भेटूं नये असे वाटे तेव्हां या बगिचाचा आसरा मी पुष्कळदां घेई. इतक्यांत एका कुंजामागून हातांत हात घालून एक जोडपें बाहेर आलें. मी थक्क झालों!

ती बानू होती!

तिच्याबरोबर असणारा तो गृहस्थ तिचा एंजिनिअर पति नव्हता!!

बानूंत बराच बदल झाला होता. सुंदर तर ती दिसत होतीच, पण तो पूर्वीचा फुलपाखरी मोकळेपणा चेहऱ्यावर नव्हता. सावधगिरी आणि करडे-पणा यांच्या छटा दिसत होत्या. डोळ्याभोंवतीं किंचित् काळसर अशीं वलयें पडलीं होतीं. अंगकांति कमी झाली होती. बांधा मात्र अगदीं तोच होता.

आमची दृष्टादृष्ट होतांच अगोदर तिनेच हाक मारली, " भाई, किती वर्षांनीं भेटलास रे?"

" हो, इतके दिवस तुमचा पत्ता तरी काय होता?"

" अरे, तूं इंग्रजी पेपर्स वाचीत नाहींस वाटतं? मी फार गाजून राहिले आहे आजकाल. ' देवळाली डायव्होर्स केस ' तू वाचली नाहींस? एकदां तर माझा फोटोबी आला होता?"

वर्तमानपत्रात एक घटस्फोटाचा खटला गाजून राहिला होता खरा, पण स्वभावतः वृत्तपत्रांतल्या असल्या खमंग सदराची मला रुचिच नसल्यानें मीं तिकडे लक्ष दिलें नव्हते. पण त्या सर्व प्रकरणाची नायिका बानू असेल ही कल्पनाहि नव्हती मला. मग बानूने संकोच सोडून सर्व वृत्तात सांगितला. आपल्या ' साहेबां 'चा व आपला बेबनाव कसा झाला, घरीं राहणे आपणाला अशक्य कसें होऊन गेलें, बरोबर असलेल्या त्या मित्राचा आश्रय आपण कां घेतला, इ. गोष्टी तिनें कुठलाहि आडपडदा न ठेवतां सांगितल्या. मीं शेवटीं इंग्रजींत तिला म्हटलें,

" तुमच्यासारख्या स्त्रीला आपल्या स्वतःच्या व्यक्तिगत जीवनासाठी एवढा संग्राम द्यावा लागावा ही दुःखाची गोष्ट आहे. बानू, तुमचें हे शौर्य–चातुर्य देशाच्या कारणीं लागलं तर किती काय बहार झाली असती!"

यावर सफाईदार इंग्रजींत तिनेंहि मोठ्या गंभीरपणें सांगितलें, " माझ्या छोट्या मित्रा, आता तूंच पहा. आमच्यासारख्या पुढारलेल्या समाजांतसुद्धा एका स्वातंत्र्यप्रेमी व कर्तबगार महिलेला मानानं जगणं अशक्य होतं. तिला आपलं सारं जीवन बरबाद करावं लागतं, जननिंदेच्या शिळा तिच्या डोक्यावर सारख्या कोसळतात. आता या मानानं आपल्या देशातल्या इतर मागासलेल्या जमातींकडे पहा. तुझ्यासारख्या थंड अन् मवाळ माणसाला माझ्या उदाहरणा-वरून समाजक्रांतीसाठीं थोडी जरी स्फूर्ति मिळाली तरी माझं आयुष्य फुकट गेलं असं वाटणार नाहीं मला. "

—आणि बानूने प्रेमपूर्वक माझा निरोप घेतला.

त्यानंतर बानू मला पुनः केव्हांच दिसली नाहीं.

बानूनें म्हटल्याप्रमाणे तिच्या जीवनाने मला समाजक्रांतीची स्फूर्ति मिळाली कीं नाहीं हा प्रश्न वेगळा आहे. व्यवहाराचा राजरस्ता सोडून सौंदर्य-शोधाचा कंटकमय मार्ग मीं केव्हा पत्करला याची आठवण करूं लागलो कीं, गिरि-प्रदेशात बानूच्या संगतींत घालविलेला तो काळ मला आठवतो. उगमापाशीं नदीला परत जाणे शक्य आहे का? नाहीं! ' अत्रीं न परत्रीं ' अशी माझ्या काव्यभावनेची स्थिति आज झाली आहे. पण बानूला मी सदैव दुवाच देत राहीन. ज्या उच्च पातळीवरून पहिल्यानेंच तिने मला हिंडवून आणिलें तिच्या तुलनेने जगांतल्या सामान्य सुखाला मी क्षुद्र लेखीत आलो, माझ्या कौमार्य-दशेंत तिनें गोकुळचा आनंद निर्माण केला आणि त्या सात्त्विक आनंदाचा बोजा मनावर नेहमीं असल्यानें निराशेनें माझें मन खालच्या पातळीवर येऊंच शकत नाहीं. वास्तव जगांतले साधे फायदे घेण्यापेक्षां स्वप्नाच्या जगांत मन गुंतवावें हा माझा छंद आहे. आणि बानू ही त्या छंदाची देवता आहे.

# श्री. गोपीनाथ तळवलकर
## यांचीं पुस्तकें

### कादंबरी

१ छाया प्रकाश
२ आकाशमंदिर

### काव्य

१ दूर्वांकुर
२ शिशुविहार

### चरित्रात्मक

१ आशियाचे धर्मदीप ( दु. आ. )
२ आजकालच्या थोर विभूति

### मुलांसाठीं

१ पुणे ( स्थलवर्णन )
२ साराच चमत्कार ( मुलांकरितां कादंबरी )
३ चंद्रशेखर आणि मोहना ( परीकथा )
४ गृहरत्नें ( दु. आ. )

### तात्त्विक व राजकीय

१ साधना
२ मंगल धाम

### अनुवाद

१ आपली राहणी
२ विद्यार्थ्यांसाठीं विधायक कार्यक्रम

कॉंटिनेंटल प्रकाशन
१०९६ सदाशिव,
पुणें २.

आगामी

गोफ आणि गोफण
—वि. स. खांडेकर

ओसाडवाडीचे देव
—चि. वि. जोशी